
पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

वर्ष : १ । अंक १९ । मराठी पाक्षिक । मूल्य : २५। दिनांक १ ते १५ जून २०१९



# पाशवी बहुमत !



With Best
Compliments from
AJIT CONSTRUCTION

● संपादक
चेतन शिंदे

● मांडणी व सजावट
सचिन ओव्हाळ

● संपादकीय पत्रव्यवहार
११, तळमजला, बी ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.)
मुंबई ४०००१६

● संपर्क
८८८८५४१८२२
९५८८४५११५१
E mail :
thepeoplespost2014@gmail.com



(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
*अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी
संपादक सहमत असेलच असे नाही.



द पीपल्स पोस्ट | ८८८८५४१८२२

● जाहिरात विभाग संपर्क
९८२१४४५४०९/ ८८०५१५१४५२

● वर्गणीदारांसाठी संपर्क
**महाराष्ट्र / मुंबई :**
**विदर्भ** : अंकुश वाकडे : ९४२१४२४२४२
**मराठवाडा** : सचिन : ७३५००९१५६९
**मुंबई / कोकण** : संकेत तांबे : ७७३८७८४१३२

● वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
**द पीपल्स पोस्ट** या नावाने काढावा



पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : १ ।
अंक १९ वा । मूल्य : रु. २५ । दिनांक १ जून ते १५ जून २०१९



संपादकीय : काय, पाशवी बहुमत एकाधिकारशाहीच्या वाटेवरून चालेल? ५

हिंदूराष्ट्र बनवण्याचा भाजपचा डाव उधळला पाहिजे
– न्या. पी.बी. सावंत १०

मोदी एके मोदी, मोदी दुणे मोदी!
– विजय नाईक १३

धार्मिक ध्रुवीकरणाने देशातील प्रश्न बनतील अधिक गुंतागुंतीचे
– बी.जी.वाघ १८

वंचित काँग्रेस, बहुजन भाजप आणि आखडलेली आघाडी!
–जयदेव डोळे २१

वंचित बहुजन आघाडी राजकीय परिवर्तनाच्या दिशेने
–यशपाल भिंगे २४

मातब्बरांचे पानिपत २७

लोकसभा निवडणूक २०१९: राज्यनिहाय निकाल २८

महाराष्ट्राचा मतदारसंघनिहाय निकाल २९

नवीन केंद्रीय मंत्रीमंडळ ३१

भारताचे आतापर्यंतचे पंतप्रधान ३२

नेमाडेंच्या 'देशीवादा'त स्त्रियांच्या स्वतंत्र अस्तित्वाला स्थानच नाही
– नागनाथ कोत्तापल्ले ३३

व्यक्तिविशेष : न्यायव्यवस्थेतील सजग प्रहरी : न्या. भूषण गवई
– प्रकाश खंडेलोटे ३७

ग्रंथपरिचय : मोदी सरकारच्या धडाकेबाज वचनांचे अवास्तव
– मिलिंद कसबे ३९

आजकालचे प्रश्न : पंक्चरवाला ४१

ग्रेट थॉट्स : ४६

कोण काय बोलतं... : ४७



हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. *संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील.) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. नोंदणी क्र. MAHMAR/2018/76460

# वाचकांची पत्रे




## जातियवादी मानसिकतेचा लेखक

१६ ते ३१ मेच्या अंकातील 'गोळवलकर गुरूजी व्हाया नेमाडे' हा नागनाथ कोत्तापल्ले यांचा लेख भालचंद्र नेमाडे यांच्यात लपलेल्या समाजशत्रूचा परिचय देणारा आहे. धर्मनिरपेक्षता टिकावू नसल्याचे सांगताना जातींवर प्रेम करण्याचा सल्ला देणारे, भारतीय राज्यघटना बदलून टाका अशी देशद्रोही विधानं करणारे भालचंद्र नेमाडे खरे तर साहित्यिक म्हणून शोभतच नाहीत. साहित्यिकाने समाज घडवण्याचे, माणसाला मानवतेवर प्रेम करण्यास शिकवण्याचे काम करणे अपेक्षित आहे. नेमाडे मात्र याच्याशी विपरित काम करीत आहेत, हे कोत्तापल्ले यांचा लेख वाचून पटते. आद्य समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले, श्री.म. माटे, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रभृतींनी दीडशे वर्षे समाजाला जातिमुक्त करण्याचे अहर्निश प्रयत्न केले; परंतु आजही जात ही माणसाच्या डोक्यातून जात नाही. अनेक साहित्यिकही याला अपवाद दिसत नाहीत.

**– सुरेश कांबळे, प्रकाश जाधव,** मुंबई

## जगाने बौद्ध धम्म अंगिकारला पाहिजे

बुद्ध विचारांनीच जगात क्रांती होईल, हा यशवंत मनोहर यांचा १६ ते ३१ मेच्या अंकातील लेख बुद्ध विचारांची अपरिहार्यता अधोरेखित करणारा होता. आज संपूर्ण जगच युद्धाच्या छायेत वावरत असताना शांतीचा संदेश देणाऱ्या बुद्धाच्या विचारांची आज गरज आहे. असा विचार मांडून समाजाला बुद्ध विचारांकडे आकर्षित करण्याचे काम या लेखाने केले. आपल्या तेजोःपुंज विचारांनी जगाला प्रकाशमान करण्याचे काम तथागत गौतम बुद्धांनी केले. त्यामुळे जगात शांतता नांदण्यासाठी जगाने बौद्ध धम्म स्वीकारला पाहिजे, असे वाटते. याच अंकातील बुद्धांच्या विविध भावमुद्रा विलोभनीय अशा आहेत. **– विनोद जाधव,** पंडित शेरू, संजय सावंत, कोल्हापूर

## 'ग्रेट थॉट्स' मधील विचार प्रेरणा देणारे

'ग्रेट थॉट्स' हे महापुरूष आणि विचारवंतांच्या विचारांचा जागर करणारे सदर आम्हाला मनापासून आवडते. १६ ते ३१ मेच्या अंकातील 'ग्रेट थॉट्स' मधील छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, मदर तेरेसा यांचे विचार वाचून मनात नवचैतन्य संचारलं. नव्या उमेदीने आयुष्य जगण्यासाठी हे विचार खरोखरच प्रेरणादायी ठरणारे आहेत. **– हिंमतराव जाधव,** नांदेड

## शेषराव नाईकवाडे यांच्या कविता उत्तम

औंढा येथील प्रा. शेषराव नाईकवाडे यांच्या 'भरारी' आणि 'साहेब बनायचं आहे' या दोन कविता १६ ते ३१ मेच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या आहेत. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीवर मात करून यशाला गवसणी घातलेल्या व्यक्तीचं चित्रण करणारी भरारी कविता मनाला भावते. अनेक अडथळ्यांना पार करीत माता-पित्यांचं स्वप्न साकार करण्याचा निर्धार अधोरेखित करणारी 'साहेब बनायचं' आहे, ही कविता मनाला ऊर्जा देणारी आहे. 'द पीपल्स पोस्ट' मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्वच कविता छान असतात.

**– विठ्ठल पवार,** पुणे

## सामाजिक जाणिवेचे 'पाणीवाले' बाबा

जलपुरूष डॉ. राजेंद्र सिंग यांच्यावरील व्यक्तिविशेष विशेष आवडले. देश पाणीदार करण्याच्या उद्देशाने सुखासीन आयुष्य नाकारणारे डॉ. राजेंद्र सिंग समाजासमोरचा एक मोठा आदर्श आहेत. आजही भीषण दुष्काळात पाणी जपून वापरण्याचे, पाणी बचतीचे महत्त्व समाजाला पुरेशा प्रमाणात पटलेले नसताना डॉ. राजेंद्र सिंग यांनी मात्र स्वतःचं घर विकून, सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन जवळपास ३५ वर्षांपूर्वी पाण्यासाठीची चळवळ सुरू करण्याचे धाडस केले. राजस्थानातील ९ जिल्हे त्यांनी हिरवेगार केले. सामाजिक जाणीव ठासून भरलेले डॉ. राजेंद्र सिंग यांच्यासारखे समाजासाठी आयुष्य वेचणारे ध्येयवादी विरळाच! **– पांडुरंग गायकवाड,** सोलापूर

## मुस्लिमांप्रती भेदभाव संपुष्टात यावा

'रोजगार उपलब्धतेत मुस्लिमांप्रती भेदभाव : एक अभ्यास' हा अजय नाईक, खलिद खान आणि आशुतोष वर्मा यांचा १६ ते ३१ मेच्या अंकातील लेख अभ्यासपूर्ण होता. समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढलेले असताना मुस्लिम समाज हा भारतातील सर्वाधिक गरीब, शैक्षणिकदृष्ट्या मागास आणि राजकीयदृष्ट्या कमी प्रतिनिधित्व लाभलेला समूह असावा, ही चिंतेची बाब आहे. मुस्लिमांच्या समस्यांवर तुलनेने कमी लिखाण हेदेखील हा समाज मागास असल्याचे लेखकांनी दिलेले कारणही मनाला पटण्यासारखे आहे.

**– संदेश सूर,** नागपूर

संपादकीय

# काय, पाशवी बहुमत एकाधिकारशाहीच्या वाटेवरून चालेल?



लोकशाहीत एखादा जेव्हा अगदीच प्रचंड बहुमतांनी विजयी होतो तेव्हा राजकीय परिभाषेत त्याला Brute majority म्हणजे 'पाशवी बहुमत' म्हणतात. खरं तर, हा शब्द Drubच्या जवळपासही जातो. Drub majority म्हणजे झोडपून, सडकून मिळवलेलं बहुमत. नरेंद्र मोदींनी म्हणजे भाजपनं म्हणजेच त्यांच्या पितृ-मातृस्थानी असलेल्या संघानं जे बहुमत मिळवलं ते याहीपुढं जाण्याची शक्यता आहे. म्हणजे पाशवीच्याही पुढं. फार तर Devils majority म्हणजे 'सैतानी बहुमत'ही म्हणता येईल. इथं महाबलवान, शक्तिमान, महाशक्तिमान, ज्याला हरवलं जाऊ शकत नाही असा अर्थ घ्यावा लागंल. दोन जागांवरून, दोन वेळा सैतानी बहुमताकडे असा हा प्रवास आहे. हा विजय म्हणजे भारताचा आणि धर्मनिरपेक्षतावाद्यांचा, हिंदू राष्ट्रवादाच्या नावानं खडे फोडणाऱ्यांचा पराभव आहे, असं भाजपनं आणि त्यातही मोदींनीच निकालानंतर सांगितलं. भारताचा म्हणजे देशाचा विजय म्हणायचं झालं तर मोदी आपोआपच राष्ट्र झाले असं म्हणता येईल; पण हे खरं नाहीय. राष्ट्र कधी निवडणूक लढवत नसतं तर पक्ष आणि त्यांचे नेते निवडणुका लढवत असतात. पण, गेल्या पाच वर्षांत पक्ष, निवडणुका, सरकार, मंत्री या सर्वांना सरसकट एकाच अर्थात बांधलं जातंय. त्यात देवस्थानं, गायी, धर्म, संस्कृती आणि परंपरा आलीच. इतकं प्रचंड बहुमत कसं काय मिळालं याविषयी आश्चर्य वगैरे वाटण्याचं कारण नाही. ही निवडणूक कोणत्याही जगण्या-मरण्याच्या प्रश्नावर नव्हती तर ती भावनांची जबरदस्त मोट बांधणारी, त्यात भावनांचंच पाणी भरणारी होती. प्रचाराचा प्रारंभ रामानं झाला आणि विजयाची प्रतिक्रिया कृष्णात झाली. प्रचाराचा प्रारंभ गंगेत डुबकी मारून झाला आणि शेवट ध्यानधारणेत झाला. प्रचाराचा प्रारंभ महात्मा गांधींना देशद्रोही ठरवण्यापासून झाला आणि शेवट साध्वीच्या विजयात झाला. प्रचाराचा प्रारंभ उपनिवासी भारतीय नटानं घेतलेल्या मुलाखतीतून झाला आणि शेवट अर्धा डझन नट-नट्या आणि खेळाडू यांच्या विजयात झाला. हे सारं काही घडवण्यात आलं आणि त्याची तयारी पाच वर्षांपासून सुरू होती. 'भाकरी की भावना' अशा द्वंद्वात कधी कधी भावना विजयी होतात. घडलंही तसंच.

गेल्या वेळेप्रमाणे यंदाही मोदींच्या नावाची जबरदस्त लाट होती. तिनं यावेळी आणखी महाकाय रूप घेतलं. महापुरात झाडं, झुडपं, घरं, माणसं वाहून जावीत त्याप्रमाणं घडलं. काँग्रेस दीड डझन राज्यांत भोपळाही फोडू शकली नाही. पंतप्रधान होण्यास निघालेले उत्तरेकडचे वाचाळ आणि उतावीळ नेते आणि त्यांचे पक्ष कशातरी दोन अंकी जागा जिंकू शकले. अनेक छोटे पक्ष कागदावरच उतरले आणि कागदावरच मुरले. महा महा वाटणारे नेते पराभूत झाले. द्रविडभूमी तामिळनाडू वगळता भाजपची लाट चौफेर सुटली. तिला कोणी रोखू शकलं नाही. ही काही निसर्गनिर्मित लाट नव्हती. ती अनेक वर्षांच्या परिश्रमातून जन्माला घालण्यात आली होती. 'मोदी, मोदी, मोदी' असं तीन वेळा म्हणणाऱ्यांनाही आपण भाजपलाच मतं का देणार आहोत हे सांगता येत नव्हतं. 'फिर एक बार मोदी सरकार,' 'पहले सरकार फिर मंदिर' या घोषणांनी त्यांना विचार करण्याची संधीच दिली नव्हती. काँग्रेस सत्तर वर्षे होती मग यांना दहा वर्षे का नको? काँग्रेसनं सत्तर वर्षांत काहीच केलं नाही असा रेटून केलेला प्रचार लोकांच्या मनात फिट झाला. काय केलं काँग्रेसनं? काँग्रेसमुळे देशाची फाळणी झाली, दुष्काळ पडला, महापूर आला असं बरंच काही ठोकलं गेलं की लोकही म्हणाले की काय केलं काँग्रेसनं? कुणाच्याच लक्षात आलं नाही की येऊ दिलं नाही की तिनं देश सुरक्षित ठेवला. माणसं जिवंत ठेवली. याच काळात आपला माणूस चंद्रावर गेला. अनेक

गोष्टींचं राष्ट्रीयकरण झालं. पण हे ऐकायला कोणी तयार नव्हतं किंवा ते न ऐकता पुन्हा लोक प्रतिप्रश्नच करतील की काय केलं काँग्रेसनं, अशी ट्यूशन न घेता व्यवस्था केली होती. गेली पाच वर्षे गांधी, काँग्रेस, तिचे नेते, डावे, धर्मनिरपेक्षतावादी वगैरेंना द्वेषाचा विषय बनवण्यात आला होता. राहुल गांधींनी मोठ्या प्रेमानं मोदींना मिठी मारली तरी हा द्वेष काही संपत नव्हता. 'तेरा बाप भ्रष्टाचारी'पर्यंत तो जाऊन पोहोचला. काँग्रेसमुक्त भारत घोषणा शायनिंग इंडियापर्यंत पोहोचायला लागली. लोकशाही व्यवस्थेत एखाद्याला संपवूनच टाकू, अशा घोषणा कशा काय होतात? काँग्रेसमुक्त भारत याच्या विरोधात कोणी आगाऊपणा करून 'भाजपमुक्त भारत' अशी घोषणा केली असती तर? पण तसं कोणी करणार नव्हतं; कारण भाजपनं स्वतःला राष्ट्र म्हणून कधीच जाहीर केलं होतं.


निवडणूक प्रचारात साऱ्या विरोधकांना भाजपनं स्वतःच्या मागं फरफटत नेलं. ही फरफट इतकी वेगवान आणि बलशाही हॉर्सपॉवरची होती की, विरोधक फरफटत गेलेच. यांनी न्यायाची कल्पना मांडायची आणि त्यांनी लष्कराच्या नौकेतील सहल काढायची. यांनी राफेल काढायचं तर त्यांनी सर्जिकल स्ट्राईक दाखवायचं. यांनी अंबानी काढायचा तर त्यांनी राम मंदिराची प्रतिकृती दाखवायची, यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या दाखवायच्या तर त्यांनी कुंभमेळ्यातील स्नान दाखवायचं. भाजपला खोडता-खोडता सारे विरोधक त्यांच्याच अजेंड्यात अडकले. कुणाला काही कळूच नये अशी व्यवस्था तयार झाली. 'चौकीदार चोर है' ते 'होय आम्ही चौकीदारच आहोत' इथपर्यंत सारं घडत राहिलं किंवा घडवलं गेलं. निवडणुकीच्या शेवटच्या चरणात तर वातावरण एकदम इश्यूलेस झालं आणि ते अध्यात्मावर स्थिर केलं गेलं. विरोधकांनी उपस्थित केलेले आणि जनतेच्या मनात तयार होऊ पाहणारे सगळेच्या सगळे विषय गुहेतल्या ध्यानात विलीन झाले. परिणाम, मोदींना महापुरुषाच्या अवताराच्या रूपात पाहण्यात आलं. मला देश बलवान करायचा आहे, अजून पाच वर्षांची संधी द्या, अशी विनवणी ते करत राहिले आणि मतदारांनी छप्पर फाड के दिलं.

या निवडणुकीत काँग्रेसमुक्त भारत झाला असं जाहीर करण्याची घाई अनेकांना झाली. पण ते हे विसरताहेत की काँग्रेसमधून फितुरी करून गेलेल्यांचीच भाजपमध्ये अधिक संख्या आहे. हे जोपर्यंत भाजपमध्ये दुकानदारी करत आहेत तोपर्यंत काँग्रेसमुक्त भारत कसा करणार? काँग्रेस पन्नासेक जागांवर थांबली असली तरी ती विरोधी पक्ष आहेच. राष्ट्रीय पातळीवरचा आणि दीडशे वर्षे परंपरेचा आहे. भारताला काँग्रेसपासून मुक्त करायचं याचा अर्थ लोकशाहीत विरोधकांना संपवायचं. काँग्रेसमुक्त भारत म्हणणं चुकीचं आहे असं संघातल्या कुणीतरी वरवरचं का असंना म्हटलं होतं. काँग्रेसमुक्त किंवा विरोधकमुक्त भारत म्हणजे लोकशाहीची वाट लागलीच! कोणतीही लोकशाही, संसदप्रणाली बळकट करण्यात, ती विश्वासार्ह बनवण्यात विरोधी पक्षांची भूमिका महत्त्वाची असते. तिचं कणखर अस्तित्व आवश्यक असतं. राजकीय परिभाषेत बोलायचं तर विरोधी पक्षांचा लोप म्हणजे एकाधिकारशाहीचा जन्म असतो. आम्ही संविधानाचा आदर करतो. तिची पूजा करतो असं खोटं खोटं सांगणाऱ्यांच्या लक्षात हे येत नाही असं थोडंच आहे. प्रश्न आहे तो लोकशाहीचं आणि विरोधकांचं नातं किती जवळचं आणि किती दूरचं आहे याचा. निवडणुकांमध्ये विजय किंवा पराभव म्हणजे लोकशाही नसते. खरं तर तो मतांचा, आकड्यांचा एक खेळ असतो. पाच वर्षांसाठी तो चालतो. त्या खेळाच्या पलीकडे जी लोकशाही असते तिचं रूपांतर जीवनशैलीत बनवायचं असतं. तिच्यासाठीचा अजेंडा हे लोक का जाहीर करत नाहीत आणि लोक आपल्या लोकशाहीला डीएनएचा हिस्सा का बनवत नाहीत? ते नामधारी राजेरजवाड्यांच्या मागं, कुटुंबकबिल्याला लोकशाही म्हणणाऱ्यांच्या मागं का धावतात? एका महाराष्ट्रात जवळपास अर्धा डझन नातू कसे उभे राहतात, याबाबत कुणी लोकांचं प्रबोधन केलं, ना करायची इच्छा आहे. मुद्दा आहे तो सैतानी बहुमताचा. हे बहुमत काही आकाशातून पडलेलं नाही. लोकांनी ते दिलंय म्हणून याचा गांभीर्यानं विचार करायला हवा. आपल्या राजकारणात मतदाराला देव, मालक, सर्वस्व, जाणता वगैरे म्हणण्याची प्रथा आहे. म्हणजे त्याचं कौतुक करून त्याचा खिसा कापण्याची प्रथा आहे. पण, खरंच आपण मतदारांचं कधी गांभीर्यानं प्रबोधन करतो? चांगला लोकशाहीवादी नागरिक म्हणून त्याला घडवतो? मताच्या खरेदी-विक्रीपासून परावृत्त करतो? निवडणुकीत महाप्रचंड पैसा येतो कोठून हे त्याला कधी समजावून सांगतो. मतदाराला मतिमंद करण्याचे प्रयत्न होतात. त्याचं कारण अशा मतदारांवर राज्य करणं सोपं असतं. त्याला संमोहित करणं सोपं असतं. एका कथेतल्या राजानं आपली सगळीच जनता वेडी व्हावी म्हणून एका विहिरीतलं मंतरलेलं पाणी त्यांना पाजलं. सगळेच वेडे झाले, पण पुढं एक अपघात झाला. लोक शहाण्या राजालाही वेडे म्हणू लागले. वेडा राजा आम्हाला नको असं म्हणून जेव्हा त्याच्यावर जमाव चालून आला तेव्हा जीव वाचवण्यासाठी राजानेही वेडे बनवणारे पाणी घेतलं. प्रत्यक्षात तो इतरांप्रमाणेच वेडा झाला. पण लोक याला शहाणे म्हणू लागले. लोकशाही ही एक प्रगत होत जाणारी गोष्ट असते आणि तिचा शेवट काय कुणाला सांगता येत नाही. साक्षर मतदार म्हणजे सही करणारे नव्हे तर विचारी मतदार. लोकशाहीवादी मतदार असतो. केवळ लाटा पाहणारा आणि त्याच्याबरोबर वाहत जाणारा नव्हे तर लाटेचं गर्भाशय शोधणारा नागरिक आपण तयार करणार आहोत का, हा सर्वांत गंभीर आणि महत्त्वाचा प्रश्न आहे. तो सोडवायचा असंल तर मतदाराला महाकाय आणि चमत्कारी रूपातून बाहेर काढायला हवं.

कोणत्याही लढतीत म्हणजे निवडणुकीतही कुणीतरी एक शत्रू असतो. म्हणजे शत्रूपक्ष असतो. आताच्या निवडणुकीत काँग्रेससह किमान दीड-

दोन डझन पक्षांनी भाजपलाच शत्रूस्थानी मानले. प्रत्येकाला वाटत होतं की भाजप हरलाच पाहिजे. गंमत अशी होते की, हा महाबलवान शत्रू हरवण्यासाठी प्रत्येक जण स्वतंत्र प्रयत्न करत होते. एक डझन लोकांना तरी पंतप्रधान व्हायचं होतं. ज्यांचा भोपळाही फुटला नाही त्यांनाही असंच स्वप्न पडत होतं. भाजप आपला कॉमन शत्रू आहे, कॉमन मुकाबला करू असं खूप कमी जणांना वाटलं. जे जे स्वतः ला भाजपविरोधक, पुरोगामी, क्रांतिकारी आणि कट्टर आंबेडकरवादी समजत होते अशा सर्वांनी स्वतंत्र लढण्याचं ठरवलं. याउलट भाजपनं केलं. ज्या प्रदेशात आपला पायरोव व्हायला हवा, परिणाम व्हायला हवा अशा प्रदेशातील अनेकांशी त्यांनी मैत्री केली. टिकवली. निवडणुकीत वापरली. याउलट विरोधकांच्या आघाडीवर होतं. दोन डावे कधी एकत्र आले नाहीत. तमिळनाडूत द्रमुकच्या नेतृत्वाखाली आले; पण इतरत्र स्वतंत्रपणे लढले. समाजवादी एकत्र आले नाहीत. उत्तर प्रदेशात बसपा-सपा यांना एकत्र येण्यास उशीर झाला. पण त्यांनी काँग्रेसला वाळीत टाकलं. कर्नाटकात, मध्य प्रदेशात ज्या काँग्रेसला पाठिंबा दिला त्यांना यूपीत बहिष्कृत केलं. पाच मुख्य राज्ये आपल्या ताब्यात ठेवणारी काँग्रेस आपण स्वतंत्र उभे राहू शकतो या भ्रमात राहिली. भाजपला हेच तर पाहिजं होतं. 'तुम्हारे आगे आनेवाले पीएम का नाम क्या है' या सवालावर विरोधकांकडे उत्तर नव्हतं. मग लाजेखातर का असेना पण हे कधी राहुल, कधी मायावती, कधी दाढीवाले नायडू, कधी बंगाली दीदी, कधी शरद पवार अशी नावं घेत कधी कधी 'हमारे पास पीएमवाले बहोत कॅन्डिडेट है' असं सांगत राहील. 'शत्रूचा शत्रू तो मित्र' या समीकरणाला हात घातला गेलाच नाही. महाराष्ट्रात वंचितांच्या आघाडीनं मिळवलेली पथ्ये भाजपच्या पथ्यावर पडली हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही.

आपला शत्रू कोण आणि त्याला हरवायचं कसं, याचा सामुदायिक विचार मतदान तोंडावर आलं तरी होत नव्हता.



**विरोधकांनी उपस्थित केलेले आणि जनतेच्या मनात तयार होऊ पाहणारे सगळेच्या सगळे विषय गुहेतल्या ध्यानात विलीन झाले.**

मोदींचा विजय एका अर्थानं विरोधकांच्या फुटींचा, त्यांच्या चिकित्सतेचा, त्यांच्यातील अहंकाराचा आणि परस्परातील मारामाऱ्यांचाही ठरू शकतो. खरं तर, अशा निष्कर्षापर्यंत पोहोचणं हाही एक शिक्षणाचा किंवा प्रबोधनाचा मार्ग आहे. याचा अर्थ असा नव्हे की, या नेत्यांना यातलं काही कळत नाहीय. सारं काही कळतं. पण शत्रूशी टक्कर होण्याऐवजी परस्परांशीच टक्कर पाहायला मिळाली. आजचा आणि उद्याचा काळ प्रादेशिक पक्षांचा, छोट्या-छोट्या पक्षांचा आहे. स्वतःला राष्ट्रीय समजणारे पक्ष या साऱ्यांना मुख्य शत्रूशी करावयाच्या लढतीत कसा वापर करतात हे खूप खूप महत्त्वाचं आहे. आपलं राजकारण राष्ट्रातून प्रदेशात, प्रदेशातून जिल्ह्यात, पाड्यात, भाषेत, धर्मात, जातीत गटांगळ्या खाताना दिसतं आहे. झोपेचे सोंग घ्यायचे म्हटल्यास यातील काहीच समजणार नाही. जागे व्हायचे ठरवल्यास स्वतःतील अहंकाराला प्रथम मारावं लागेल. एकटेदुकटे गेल्यास शत्रू हरत नाही आणि सारे जण मिळून गेल्यास तो बहुमत प्राप्त करू शकत नाही, असा हा विषय आहे.

तर पुन्हा एकदा सैतानी बहुमताकडे वळू या. खरे तर इतके मोठं यश मिळेल याची खात्री भाजपला होती. भाजपच्या नावानं जागर घालत असलेल्या मीडियाला होती. एक्झिट पोलवाल्यांना होती. विरोधकांनाच ती नव्हती. त्यांना वाटत होतं की, ऑनलाईन करन्सी, नोटाबंदी, राफेल, महागाई वगैरे प्रश्नांना मतदार आपल्याला शिंगावर घेतील. मतदाराच्या दृष्टीनं आता नोकऱ्या, महागाई आणि भ्रष्टाचार यात नवं काहीच नाहीय. ते तर त्यांच्या पाचवीलाच पुजलं आहे. याचा अभ्यास भाजपनं केला. 'कुछ अलग करते है, कुछ प्रभू की सोचते है, गंगा मैया की सोचते है, नथुराम की सोचते है' असं ठरवून मतदाराच्या मनावर ते बिंबवलं. नरेंद्र मोदी या नावाचा शॉर्टफार्म 'नमो' असा करण्यात आला. त्यांना अवतार कल्पनेत जागा देण्याचा प्रयत्न झाला. त्यांच्या मंदिरासाठी हालचाली सुरू झाल्या. 'चायवाला पोरगा' ते अध्यात्मातला महाशक्तिमान असा प्रयोग गेल्या पाच वर्षांत झाला. सबब देशाच्या भौतिक, आर्थिक जीवनात ते काय करतात असा प्रश्न कोणी विचारत नव्हता आणि कोणी केलाच तर जा पाकिस्तानात, राष्ट्रद्रोही कुठला अशी उत्तरं तयारच होती. एकीकडे राज्यघटना आणि डॉ. बाबासाहेब पूजास्थानी आणि दुसरीकडे त्यांचंच नाव घेत क्रांती असं काहीतरी चालत होतं. काँग्रेसनं संघावर बंदी आणण्यासाठी कायदा करावा (अर्थात सत्तेवर आल्यावर) अशी मागणी प्रकाश आंबेडकर करत होते आणि काँग्रेस म्हणत होती की, तुम्हीच आराखडा तयार करा. झालं काहीच नाही. निवृत्त राष्ट्रपती प्रणव मुखर्जी रेशीम बागेत गेले. भारतरत्नचे धनी झाले. या साऱ्या गोष्टी योगायोग नव्हत्या. एक जाणीवपूर्वक, दीर्घकालीन प्रयत्न त्यामागं होता.

निवडणूक निकालानंतर कोण हरलं,

कोण जिंकलं यावर चर्चा सुरू आहे. संसदेच्या पाया पडून मोदी आत गेले की, चर्चाही बंद होईल. पण या निकालाचे राष्ट्राच्या जीवनात आत आणि बाहेर काय परिणाम होतील, यावर विचार करायला वेळ कुणाकडं असणार नाही.

प्रबळ विरोधी पक्षाशिवाय लोकशाही टिकेल काय किंवा तिला लोकशाही म्हणतील काय? याचे उत्तर अर्थातच नाही. डॉ. बाबासाहेबांनी अनेक वेळा संसदेत आणि बाहेर अतिशय गांभीर्यानं याविषयी विचार मांडला आहे. विरोधी पक्ष नसणे किंवा तो लुळा-पांगळा असणे म्हणजे हृदयाशिवाय शरीर असणं होय. जे आता कमी-जास्त प्रमाणात दिसतं आहे. काँग्रेसमुक्त भारताचा अर्थ काय? जे कोणी विरोधक असतील ते भाजपच्या मुठीत मावावे लागतील किंवा भाजपनेच विरोधी पक्षाची भूमिका करणे होय. पण सत्ताधारी त्यातही शहाणा, सत्ताधारी स्वतःला कधीही विरोधकांच्या भूमिकेत नेत नाही. या निवडणुकीनंतर दीड-दोन डझन म्हणजे जवळपास अर्धा भारत असा तयार झाला आहे की, लोकसभेत आवाज उठवायला तेथून कोणी विरोधक निवडून आलेला नाही. या साऱ्या जनतेचा निखळ आवाज, साऱ्या जनतेचे निखळ प्रतिनिधित्व कोण करणार? 'सब का साथ, सब का विकास' होतोय की नाही हे कोण विचारणार? आणि जर असं काही घडलंच नाही तर सरकार म्हणेल तीच पूर्व दिशा असंल. सरकारला ना कोणी विचारणार, ना कोणी त्याच्यावर अंकुश ठेवणार वगैरे काहीच असणार नाही. विरोधी पक्षाशिवाय लोकसभा म्हणजे शिड नसलेलं जहाजच म्हणावं लागेल. जहाज कुठं जाईल, काय घेऊन जाईल कुणालाच सांगता येणार नाही. जहाजावर कुणाचं नाव असंल राष्ट्रवादाचं, देवाचं, धर्माचं की राष्ट्राचं? विरोधी पक्षांचा अभाव किंवा कमजोर विरोधी पक्ष लोकशाही, संसद बळकट करू शकत नाहीत. शॅडो कॅबिनेटची भूमिका पार पाडू शकत नाहीत. सबब लोकशाहीच्या आणि राष्ट्राच्या वाटचालीत अडथळा येतो. 'हम करे सो कायदा' सुरू होतो आणि यालाच एकाधिकारशाहीकडे वाटचाल असं म्हणतात. जगात अनेक ठिकाणी अशी उदाहरणं घडली आहेत आणि याचं एकमेव कारण सैतानी बहुमताचा अर्थ न घेणं किंवा चुकीचा घेणं असा होतो. एकाधिकारशाही कुठल्याच समाजाला परवडत नाहीय म्हणून लोकांनीच त्याचा विचार करायला हवा.

धर्मनिरपेक्षता हा आपल्या लोकशाहीचा एक दागिना आहे. मूल्य आहे. समाज नैतिक, समताधिष्ठित बनवण्याचं ते एक साधन आहे. या अनोख्या तत्त्वाला राज्यघटनेच्या उद्देशिकांमध्ये जागा मिळाली आहे. लोकशाही आणि राष्ट्र सदृढपणे जगायचं असेल तर नागरिकांनी आपल्या धर्मकल्पना इतरांवर लादणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. धर्म घरात दरवाजाआड असला पाहिजे. खासगी जीवनाचा भाग असला पाहिजे. एक धर्मीयानं दुसऱ्या धर्मीयाला तुच्छ मानू नये. त्याचा द्वेष करू नये. धर्माचा जबरदस्तीनं विस्तारवाद करू नये. सरकारी, घटनात्मक गोष्टीत धर्म, जात घुसडू नये असा धर्मनिरपेक्षतेचा अर्थ आहे. समता, बंधुता वाढीला लावण्यात धर्मनिरपेक्षतेची खूप मोठी भूमिका असते. धार्मिक, जातीय भेदांना प्रतिष्ठा देणारा आणि त्या जीवनात चालवणारा समाज कधीही राष्ट्र आणि लोकशाही बळकट करू शकत नाही.

राष्ट्र टिकवायचं असंल तर या सर्व प्रकारच्या विषमता खलास करायला हव्यात. त्या तशाच ठेवल्यास त्यांचं रूपांतर वाळवीमध्ये होतं. त्या प्रथम पाया आणि नंतर स्वाभाविकच इमारत कुरतडायला लागतात. ते टाळायचं असंल तर लोकशाहीला धर्म, जाती, अध्यात्म यांपासून दूर ठेवायला हवं. पण गेल्या पाच वर्षांत आपण वेगळंच पाहतो आहोत. ज्यांना बाजूला ठेवायचं त्यांना प्रतिष्ठा प्राप्त होताना दिसते आहे. धर्म आणि राजकारण, अध्यात्म आणि राजकारण यांची सरमिसळ चालू आहे. भगव्यातल्या अनेकांनी निवडणुका जिंकल्या. ते संसदेत गेले. स्वाभाविकच लोकशाही आणि धर्म यांच्या नात्यात गफलत होऊ लागली. महात्मा गांधींना देशद्रोही म्हणणाऱ्या निवडून गेल्या. देवांची कुळीमुळी काढणारे निवडून गेले. स्फोटाचा आरोप असलेले निवडून गेले. या सर्वांची धर्मनिरपेक्षता वेगळीच आहे. त्याची झलक भाजपच्या विजयानंतर मोदींनी केलेल्या भाषणात दिसून आली. छोट्याशा भाषणात त्यांनी धर्मनिरपेक्षतेला मुद्दाम जागा दिल्याचं दिसतं. ते म्हणाले, तीस वर्षांपूर्वी खरं तर अनेक दिवसांपासून एक नाटक आपल्याकडं चालू आहे. एक टॅग आला. त्याचं नाव होतं धर्मनिरपेक्षता! ज्याचा पदर ओढला की, सारी पापं धुतली जातात. 'सर्व धर्मनिरपेक्षवाद्यांनो एक व्हा' अशा घोषणा दिल्या जायच्या. तुम्ही सर्वांनी पाहिलंच आहे की, २०१४ ते २०१९ पर्यंत या जमातीनं बोलणंच बंद केलं आहे. ही अशी पहिली निवडणूक आहे की, एकही पक्ष धर्मनिरपेक्षतेचा बुरखा पांघरूण लोकांची दिशाभूल करण्याची हिंमत बाळगू शकला नाही. याचा अर्थ काय धर्मनिरपेक्षतेचा द्वेष करणाऱ्या, ती संपली म्हणणाऱ्या, तिला तुच्छ मानणाऱ्याच्या हातात सत्ता गेलीय.. सैतानी बहुमत मिळवून...

मोदींच्या मते धर्मनिरपेक्षता म्हणजे एक द्वेषभावना आहे. धर्मनिरपेक्षतेचा जागर करणारे जणू काही समाजद्रोहीच आहेत. ते समाजाची दिशाभूल करतात. या विचारधारेला त्यांनी टॅगवर म्हणजे खुंटीवर अडकवलं आहे. त्यांच्या मते आता देशात जातच शिल्लक राहणार नाही. शिल्लक राहतील ते दोन घटक. गरीब आणि श्रीमंत. खरं तर, असं बोलून त्यांनी धर्मवाद मिटवणाऱ्या डाव्यांचीही कोंडी केली आहे. वाजपेयी पंतप्रधान असतानाही दक्षिण आफ्रिकेत गेलेल्या आपल्या शिष्टमंडळानं भारतात जाती नव्हत्या आणि नाहीत असं अधिकृत विधान केलं होतं. त्यावेळी भाजपबाहेर असणाऱ्या रामदास आठवले यांनी विरोध केला होता. आज ते करणार नाहीत; कारण मोदींच्या कर्तृत्वातून उगवलेल्या कमळाचे ते सर्वांत मोठे भक्त आहेत. मोदींमध्ये ते सर्वांत मोठे आंबेडकरवादी पाहतात. असो काळ मोठा विचित्र असतो.

धर्मनिरपेक्षतेचा विचार मांडणारे हिंदू राष्ट्राचे विरोधक असतात. धर्मनिरपेक्षतावाल्यांना राष्ट्र पाहिजे असतं.

फार तर जनकल्याणकारी राष्ट्र हवं असतं; पण धर्मनिरपेक्षता धर्माधिष्ठित राष्ट्राच्या आड येते. उजव्यांच्या कॅम्पमध्ये धर्मनिरपेक्षता शिवीसारखी असते. लोक शिव्या देत आले. लोक म्हणजे हे लोक द्वेष करत आले. कुणाच्या रक्तात हिंदूंचा अंश आहे हेही शोधत आलो. फरक एवढाच की, आता पाशवी बहुमत मिळाल्याने ते रोज असं बोलत राहतील. आता हिंदू राष्ट्र म्हणजे काय, हेही अगोदरच ठरलं आहे. हिंदू राष्ट्र म्हणजे 'मनुस्मृती'वर चालणारं राष्ट्र. गेल्या पाच वर्षांत किती वेळा आणि कोणी मनूचा उदो-उदो केला हेही गुगलसाहेबांनी आपल्या बँकेत जपून ठेवलेलंच आहे. मनूचं नाव घ्यायला पूर्वी बिचकलं जायचं; पण राजस्थानमध्ये त्याचा पुतळाच उभा राहिल्यावर आता त्यांना धीर आलाय. आता या मार्गाकडे जाण्यासाठी गतिरोधक तयार होतील का? कोण ते तयार करेल याविषयी काही सांगता येत नाही. भाजपचा विचार हा सतत हिंदू राष्ट्राकडेच जाणारा असतो. ते आता लपवाछपवी करत नाहीत. उद्याही करणार नाहीत. पाशवी बहुमतामुळे एकाधिकारशाही ते फॅसिझमपर्यंत काहीही घडू शकतं. यापूर्वीही घडलं आहे. अशा परिस्थितीत संसदेतलं विरोधकांचं राजकारण फार परिणामकारक होणार नाही; कारण त्यांचा आवाज क्षीण आहे. ज्यांना थोडाफार आवाज होता ते फितूर होऊन कमळाच्या पंखात दडले आहेत आणि सर्वच विरोधक अशा विचारांचे म्हणजे धर्मनिरपेक्षतेचे समर्थक आहेत असेही नाही. मग काय करायचं? अशा परिस्थितीत संसदबाह्य राजकारण खूप महत्त्वाचं ठरतं. तिथंच शिक्षण, तिथं संघटन, तिथं जागृती करण्यासाठी विचारवंतांनी, कार्यकर्त्यांनी पुढं आलं पाहिजे. गेल्या काही वर्षांत संसदीय राजकारणानं संसदबाह्य राजकारण संपवून टाकलं आहे असं समजू नये, अशी तक्रारही करू नये. कारण संसदबाह्य राजकारण कधी संपत नाही. भाजपला मिळालेल्या बहुमताचा द्वेष न करता, त्याला चमत्कार न जोडता किंवा समाज हरला असं न म्हणता या बहुमताची वेसण तुटणार नाही आणि नको तेवढे ते भरकटणार नाही याची काळजी बहुमत देणाऱ्यांनीच घ्यायची असते. पक्ष, राष्ट्र, नेता यातील फरक ओळखला पाहिजे. देवाच्या भूमिकेतून मतदारांनी बाहेर पडायचे आहे. 'देव' या विशेषणाला जर मतदार भाळला तर तो काहीच करू शकणार नाही. कौल उजवीकडे की डावीकडे एवढंच तो बघत राहील. आपण हिंदुत्ववादी आहेत हे संघानं किंवा त्याच्या चार-पाचशे अपत्यांनी नाकारलेलं नाही. खरं तर, याविषयी संघाला धन्यवाद द्यावे लागतील. अलीकडे त्याचा संसदीय राबता वाढल्यामुळे ते हिंदुत्वापासून समरसतेपर्यंत सारे खुलेआम करतात. घाबरत नाहीत. त्यांना घाबरवणारे दुर्बल होत आहेत किंवा फुटीच्या पोलिओनं जर्जर होत आहेत. नागपुरातून बाहेर पडलेलं हिंदुत्व सामान्य माणसाच्या मनात बिंबवण्यात ते थोडेफार यशस्वी होत आहेत. हिंदुत्वाविषयी आदर बाळगणारा किंवा आंधळेपणानं तो स्वीकारणारा मतदार तयार करण्यातही ते यशस्वी होत आहेत. महाकाय संघटन, त्याग, सातत्य वगैरे वैशिष्ट्ये हे त्यांचं बळ आहे. खरं तर, तेही अशाच बहुमताची वाट पाहत असावेत यात काही शंका नाही. त्यांची हिंदुत्वाची, धर्मनिरपेक्षतेची, धर्माची, हिंदूंची व्याख्या वेगळी आहे. राष्ट्राची आणि भारताची कल्पनाही वेगळी आहे, हेही त्यांनी कधीच उघड केलं आहे. त्यामुळे या पाशवी बहुमताचा वापर कसा होणार, कशासाठी होणार, नवा भारत म्हणजे नेमकं काय, बलशाही भारत म्हणजे नेमकं काय आदी गोष्टी उघड व्हायला लागतील. बहुमतामुळे पत्ते ओपन करायला संधी मिळणार आहे. पत्ते खुले होतील तेव्हा आपण डोळे बंद करणार की डोळे उघडणार, असा प्रश्नही पाशवी बहुमतानं व्यक्त केला आहे. मनूच्या मार्गातील रेड सिग्नल हिरवे होतील का, असाही प्रश्न उपस्थित केला आहे. प्रसिद्ध लोककवी वामनदादा कर्डक यांच्या बाबासाहेबांच्या लेखणीवरील एका कवितेची आठवण यायला लागते. 'भीमाच्या लेखणीमुळे मनूचा मुडदा गाडला रणी' अशी एक ओळ त्यात येते. 'मनुत्व म्हणजेच हिंदुत्व' हेही लोकांना ठाऊक आहे, तर गाडलेला मनू निर्विघ्नपणे बाहेर पडणार आहे का, हाही प्रश्न बहुमतानं तयार केला आहे. मोदी कधी तरी ऐकण्याऐवजी स्वतःच 'मन की बात' सांगतील तेव्हा या साऱ्या प्रश्नांचे पडसाद त्यात उमटतील का, हे पाहायचंय.

यंदा लोकसभेत जाणाऱ्या मुस्लिम सदस्यांची संख्या वाढली असली तरी भाजपमधून एकही उमेदवार निवडून आला नाही. या पक्षानं सहा उमेदवार उभे केले होते. सगळेच कसे काय पडले, याविषयी आश्चर्य व्यक्त होत आहे. बहुतेक प्रादेशिक पक्षांनीच मुस्लिम उमेदवार निवडून आणले आहेत. याला काय योगायोग समजावा काय? निवडणूक काळात भेडसावणारे अनेक प्रश्न पद्धतशीरपणे राष्ट्रवादाकडं वळवण्यात आले. जगातल्या महत्त्वाच्या अनेक वर्तमानपत्रांनी हे उघडपणे लिहिलं आहे. ऐन निवडणुकीत 'टाइम' या जगप्रसिद्ध आणि विश्वासार्ह मासिकानं तर मोदी विभाजनवादी नेते असल्याचा लेख लिहिला होता. असाच सूर आता निकालानंतर प्रमुख वर्तमानपत्रांनी आळवला आहे. स्वतःला चौकीदार समजणाऱ्या मोदींनी हिंदू राष्ट्रवाद बळकट करत विजय मिळवला, असं 'न्यू यॉर्क टाइम्स'नं म्हटलं आहे. मोदींना मिळालेल्या यशामुळे भारतानं हिंदू राष्ट्रवादाच्या नव्या युगात प्रवेश केला, असं 'द गार्डीयन' या वर्तमानपत्रानं म्हटलं आहे. एवढंच नव्हे, तर अल्पसंख्याकांना दुय्यम मानणाऱ्या लोकप्रिय नेत्याची जगाला गरज नाही हेही 'द गार्डीयन'ने स्पष्टपणे नोंदवले आहे. मोदींच्या काळात अल्पसंख्याकांना असुरक्षित वाटत होतं, असे 'न्यू यॉर्क टाइम्स'नं म्हटलं आहे. राष्ट्रवादाचे आवाहन करत मोदींनी निवडणूक जिंकली, असे 'वॉशिंग्टन पोस्ट'नं म्हटलं आहे. 'बीबीसी'ने याही पुढं जाऊन हिंदू राष्ट्रवादाचं राजकारण म्हणजे हा विजय असं लिहिलं आहे. मोदी विजयी होणारच होते; पण त्यांना एवढे पाशवी बहुमत कसे मिळाले हे मी मी म्हणणाऱ्यालाही सांगता येत नाही. प्रत्येकाच्या ओठावर एकच प्रश्न उरतो आणि तो म्हणजे हे कसं काय घडलं? हळूहळू याची उत्तरं बाहेरही पडतीलच. ●●●

# हिंदूराष्ट्र बनवण्याचा भाजपचा डाव उधळला पाहिजे



न्या. पी.बी. सावंत

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत प्रचंड यश मिळवून भारतीय जनता पक्ष केंद्रात सलग दुसऱ्यांदा सत्तेवर आला आहे. शिवसेनेला धरून भाजपप्रणित एनडीएला ३५२ जागा मिळाल्या आहेत. भारतीय जनता पक्षाचा हा विजय जितका धक्कादायक तितकाच अनपेक्षितही आहे. याला अनेक कारणं आहेत. पहिले कारण असे की, या पक्षाने इतर सर्व विरोधी पक्षांमध्ये फाटाफूट निर्माण करण्यात प्रचंड यश मिळवले. दुसरे कारण असे की, विरोधी पक्षातील किंवा आघाडीतील काही लोक आणि काही संघटना विकत घेण्यामध्ये ते यशस्वी झाले. विरोधी पक्षाचे उमेदवार पाडून स्वतःच्या पक्षाचे उमेदवार निवडून आणण्यामध्येही त्यांना यश मिळालेले आहे. तिसरे आणि महत्त्वाचे कारण असे की, गेल्या जवळपास वर्षभरात ते निवडणूक व्यवस्थापन (इलेक्शन मॅनेजमेंट) करत आलेले आहेत. या निवडणुकीच्या तयारीसाठी त्यांच्याकडे कार्यकर्त्यांची फौज होती. कार्यकर्ता पोसण्याइतका पैसा किंवा त्याच्यापेक्षाही अधिक पैसा त्यांच्याजवळ आहे. प्रत्येक बुथमागे जवळपास १० पेड (paid) कार्यकर्ते त्यांनी ठेवलेले होते आणि ते गेली किमान ६ महिने तरी रात्रंदिवस काम करत होते. त्यामुळे प्रत्येक गावातला, प्रत्येक शहरातला, प्रत्येक वॉर्डातला मतदार त्यांच्या संपर्कात होता. हे सारे मतदार आपलेच आहेत या भावनेतून त्यांनी त्यांची जोपासनाही केली. त्यांचे कौटुंबिक प्रश्न सोडवण्याचे कार्यही भाजप कार्यकर्त्यांनी केले. यावेळी त्यांनी आपला पैसा केवळ प्रचारावर किंवा केवळ मतदार विकत घेण्यावर खर्च केला नाही तर व्यवस्थितपणे नियोजन करून जातीचं, धर्माचं निरनिराळ्या लॉयलटीजच त्यांनी मतदार आपल्या ताब्यात घेतले, हे महत्त्वाचे कारण आहे. निवडणूक जिंकण्यासाठी आवश्यक असलेले नियोजन करण्यामध्ये ते पूर्णपणे यशस्वी ठरले. त्यांना मिळालेल्या या मोठ्या विजयाचे मुख्य कारण निवडणुकीचे व्यवस्थापन हेच आहे. त्याचबरोबर खोटा प्रचार करणे, जाहिरातबाजी करणे यावरही त्यांनी भर दिला. पैशांचा पाऊस तर पडतच होता. या सर्व मार्गांचा अवलंब करून त्यांनी अगदी व्यवस्थितपणे निवडणूक जिंकली.

दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, मोदींची लोकप्रियता संपूर्णपणे ओसरलेली असताना पुलवामा येथे जवानांवर हल्ला झाला, ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे. या घटनेची कारणमीमांसा करण्याची गरज मिडियाला वाटली नाही किंवा विरोधी पक्षांनीही त्याच्यावर भर दिलेला नाही. पुलवामा इन्सिडेन्ट हा घडवून आणलेला हल्ला आहे, असं माझं ठाम मत आहे.

या हल्ल्याबद्दल कोणी काहीही बोललं नाही. त्यावेळी वृत्तपत्रात माझा एक लेख प्रसिद्ध झाला होता. लोकमतमध्ये माझी मुलाखतही प्रसिद्ध झाली होती. त्या मुलाखतीत मी या हल्ल्याच्या अनुषंगाने तीन प्रश्न उपस्थित केले होते. सैनिक आणि सैन्याची शस्त्रास्त्रे घेऊन जाणारा जवळजवळ ७८ गाड्यांचा हा ताफा होता आणि तो जम्मूकडून श्रीनगरकडे जात होता. नियम असा आहे की, ज्यावेळेला सैन्याचा ताफा जात असतो त्यावेळी दोन तासांपूर्वी आणि दोन तासानंतर कुठलीही खाजगी वाहतूक चालू दिली जात नाही. एवढेच नव्हे तर, रस्त्याच्या दोन्ही बाजूला अर्ध्या-अर्ध्या किलोमीटर मार्गावर कुठे धोकादायक बॉम्ब किंवा स्फोट घडवण्याकरता इलेक्ट्रीक वायर वगैरे ठेवलेली आहे का किंवा आजूबाजूला असे कोणी लपलेले आहेत का? याची कसून तपासणी केली जाते. ही पाहणी करण्याकरिता रस्त्याच्या दोन्ही बाजूला अर्धा-अर्धा किलोमीटर ताफा असतो. असे असताना आणि एवढा मोठा ताफा जात असताना तिथं खाजगी गाडीतून ताफ्यावर हल्ला करण्यात आला. त्या खाजगी गाडीला तिथे जाण्याची परवानगी दिली कोणी? याला जबाबदार कोण? त्याबद्दल सरकारने काहीही स्पष्टीकरण दिलेले नाही, असा प्रश्न मी उपस्थित केला होता. लष्करप्रमुख, संरक्षणमंत्री आणि प्रधानमंत्र्यांनी याचे उत्तर द्यायला पाहिजे. पुलवामा हल्ल्यात आमचे एकंदर ४२ जवान शहीद झालेले आहेत. याचा सूड घेतला असे दाखविण्याकरिता बालाकोटला लष्कराने हवाईहल्ला केला. या हल्ल्यात पाकिस्तानमधल्या दहशतवाद्यांचा तळ उद्ध्वस्त होऊन २५० ते ३०० दहशतवादी मारले गेल्याचा दावा भाजप अध्यक्ष अमित शाह यांनी केला. तिथे प्राणहानी झालेली नसताना शाह यांनी कशाच्या आधारे असा दावा केला? की हे सर्व पूर्वनियोजित होतं? पाकिस्तानने तर हल्ल्याला उत्तरच दिलेलं नाही. कारण, त्यांचं काहीच नुकसान झालेलं नव्हतं. पुलवामा हल्ल्याचा आम्ही सूड घेतला हे लोकांना दाखवून द्यायचे म्हणून भारतीय लष्कराने बालाकोटमध्ये निर्जन प्रदेशात हल्ला केला. निवडणुकीत आपल्याला फायदा व्हावा म्हणून हा हल्ला घडवून आणला होता. हल्ला नेमका कोणी घडवून आणला हे आम्हाला समजले पाहिजे. या प्रश्नाचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे. पण या दोन्ही घटनांचा उपयोग निवडणूक प्रचारात फार मोठ्या प्रमाणात करून घेण्यात आला. हा हल्ला झाला तोही निवडणुकीच्या तोंडावर. या हल्ल्याच्या वेळी जी काळजी घ्यायला पाहिजे होती ती घेण्यात आलेली नाही.

खाजगी गाडीतून येऊन हल्लेखोर जवानांवर हल्ला करतात. या खाजगी गाडीला त्या रस्त्यावरून जायला परवानगी कोणी दिली, याबद्दल सरकारकडून काहीही सांगितलं जात नाही. बालाकोटच्या हल्ल्यात कसलीही प्राणहानी झालेली नसताना २५० ते ३०० दहशतवादी मारल्याचा आव बीजेपी अध्यक्ष अमित शाह यांनी आणला, तो का आणि कशाच्या आधारावर? याची उत्तरे आम्हाला मिळाली पाहिजेत. याची चौकशी झाली पाहिजे. मी जे प्रश्न उपस्थित केले आहेत, त्याची उत्तरे अजून मिळालेली नाहीत.

मोदी सरकारची पहिली टर्म अगदी निराशाजनक होती. गेल्या पाच वर्षात हे सरकार सर्व आघाड्यांवर अपयशी ठरले. इथले गरीब, अल्पसंख्याक आणि दलित असुरक्षिततेत जगत आहेत. सामान्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्याचा प्रश्न असो की, वंचितांना सन्मानाने जगण्याची संधी मिळवून देणं असो या सर्वच बाबतीत ते अपयशी ठरले. या सरकारने ना दलितांचे प्रश्न सोडवले, ना शेतकऱ्यांचे. अल्पसंख्याकांच्या बाबतीतही असेच निराशाजनक चित्र राहिले. बेरोजगारी वाढत आहे आणि ती वाढणारच आहे. कारण मोदी सरकारचा पाठिंबा भांडवलशाहीला आहे. आज भांवडलशाही माणसांऐवजी यंत्राची योजना करते. त्यामुळेच प्रत्येक क्षेत्रामध्ये बेरोजगारी निर्माण होत आहे. माणसांकडून कामे करून घेण्याऐवजी यंत्रांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असल्यामुळे असलेले रोजगारही जात आहेत आणि दुसरीकडे आम्हाला सांगण्यात येते की, आज आम्ही इतके रोजगार निर्माण केले, तितके रोजगार निर्माण केले. खोटे आकडे आहेत ते. ही आकडेवारी देणारी संस्था सरकारचीच आहे. सरकार खोटी आकडेवारी देण्यास भाग पाडते म्हणून संबंधित संस्थेतील दोन-तीन अधिकाऱ्यांनी राजीनामा दिलेला आहे. एकीकडे आम्ही इतका रोजगार निर्माण केला म्हणून आकडेवारी फुगवून सांगायची आणि दुसरीकडे ज्या उद्योगधंद्यांमधील रोजगार कमी होत आहेत, त्याबद्दल काहीही बोलायचं नाही. सगळीच बनवाबनवी. मला असं वाटतं की, या देशाची दुर्दशा अजून पूर्णपणे झालेली नाही. ती पूर्ण करण्याकरिता भाजपच्या राजवटीला अधिक वेळ मिळालेला आहे, एवढाच अर्थ मी या निवडणुकीचा घेतो. हे काय करू शकतात आणि काय करू शकत नाहीत ते आपल्याला पुढच्या पाच वर्षांमध्ये दिसणार आहे.

**सामान्यांचे प्रश्न आणखी जटील होणार** :आजची अर्थव्यवस्था जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत सामान्य माणसांचे कोणतेही आर्थिक प्रश्न सुटणार नाहीत. उद्योगपतींचे किंवा व्यापाऱ्यांचे नव्हे तर सामान्य माणसांचे कुठलेही प्रश्न सुटणार नाहीत. उलट ते बिकट होत जाणार आहेत. बेरोजगारी वाढत जाणार आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये अगदी कुटीरोद्योग असो, लघुउद्योग असो, मध्यम उद्योग असो की मोठे उद्योग, सर्वच उद्योगांमध्ये बेकारी वाढत आहे. या उद्योगांना जीएसटीचा मोठा फटका बसलाच आहे. त्यामुळे तेथे अगोदरच बेरोजगारी निर्माण झालेली आहे. हे सरकार शेतीची समस्या सोडवू शकत नाही आणि ती त्यांना सोडवताही येणार नाही. ज्या मूलभूत सुखसोयी किंवा सुविधा निर्माण व्हायला पाहिजेत, त्या झालेल्या नाहीत. त्यांच्याकडे लक्ष देण्यात आलेले नाही. उलट



**हा तर धर्माचे स्तोम माजवण्याचाच प्रकार आहे.**

जनतेला मूर्ख बनवण्याकरिता बुलेट ट्रेन, मोठमोठे रस्ते अशा योजना सरकार आणत आहे. याचा फायदा फक्त पुढारलेल्या वर्गाला आणि श्रीमंतांना होत आहे आणि पुढेही होतच राहणार आहे. हाच पैसा जर सबंध देशातील शेतीला पाणीपुरवठा करण्याकरिता वळवला गेला असता, शेतीचे उत्पादन वाढवण्याकरिता वळवला गेला असता, शेतकऱ्याला समाधान मिळवून देण्याकरिता त्याचा उपयोग करता आला असता तर देशाच्या उन्नतीचा पाया घातला गेला असता. भाजपच्या राजवटीत मात्र याच्या उलट होत आहे. कारण हा पक्ष फक्त उच्च मध्यम वर्गाकरिता आहे, कनिष्ठ मध्यम वर्गाकरिता नव्हे. उच्च मध्यमवर्ग आणि श्रीमंतवर्ग यांच्यासाठीच तो काम करतो. आपला मतदार तिथे आहे या भावनेनेच तो काम करतो. इतर समाजाची त्याला काळजी नाही. तेव्हाही नव्हती आणि यापुढेही राहणार नाही. आतापर्यंत त्यांनी सुरू केलेल्या योजना या फक्त श्रीमंत वर्गाच्या सुखसोयींसाठी आहेत.

**हिंदूराष्ट्र बनवण्याचा त्यांचा डाव** : या सरकारने विकासच केलेला नसल्यामुळे या निवडणुकीत त्यांनी विकास सोडून धर्म, राष्ट्रवाद अशा गोष्टींना अवास्तव महत्त्व दिले. यावरून ते हिंदूराष्ट्र बनवतील, राज्यघटना बदलतील अशी भीती लोकांमध्ये आहे. तसेही त्यांना आजची राज्यघटना अजिबात मान्य नाही. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद ही राज्यघटनेतील मूल्ये त्यांना मान्य नाहीत. एवढेच नव्हे तर, लोकशाहीऐवजी इथं धर्मावर आधारलेली हुकूमशाही आणावी, धर्मनिरपेक्षतेऐवजी हिंदूराष्ट्र आणावं असा त्यांचा डाव आहे. समाजवादाशी तर त्यांचं पूर्वीपासूनच वाकडं आहे. समाजवाद नष्ट होऊन भांडवलशाहीला अधिकाधिक उत्तेजन दिलं जावं याकरिता ते पूर्वीपासूनच काम करत आलेले आहेत, आजही करत आहेत, पुढेही करत राहणार आहेत. राज्यघटनेतील तरतुदी बदलण्याकरिता वाजपेयींच्या राजवटीत एक समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने सुदैवाने त्यांची ही मागणी मान्य केली नाही. त्यामुळे आता घटना बदलण्याच्या उद्योगात न पडता घटनेला बाजूला सारूनच कारभार करायचा यासाठी ते गेली पाच वर्षे काम करत आहेत. आज वारंवार घटनेची पायमल्ली होत आहे. इथं स्वतंत्रपणे काम करणाऱ्या ज्या लोकशाही संस्था होत्या, त्यांच्या स्वातंत्र्याचा आणि

स्वायत्ततेचा त्यांनी पूर्णपणे धुव्वा उडवला आणि त्या आपल्या ताब्यात घेतल्या. केवळ निवडणूक आयोगासारखी स्वायत्त यंत्रणाच नव्हे तर आयबी, सीबीआय अशा महत्त्वपूर्ण संस्थांचीही स्वायत्तता त्यांनी धोक्यात आणली आहे. प्रसार माध्यमं आणि न्यायालयीन यंत्रणासुद्धा आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. त्यांनी आपली माणसं या संस्थेत बसवली असून त्यांना पाहिजे तशी कामे या लोकांकडून करून घेतली जात आहेत. लोकशाही संस्था विस्कळीत करून त्यावर नियंत्रण मिळविण्याचे उद्योग ते पद्धतशीरपणे यापुढेही करत राहणार आहेत. त्यामुळे याबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण उरत नाही. मोदी राजवट अस्तित्वात आल्यानंतर सर्व प्रसारमाध्यमं त्यांनी आपल्या ताब्यात घेतली आहेत आणि म्हणून ही माध्यमं त्यांचाच प्रचार करीत आहेत. फारच थोड्या प्रसारमाध्यमांनी आपले स्वातंत्र्य शाबूत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे निदान काही ना काही वस्तुस्थिती आमच्यापर्यंत पोहोचते.

**धर्माचा कौशल्याने वापर** : धर्मवादी पक्ष असलेल्या भाजपला इथे हिंदू धर्माचे राज्य आणायचे आहे. जनतेला नेहमी अंधारात, संभ्रमात ठेऊन तिला जास्तीत जास्त वस्तुस्थितीकडून काल्पनिक राज्याकडे किंवा आभासी राज्याकडे घेऊन जाण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. समाजात केवळ दुही माजवण्यासाठीच नव्हे तर जनतेतील अंधश्रद्धेला खतपाणी घालून त्यांना आपल्या कह्यात ठेवण्यासाठी धर्माचा उपयोग ते अत्यंत कौशल्याने करीत आहेत. धार्मिक आणि जातीय भावनेवर आपले मतदार वाढवणं हा त्यांचा उद्देश आहे. कारण हे केल्याशिवाय आपली सत्ता शाबूत ठेवता येणार नाही, हे ते जाणून आहेत.

**विरोधी पक्ष कमी पडले** : या निवडणुकीत नरेंद्र मोदींनी जो आक्रमक प्रचार केला त्याला विरोधकांनी म्हणावे त्या प्रमाणात प्रत्युत्तर दिले नाही. मोदींनी हिंदुत्त्वाचा मुद्दा पुढे रेटला. बालाकोटचा हल्ला, सर्जिकल स्ट्राईक आणि राष्ट्रवादाकडे त्यांनी पूर्ण निवडणूक फिरवली; परंतु विरोधी पक्षांनी मात्र, राफेल विमान खरेदीत झालेला भ्रष्टाचार या एकाच मुद्यावर जोर दिला. यातही काँग्रेसच पुढे होती. भाजपचं जाती-जातीत फाटाफूट करण्याचं जे राजकारण सुरू होतं, त्याला समर्पक उत्तर विरोधी पक्षांकडून दिलं गेलं नाही. दुसरं असं की, विरोधकांकडे कार्यकर्त्यांचा फौजफाटा जवळजवळ नव्हताच. त्यामुळे ते भाजपला समर्थपणे तोंड देऊ शकले नाहीत. धर्मवादी, धर्माच्या प्रचाराने आंधळे झालेले, दुसऱ्यांनाही आंधळे करणारे, भावनिक आवाहन करून जनतेचे मन आपल्याकडे वळवण्यात भाजपचे कार्यकर्ते पुढे होते. प्रामुख्याने जातीयवादी धोरणाचा प्रचार करण्याव्यतिरिक्त मोदी दुसरं काहीही करत नव्हते. कारण लोकांना धर्माच्या नावावर एकत्र करता येतं आणि त्यांना आपल्याकडे आकर्षित करता येतं हे त्यांनी जाणलं होतं. त्यामुळं ही स्ट्रॅटेजी राबवून मोदींनी फायदा घेतला. त्यांनी आपल्या सर्व प्रचारसभांमध्ये अन्य कुठल्याही गोष्टीऐवजी धार्मिक भावनांना हात घालण्याचेच काम केले. त्यातून जनतेला संभ्रमात टाकत आभासी जग निर्माण करण्यामध्ये ते यशस्वी झाले. त्यातच अवघ्या महिन्यापूर्वी अस्तित्वात आलेली वंचित बहुजन आघाडी विरोधी पक्षांचे उमेदवार पाडणे या एकाच उद्देशाने निवडणुकीच्या रिंगणात उतरली होती. आपल्या कृतीमुळे भाजपचे उमेदवार निवडून येणार हे त्यांना १०० टक्के माहीत होते आणि त्याप्रमाणे त्यांनी काम केले. याचा अपेक्षेप्रमाणे विरोधी पक्षांना जबर फटका बसला. आपली शक्ती दाखवली तर आपल्या पदरात काहीतरी पडेल या भावनेने वंचित बहुजन आघाडीने निवडणूक लढवली पण त्यांची ही कृती भाजपच्या पथ्थ्यावर पडली.

दुसऱ्यांदा सत्तेत आलेला भाजप हा एक राष्ट्रीय आपत्तीच आहे आणि या आपत्तीपासून देशाला वाचविण्यासाठी विरोधी पक्षांनी एकत्र आले पाहिजे. केवळ निवडणुकीतपुरते एकत्र न येता आपल्याला देश बांधायचा आहे आणि राज्यघटनेतील तत्त्वाप्रमाणे लोकांचे प्रश्नही आपल्याला सोडवायचे आहेत. नवीन भारत निर्माण करायचा आहे यासाठी विरोधकांनी एकत्र आले पाहिजे.

भाजपचे सरकार दुसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर आव्हानं पूर्वी होती तीच आहेत. त्यामुळे विरोधकांनी अधिक जोमाने काम केले पाहिजे. निवडणूक निकालानंतर मोदींनी आपल्या भाषणांत साहित्यिक, विचारवंत आणि धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांवर टीका केली. या पार्श्वभूमीवर साहित्यिक विचारवंतांनी एकत्र येऊन नवीन राष्ट्र निर्माण करण्याकरिता प्रयत्न केले पाहिजेत. राज्यघटनेचा प्रचार केला पाहिजे. समाजाचे प्रबोधन केले पाहिजे.

**तरूण पिढीने राजकारणाची सूत्रे हाती घ्यावीत** : भाजप ही शक्ती या देशाला कुठल्या दिशेने घेऊन चालली आहे आणि ती राज्यघटनेविरोधी कसं कार्य करत आहे, त्यांचं धोरण शेवटी घटना उखडून टाकून त्या घटनेच्या विरोधी शक्ती निर्माण करण्याचा प्रयत्न आहे, हे लोकांना समजावून सांगितले पाहिजे, त्यांचे प्रबोधन केले पाहिजे. सर्व अजातीय शक्तींना एकत्र आणून त्यांनी बीजेपीचा हा छुपा अजेंडा लोकांसमोर उघड केला पाहिजे. त्यांना नीट समजावून सांगितलं पाहिजे. हे प्रबोधनाच कार्य आज जर त्यांनी केलं तर देश वाचवल्याचं श्रेय या पिढीला मिळेल. निदान २०१९ साली तरी या देशातल्या पुरोगामी शक्ती, संविधानाला मानणाऱ्या शक्ती एकत्र येऊन भाजपसारख्या संविधानविरोधी शक्तीला समर्थपणे तोंड देतील, अशी अपेक्षा होती. पण ते न होता उलट आम्हाला असं दिसतं की, त्यांच्यामध्ये अधिकाधिक फाटाफूट होत आहे, फूट पाडली जात आहे. त्यांच्या त्या-त्या संघटनांच्या स्वार्थी पुढाऱ्यांच्या लाभाकरिता हे सगळं होत आहे, असे दिसत आहे. तेव्हा देशातल्या तरूण पिढीने आणि प्रत्येक पक्षातल्या आणि संघटनेतल्या तरूणांनी आता एकत्र येऊन आपले नेते आपल्याला कुठे नेत आहेत? याने आपला देश पुढे जाईल का? आपला समाज पुढे जाईल का? आपली प्रगती होईल का? याचा सद्सद्विवेक बुद्धीने विचार केला पाहिजे. कारण या प्रत्येक पक्षामध्ये सरंजामशाही निर्माण झालेली आहे किंवा त्यांनी स्वतःला या सरंजामशाहीतून मुक्त करायला पाहिजे. निदान या तरूण पिढीनं तरी एकत्र येऊन नव्या राजकारणाची सर्व सूत्रे आपल्या हातात घेतली पाहिजेत आणि देशाला पुढे नेलं पाहिजे. ●●●

# मोदी एके मोदी, मोदी दुणे मोदी!



✍ **विजय नाईक,** नवी दिल्ली

जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा निवडणुकोत्सव नुकताच पार पडला. सात टप्प्यांत झालेल्या निवडणुकांच्या २३ मे रोजी लागलेल्या निकालांत मतदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्ष व राष्ट्रीय लोकशाही आघाडीला तब्बल ३५२ जागा देऊन पुन्हा पाच वर्षांसाठी सत्तेवर आणलं. २०१४ मध्ये पक्षाला २८२ जागा मिळाल्या होत्या. त्यापेक्षा २१ अधिक जागा भाजपला मिळाल्या. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे संख्याबळ ३५२ वर जाऊन पोहोचले. देशात छप्पन्न वर्षे राज्य करणाऱ्या काँग्रेसला २००९ मध्ये २०६ जागा मिळाल्या होत्या. २०१४ मध्ये घसरून काँग्रेसचे संख्याबळ केवळ ४४ वर आले व २०१९ मध्ये त्यात फक्त सात जागांची भर पडून ती संख्या ५२ झाली. लोकसभेत विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळण्यास ५४ जागांची गरज असते. काँग्रेसची ती मान्यता तर धोक्यात आलीच; परंतु मोदी यांना मतदारांनी केवळ २०२४ पर्यंतची पाच वर्षे दिली नाहीत, तर त्यापुढच्या २०२९ पर्यंत सत्ता करण्याची त्यांची महत्वाकांक्षा पल्लवित केली. त्यामुळे विरोधकांना आता 'मोदी एके मोदी, मोदी दुणे मोदी' असा पाढा म्हणावा लागणार आहे. निवडणुकीपूर्वी प्रचारात मोदी व पक्षाध्यक्ष अमित शाह विश्वासाने सांगत होते, ''अबकी बार तीनसो पार.'' त्यांचे भाकित खरे ठरल्याने तो एक चमत्कार म्हणावा लागेल. आंध्र व त्रिपुराचे भाजपचे राष्ट्रीय सचिव सुनील देवधर यांनी 'द हिंदुस्तान टाईम्स'ला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे, की २०२४ पर्यंत पश्चिम बंगाल ते तामिळनाडू या टप्प्यात जोमाने काम करून आजची ३०३ ही संख्या ३३३ पर्यंत न्यायची, हे उद्दिष्ट आहे.

भाजप आजही उत्तर भारतीय म्हणजे हिंदी भाषिक प्रदेशातील पक्ष आहे. कर्नाटकात २८ पैकी २५ व तेलंगणामध्ये १७ पैकी ४ जागा भाजपला मिळाल्या असल्या, तरी तामिळनाडू, केरळ व आंध्र प्रदेशात एकही जागा मिळाली नाही. म्हणजेच, भाजप अजून 'पॅन इंडिया' पक्ष बनलेला नाही. तसंच, २०१४ प्रमाणे यंदा कुठेही 'मोदी लाट' दिसत नव्हती. त्सुनामीप्रमाणे लाट पृष्ठभागाखाली होती. त्सुनामी अशीच असते. समुद्राच्या पृष्ठभागाखाली वेगाने येणाऱ्या लाटेचा वेग सरासरी तासाला हजार ते बाराशे कि.मी असतो. ती जेव्हा किनाऱ्यावर आदळते, तेव्हा तेथे असेल नसेल ते सारे काही पोटात घेते. क्षणात होत्याचे नव्हते होते. झालेली मनुष्यहानी भरून काढता येत नाही. मालमत्तेचे नुकसान भरून काढण्यासाठी कित्येक वर्षे लागतात. काँग्रेससह विरोधकांची तशी वाताहत झाली आहे.

वाताहतीची पुसटशी कल्पना देशाला होती. कारण, काँग्रेस, महागठबंधन वा प्रादेशिक पक्ष खऱ्या अर्थाने मोदी यांच्याविरूद्ध लढलेच नाहीत. उलट, ते एकमेकांविरूद्ध लढले. दिल्लीत आम आदमी पक्ष व काँग्रेस यांचे जागा वाटपाबाबत शेवटपर्यंत तळ्यात-मळ्यात चालल्याने मतदारांनी या दोन्ही पक्षांना 'गाळात' घातले व भाजपला सातही जागावर यश मिळवून दिले. मुंबईतही त्याचीच पुनरावृत्ती झाली. महागठबंधन एक विस्कळीत व्यवस्था होती. समाजवादी पक्ष, बहुजन समाज पक्ष यांनी वेगळी चूल टाकून काँग्रेसला दूर केले. काँग्रेसने उत्तरप्रदेशात सर्वच्या सर्व ऐंशी जागा लढविल्या. प्रत्यक्षात रायबरेलीची सोनिया गांधी यांची जागा वगळता, एकही जागा काँग्रेसला मिळाली नाही. खुद्द अमेठीतून राहुल गांधी पराभूत झाले. पारंपारिकरित्या काँग्रेसला निवडून देणाऱ्या अमेठीने भाजपच्या उमेदवार स्मृती इराणी यांना निवडून दिले. परिणामतः राहुल गांधी यांच्यासाठी अमेठी केवळ एक 'स्मृती' उरली आहे! स्मृती इराणींप्रमाणे जनता दलाचे राजनारायण यांनी १९७१ च्या निवडणुकीत इंदिरा गांधींचा रायबरेली मतदारसंघात असाच पराभव केला होता. दुसरीकडे, तेलंगणा राष्ट्र समितीचे अध्यक्ष व मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांनी 'फेडरल फ्रन्ट' चा वेगळा सूर लावला. काँग्रेस व भाजप दोघांनाही त्यांचा विरोध होता. त्याचा लाभ भाजपला झाला. म्हणजे, विरोधक असे लढले, की त्यांनी जागा आपसूक भाजपच्या झोळीत टाकल्या. महाराष्ट्रात काँग्रेसला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले. ही दारूण नामुष्की होय.

माजी मुख्यमंत्री व केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे व माजी मुख्यमंत्री व पक्षाध्यक्ष अशोक चव्हाण यांचा पराभव राज्यातील काँग्रेसच्या मोडकळीस आलेल्या संघटनेबाबत बरेच काही सांगून जातो. तीच अवस्था बहुतांश राज्यांतून आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसला पाच जागा मिळाल्या. राष्ट्रवादीची जनमानसातील प्रतिमा काही प्रमाणत टिकून आहे. येत्या ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकात काँग्रेस व राष्ट्रवादी यांनी एकत्र येऊन युती अथवा वंचित आघाडीला बरोबर घेऊन महायुती केली तरी त्यांचे सरकार येण्याची शक्यता नाही. दुसरीकडे, मोदी यांच्याविरोधात प्रचार करणारे महाराष्ट्र



नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे राजकारण 'डेड एन्ड'ला जाऊन पोहोचलेले दिसते. ''राजकारणाचं वारं कोणत्या दिशेला वाहते आहे, हे जाणून घ्यायचे असेल, तर शरद पवारांना विचारावे,'' अशी प्रशंसा मोदी यांनी पवार यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त दिल्लीत झालेल्या समारंभात केली होती. तथापि, यावेळचं वारं मोदींच्याच दिशेनं वाहील, असं ना त्यांना, ना विरोधी पक्ष नेत्यांना, ना प्रसारमाध्यमांना वाटलं. १९ मे रोजी आलेल्या जनमत कौलातून पुढे आलेल्या आकडेवारीवरून भाजपला बहुमत मिळणार, असाच अंदाज व्यक्त करण्यात आला. भाजप सर्वसाधारणतः २४० ते २६० पेक्षा अधिक जागा मिळवील, असा अंदाज होता. त्याला मोदींनी छेद दिला. पश्चिम बंगालमध्ये एकमेकाचे कट्टर शत्रू तृणमूल काँग्रेस, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व काँग्रेस भाजपच्या विरोधात होते. पण, ज्या तऱ्हेने प्रतिकूल परिस्थिती व हिंसाचार असताना मोदी व अमित शाह यांनी ते राज्य पिंजून काढले, त्यामुळे २०१४ मध्ये तब्बल ३४ जागा मिळविणाऱ्या तृणमूल काँग्रेसला केवळ २२ जागांवर समाधान मानावे लागले. भाजपने मुसंडी मारून १८ जागा जिंकल्या. तामिळनाडूत द्रविड मुन्नेत्र कळघमबरोबर निवडणूक समझोता केल्याने ८ जागांवर काँग्रेसला यश मिळाले व द्रमुकला २३ जागा मिळाल्या. द्रमुकचे अध्यक्ष एम.के. स्टॅलीन यांच्याबरोबर केलेला समझोता राहुल गांधी यांना लाभदायक ठरला.

पंडित नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्याकडून राजकारणाचं पारडं आता महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल हे राष्ट्रीय नेते, श्यामा प्रसाद मुखर्जी व दीनदयाल उपाध्याय या रास्वसंघ व भाजपच्या आदरस्थानांकडे वळले आहे. त्यांचा उच्चार मोदी यांनी निवडणुकीनंतर झालेल्या सभातून केला. निवडणुकीआधी देशात चाललेल्या चर्चेत दलित, युवक वर्ग, शेतकरी, व्यापारी, असंघटित कामगार, मध्यम वर्ग, महिला, अनुसूचित जाती व जमाती यांच्याबाबत बरीच चर्चा झाली. दलितांवर गेल्या पाच वर्षात झालेले अत्याचार, नोटाबंदीमुळे बेजार झालेला सामान्य माणूस, देशोधडीला लागलेला असंघटित कामगार, जीएसटीमुळे जेरीस आलेला व्यापारीवर्ग, वाढलेल्या बेरोजगारीने हवालदिल झालेले तरूण, शेतमालाला योग्य भाव मिळेना म्हणून रस्त्यांवर उतरलेले शेतकरी, याकडे पाहाता २०१९ मधील या घटकांची मते विरोधकांकडे वळणार, असा होरा होता.. मुस्लिमांना भाजपने मोजलेच नाही. काँग्रेस, सपा, बसपा व अन्य पक्षांना यांना त्यांची मते गेली; परंतु, मोदी यांनी त्याला शह देण्यासाठी वापरलेली विकास, हिंदुत्व, राष्ट्रवाद, बालाकोटमधील लष्करी कारवाई ही आयुधं पुरून उरली. बालाकोटमधील कारवाईनंतर अटक केलेला वैमानिक अभिनंदन याची दुसऱ्याच दिवशी पाकिस्तानने केलेली सुटका व त्याचे विजयी मुद्रेने मायदेशी परतणे, यामुळे राष्ट्रवाद अधिकच उफाळला. मतदान होण्यापूर्वी मोदी यांच्यासाठी अनुकूल अशी आणखी एक घटना घडली. ती म्हणजे, पाकिस्तानच्या जैश ए महंमद या अतिरेकी संघटनेचा म्होरक्या मसूद अजहर याला राष्ट्रसंघाच्या दहशतवाद्यांच्या यादीत समविष्ट करण्यास सातत्यानं विरोध करणाऱ्या चीनने अखेर त्यास मान्यता दिली. ही मागणी २००९ पासून होत होती. तब्बल १० वर्षांनी चीनने ते मान्य



**साधू-साध्वीही संसदेत जात असल्यामुळे देशात आता धर्माधारित राजकारणाला गती मिळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**

केले, याचे कारण भारताने वारंवार केलेली मागणी होतीच; परंतु अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन व रशिया यांनी राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीत भारताच्या मागणीला पाठिंबा देऊन चीनची केलेली कोंडी, हे महत्वाचे कारण होय.

२०१९ च्या निवडणुकांत मोदी यांची सर्वात मोठी कामगिरी असेल, तर त्यांनी देशातील राजकारण जातीपातीपलिकडे नेले. गेली अनेक वर्षे निवडणुकांचे राजकारण जाती-जमातींभोवती फिरत होते. निवडणुकीआधी त्यांना निरनिराळी प्रलोभने देऊन मते खरेदी केली जायची. उत्तर प्रदेशने शेतकऱ्यांची कर्जमाफी केली. त्यापाठोपाठ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री कमलनाथ यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली. राजस्तान, छत्तीसगडनेही तोच कित्ता गिरविला. तरीही मतदानाची वेळ आली तेव्हा शेतकऱ्यांनी भाजपला प्राधान्य दिले. आणखी एक प्रवाह दिसून येतो तो म्हणजे, मध्यप्रदेश, राजस्थान व छत्तीसगढ विधानसभेच्या निवडणुकात मतदाराने काँग्रेसला कौल दिला असला, तरी लोकसभेसाठी त्यांनी भाजपला निवडले. केंद्रात शपथविधी होण्यापूर्वीच कमलनाथ, अशोक गेहलोत व कर्नाटकातील कुमारस्वामी यांची सरकारे पाडण्याचा प्रयत्न भाजपने सुरू केलाय. दुसरीकडे, तृणमूल काँग्रेसला इशारा देऊन, ''तुमचे चाळीस आमदार माझ्या संपर्कात आहेत'' असे वक्तव्य करणाऱ्या मोदी यांच्या गळाला निकालानंतर केवळ दोन दिवसांत तीन आमदार व ६० नगरसेवक लागले आहेत. त्यांनी भाजपत प्रवेश केला. पाहावयाचे आहे, की ममता बॅनर्जी ही गळती कशी थांबवितात? काँग्रेस तब्बल बारा राज्यात खाते उघडू शकलेला नाही. मतदानाच्या टक्केवारीकडे पाहिल्यास भाजपच्या मतदानाची टक्केवारी २०१४ मधील ३१ टक्क्यांवरून २०१९ मध्ये ३७.३३ टक्यांवर गेली. याच काळात काँग्रेसची टक्केवारी १९.२२ वरून १९.५५ टक्क्यांपर्यंत वाढली. बसपाची ४.१४ टक्क्यांपर्यंत ३.६३ टक्के इतकी घसरली. तृणमूल काँग्रेसची टक्केवारी ३.८४ टक्क्यांवरून ४.०७ टक्क्यांवर गेली.

१७ व्या लोकसभेतील एकूण ४४ राजकीय पक्षांपैकी, केवळ भाजपला तीन आकडी संख्याबळ मिळाले. आठ पक्षांना दोन आकडी, १२ पक्षांना एक आकडी व आम आदमी पक्षासह उरलेल्या १६ राजकीय पक्षांना प्रत्येकी एक जागा मिळाली आहे. कर्नाटकात माजी पंतप्रधान एच.डी.देवेगौडा यांच्या पराभवाचे कर्नाटक सरकारवर काय परिणाम होतील, ते लवकरच दृष्टीपथात येईल. काँग्रेसचे मल्लिकार्जुन खर्गे पराभूत झाले. ज्यांच्याकडे पश्चिम उत्तरप्रदेशाची जबाबदारी सोपविली होती, ते ज्योतिरादित्य शिंदे गुणा मतदारसंघातून पराभूत झाले. खर्गे यांनी पाच वर्षे विरोधी पक्षनेते म्हणून काँग्रेसचा किल्ला लढविला. काँग्रेसला केवळ ५२ जागा मिळाल्याने तो दर्जाही मिळणार नाही. नियमानुसार, ज्या पक्षाला लोकसभेच्या एकूण जागांच्या दहा टक्के म्हणजे ५४ जागा मिळतात, त्याला विरोधीपक्ष नेता नेमता येतो. सारांश, लोकसभेत विरोधकांचे एकूण संख्याबळ २०० असले, तरी ५४ जागा मिळविणारा एकही राजकीय पक्ष नाही. चार पक्ष एकत्र येऊन त्यांचे संयुक्त संख्याबळ ५४ पेक्षा अधिक असेल, तर त्याला सभापती तो दर्जा देणार काय, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

प्रसिद्ध झालेल्या एका वृत्तानुसार, नोव्हेंबर २०२० अखेर भाजपला राज्यसभेत बहुमत मिळेल. राज्यसभेतील एकूण २६१ संख्याबळापैकी राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे १०२ सदस्य आहेत. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीकडे ६५ सदस्य आहेत व जे दोन्ही पक्षांशी संलग्न नाहीत, अशा पक्षांच्या

सदस्यांची संख्या ७३ आहे. घटनात्मक दुरूस्ती करण्यासाठी भाजपकडे किमान १२३ सदस्यांचे संख्याबळ हवे. ते यंदा महाराष्ट्र, हरियाना व झारखंड या राज्यांत होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकातून भाजपला मिळवावे लागेल. उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुका २०२२ मध्ये होणार आहेत. एकदा का राज्यसभेत बहुमत आले, की मोदी सरकार जम्मू-काश्मीरशी संबंधित घटनेचे ३७० वे व ३५ अ कलम रद्द करण्याच्या व तलाकसंबंधित कायद्याच्या दिशेने हालचाल करील. सिटिझन्स रजिस्टरसंबंधी विधेयक संमत करून घेईल. ३७० व्या कलमाद्वारे जम्मू-काश्मीरला स्वायत्त राज्याचा दर्जा देण्यात आलाय. ३५ अ कलमाने जम्मू काश्मीरच्या विधानसभेला राज्यात कायमचे वास्तव्य कुणाला करू द्यावयाचे, याचे अधिकार दिले आहेत. सध्या राज्याबाहेरील कोणत्याही नागरिकाला तेथे मालमत्ता, जमीन-जुमला घेता येत नाही. एकदा का ही दोन्ही कलमे रद्द झाली, की जम्मू-काश्मीरचे खऱ्या अर्थाने भारतात विलिनीकरण होईल. या कलमांना सरकारने हात घातल्यास काश्मीरचे खोरे पेटण्याची शक्यता टाळता येणार नाही. लडाख व जम्मूतून विधेयकाला पाठिंबा मिळेल. तसेच, नागरिकत्व नोंदणी विधेयक हे प्रामुख्याने आसाम व अन्य इशान्य राज्यांसाठी आहे. बांग्लादेशातून तेथे गेली अनेक वर्षे लाखो निर्वासितांचा ओघ भारतात आला. भाजपच्या मते, या मुस्लिम लोकांनी तेथील जमिनी बळकावल्या. निव्वळ मतांसाठी काँग्रेसने त्यांना प्रवेश दिला. त्यामुळे त्यांना परत पाठविण्याशिवाय पर्याय नाही. अमित शहा यांनी प्रचारादरम्यान एका भाषणात सांगितले, '' हम चुनचुनके उनको (इन्फिलट्रेटर्स) निकालेंगे.'' ही घोषणा हिंदूंची मते घेण्यास उपयोगी पडली खरी, तरी प्रत्यक्षात लाखो मुसलमानांना भाजप पाठविणार कुठे? त्यांना बंगालच्या उपसागरात बुडविता येणार नाही. बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना या 'बांग्लादेशातून स्थलांतर झाले,' हे मानण्यास मुळीच तयार नाहीत. माजी

> राहुल गांधी यांनी पराभवाची जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला. तो कार्यकारिणीने नामंजूर केला. अजूनही त्यांनी आपला आग्रह सोडलेला नाही. समजा, काँग्रेसच्या अध्यक्षपदी अन्य नेता नेमण्यात आला व तो सोनिया गांधी व राहुल गांधी यांच्या हातातील बाहुले बनणार असेल, तर त्याला काही अर्थ उरणार नाही. काँग्रेसने घमेंडखोरी सोडली, तरच पक्षाची विश्वासार्हता वाढेल. अन्यथा, मोदी यांचे ''सबका साथ, सबका विकास और सबका विश्वास'' हे नवे वाक्य काँग्रेससह विरोधकांना गुंडाळून ठेवील. येत्या पाच वर्षात 'शहा (अमित शहा) व शहेनशहा (नरेंद्र मोदी)' कशी वाटचाल करणार, याकडे प्रत्येकाचे लक्ष न लागले तरच नवल!

पंतप्रधान कै. पी.व्ही.नरसिंह राव यांना त्यांनी १९९२ मध्ये हेच सांगितले होते. २०११ च्या शिरगणतीनुसार, पश्चिम बंगालच्या एकूण लोकसंख्येच्या २७.१ टक्के मुस्लिम आहेत. ममता बॅनर्जी यांची मतांसाठी बहुतांश भिस्त त्यांच्यावर आहे. म्हणूनच बांग्लादेशबरोबर तिस्ता नदीच्या वाटपासाठी समझोता करण्यास त्या तयार नाहीत. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे ममताचे मन वळविण्याचे प्रयत्न असफल झाले व मोदी यांनाही अद्याप फारसे यश मिळालेले नाही. माजी पंतप्रधान कै. अटल बिहारी वाजपेयी यांच्या कारकीर्दीत मुंबईतील बांग्लादेशीयांना मायदेशी पाठविण्याच्या प्रयत्नांनाही यश आले नाही. त्याला पश्चिम बंगालमधील मार्क्सवादी पक्षाने कडाडून विरोध केला. ''मुंबईत राहाणारे बांग्लादेशीय नसून पश्चिम बंगालमधील मुसलमान आहेत,'' असा युक्तिवाद त्यावेळचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते सोमनाथ चटर्जी यांनी केला होता.

निवडणुकीआधी प्रादेशिक पक्षांचा प्रभाव लक्षणीयरित्या वाढेल. किंबहुना,केंद्रात सरकार बनविण्यासाठी मोदी यांना त्यांची गरज भासेल, हा कयास चुकीचा ठरला. इंदिरा गांधींना शक्तिवान केंद्र सरकार अभिप्रेत होते. त्यांना प्रादेशिक पक्षांचा प्रभाव अमान्य होता; परंतु त्यांच्या मृत्यूनंतर केंद्रात संमिश्र सरकारचा जमाना आला. तो सुमारे पंचवीस वर्षे टिकल्याने प्रादेशिक पक्षांच्या कुबड्यांशिवाय केंद्र सरकारचे पान हालत नव्हते. ती स्थिती प्रथमच २०१४ नंतर आमुलाग्र बदलली. भाजपने बहुमताचा आकडा ओलांडला आहे. २०१९ च्या निवडणुकांत केंद्रात सरकार बनविण्यास प्रादेशिक पक्ष निष्प्रभ ठरलेत. पश्चिम बंगाल, कर्नाटक, ओडिशा, तामिळनाडू, आंध्रप्रदेश या राज्यांत मात्र त्यांची सरकारे कायम आहेत. काँग्रेसप्रमाणे मार्क्सवादी कम्युनिस्ट, भारतीय कम्युनिस्ट पक्षही जवळजवळ संपुष्टात आला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला तामिळनाडूत २, केरळात १ व भाजपला तामिळनाडूत केवळ १ जागा मिळाली. पश्चिम बंगालमध्ये तीन दशकं व त्रिपुरात तब्बल २० वर्षे राज्य करणाऱ्या मार्क्सवाद्यांची ही गत व्हावी, याला अर्थातच मार्क्सवाद्यांचे सरचिटणीस कै. हरकिशन सिंग सुरजीत, प्रकाश करात व सीताराम येचुरी यांचे राजकारण जबाबदार आहे. करात या घरसणीला प्रामुख्याने जबाबदार होत.

भाजपच्या यशामागे आणखी काय कारणे आहेत?

१) निवडणूक प्रचारादरम्यान विरोधकांनी मोदी यांना एकमेव लक्ष्य केले होते. राहुल गांधी यांनी राफेल प्रकरणी 'चौकीदार चोर हैं' हे पालुपद शेवटपर्यंच चालू ठेवले. त्याचा मतदारांवर नकारात्मक परिणाम झाला. उलट, देशातील २५ लाख चौकीदारांना एकत्र करून मोदी यांनी त्यांची सहानुभूती व मते मिळविली. 'चौकीदार चौर हैं' हे वाक्य सर्वोच्च न्यायालयाच्या तोंडी घालून राहुल गांधीच तोंडघशी पडले. त्यांना सर्वोच्च न्यायालयाची माफी मागावी

लागली. २) राफेलप्रकरणी मोदी यांनी ‘जशास तसे’ या नात्याने बोफोर्सचा मुद्दा उपस्थित करून कै. राजीव गांधी यांचा प्रवास ‘मि.क्लीन’ पासून ‘मि. करप्ट’ झाल्याचा आरोप केला व काँग्रेसला उत्तर दिले. ३) सॅम पित्रोदा यांनी शिखांच्या शिरकाणाबाबत, ‘जो हुआ सो हुआ’ असे विधान करून काँग्रेसची गोची केली. ‘माफी मागा’ असे त्यांना सांगण्याची राहुल गांधी यांच्यावर वेळ आली. ४) भाजपचे नेते रामभक्त, मंदिरात जाणारे, होम हवन करणारे आहेत, हे सर्वश्रुत आहे. धर्माचा त्यांनी राजकारणासाठी पुरेपूर उपयोग केला आहे. त्यांच्यावर ‘कम्युनल (सांप्रदायिक)’ असा ठपका काँग्रेस वर्षानुवर्षे ठेवीत आहे. उलट, भाजपच्या सल्लागार मंडळाचे नेते लालकृष्ण अडवानी यांनी अनेक वर्षांपूर्वी काँग्रेसची ‘‘धर्मनिरपेक्षता बेगडी (स्यूडो सेक्यूलर) आहे,’’ असा आरोप केला होता. तो काँग्रेसला चिकटला. कारण, मुस्लिमांच्या मतांचे ध्रुवीकरण काँग्रेस करीत आलीय, तेही त्यांना कोणताही आर्थिक, सामाजिक व राजकीय लाभ न देता. यंदा तर काँग्रेसने भाजपवर कडी करण्यासाठी मंदिर भेटी, होम हवन, यज्ञ सारे काही केले. त्यामुळे, ते केवळ भाजपचे अनुकरण करीत आहेत, असे हिंदू मतदाराला वाटले. मुस्लिम नाराज झाले. त्यांची मते विखुरल्याने फटका काँग्रेससह समाजवादी पक्ष व बहुजन समाज पक्ष यांना बसला ५) बालोकटमध्ये हवाई कारवाई करणाराच देशाला सुरक्षा देऊ शकतो, ही भावना मोदी यांनी मतदारात रुजविली ६) मोदी व शहा यांनी सोशल इंजिनियरिंग डिजिटल स्तरावर नेले ७) रास्वसंघाच्या कार्यकर्त्यांनी भाजपला सर्वाथाने प्रचार व जनसंपर्क यात साह्य केले ८) मोदी व शहा वारंवार आचारसंहितेचे उल्लंघन करीत आहेत, अशा अर्धाडझन तक्रारी करूनही निवडणूक आयोगाने एकदाही त्यांच्यावर कारवाई केली नाही. आयोग शेपूट घालून बसला होता. पूर्णपणे भाजपच्या बाजूने होता. ९) शेवटच्या फेरीचे मतदान होण्याच्या केवळ एक दिवस आधी मोदी यांनी केदारनाथधामला जाऊन तेथील गुहेत साधना केल्याचे व्हिडिओ देशभर झळकले. ते पाहता, मोदी हे किती निरिष्छ फकीर आहेत, अशी भावना मतदारात पसरली. निकाल लागताच मोदी यांनी केलेल्या भाषणातही ‘फकीर की झोली लोगोने भर दी’ असे सांगून वाहव्वा मिळविली. १०) भाजपने हिंदू मतांचे यशस्वी धृवीकरण केले. त्याला बहुसंख्यांकांचे तुष्टीकरण म्हणावे लागेल. ११) गेली अनेक वर्षे भाजप वगळता, निवडणुका आल्या, की अन्य राजकीय पक्षांचे नेते दिल्लीतील जामा मशिदीच्या शाही इमामकडे मुस्लिम मतांची मागणी करण्यासाठी त्यांच्याकडे विनवणी करीत. यंदा एकही पक्षनेता त्यांच्याकडे गेला नाही. १२) ‘‘तुमच्या मतांची गरज नाही,’’ असे मोदी यांनी मुस्लिमांना दाखवून दिले, हे हिंदू मतदाराला भावले. १३) येत्या पाच वर्षात मोदी सरकार अयोध्येत राममंदिर उभारणार याची हिंदूंना पटलेली खात्री इ. याकडे पाहता, भारत धर्माधिष्ठित राष्ट्र होणार काय, असा प्रश्न सहाजिकच जनतेला पडेल; परंतु इतके वैविध्य असलेला देश पाकिस्तान, सौदी अरेबिया, इराण, तुर्कीसारखे धर्माधिष्ठित राष्ट्र बनणार नाही, हे खरे. दक्षिण भारतातील द्रविडी जनता ते मान्य करील काय? त्यांचा हिंदू देवदेवातांवर विश्वास नाही. या निवडणुकीने मोदी यांना तुर्कीचे रसीप ताईप एर्डोहान, इस्राएलचे बेंजामिन नेतन्याहू या अध्यक्षाच्या यादीत नेऊन बसविले आहे. शपथविधी समारंभास २०१४ मध्ये सार्क संघटनेच्या राष्ट्रप्रमुखांना व २०१९ मध्ये बिमस्टेक (बे ऑफ बेंगाल इनिशिएटीव फॉर मल्टिसेक्टोरल टेक्निकल अँड इकॉनॉमिक कोऑपरेशन) संघटनेच्या राष्ट्राध्यक्षांना आमंत्रित करून पूर्वेकडील संपर्कसेतू त्यांनी आणखी बळकट केला. मोदी यांच्या ‘ऑऊट ऑफ द बॉक्स’ विचारसरणीचे ते द्योतक होय.

निकालानंतर मोदी असेही म्हणाले, ‘‘लोकांच्या आकांक्षा वाढल्या आहेत. त्यांची पूर्ती करावी लागेल, अन्यथा लोक माफ करणार नाहीत.’’ वस्तूतः गेल्या पाच वर्षातील सर्व दोषांकडे मतदारांनी यंदा दुर्लक्ष केले, असे मान्य केले तरी लोकसभेतील विरोधकांची संख्या २०० असल्याने मोदी यांना अनेक समस्यांवर जाब द्यावा लागेल. रोखे बाजाराचा निर्देशांक भलेही चाळीस हजारांवर जावो, आर्थिक परिस्थिती ढासळली आहे. तिला सुधारावे लागेल. रोजगार निर्मिती करावी लागेल. असंघटित कामगारांना रोजगार द्यावा लागेल. गुंतवणूक वाढवावी लागेल. शेतकऱ्यांना शेतमालाचे वाजवी भाव द्यावे लागतील. वाजपेयी यांच्या काळात मुलांचे मानस बदलण्यासाठी भाजपला अभिप्रेत असलेले अनेक बदल पाठ्यपुस्तकातून करण्यात आले होते. ते कशा प्रकारे भाजप करणार, याकडे जनतेचे लक्ष असेल. तसेच, नेहरू, इंदिरा गांधी व त्यांच्या वारसांचा प्रभाव पुसून टाकण्यासाठी कोणत्या क्लृप्त्या अजमावल्या जाणार, याकडे जनतेचे लक्ष असेल. मोदी यांना ‘खान मार्केट गँग’ चे वावडे आहे. तिचे काय होणार? ‘‘अल्पसंख्याकांनी मते दिली नाहीत, पण तेही आपलेच आहेत,’’ असे मोदी म्हणाले. त्यांचे मन वळविण्यासाठी ते कोणती पावले टाकणार, हे पाहावे लागेल. दुसरीकडे, काँग्रेसपुढे त्यांनी जो राजकीय अस्तित्वाचा प्रश्न निर्माण केलाय, त्याला सोनिया गांधी व राहुल गांधी काय उत्तर देणार, यावर काँग्रेसची स्वीकारार्हता वा इतिहासजमा होण्याची प्रक्रिया अवलंबून राहील. राहुल गांधी यांनी पराभवाची जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला. तो कार्यकारिणीने नामंजूर केला. अजूनही त्यांनी आपला आग्रह सोडलेला नाही. समजा, काँग्रेसच्या अध्यक्षपदी अन्य नेता नेमण्यात आला व तो सोनिया गांधी व राहुल गांधी यांच्या हातातील बाहुले बनणार असेल, तर त्याला काही अर्थ उरणार नाही. काँग्रेसने घमेंडखोरी सोडली, तरच पक्षाची विश्वासार्हता वाढेल. अन्यथा, मोदी यांचे ‘‘सबका साथ, सबका विकास और सबका विश्वास’’ हे नवे वाक्य काँग्रेससह विरोधकांना गुंडाळून ठेवील. येत्या पाच वर्षात ‘शहा (अमित शहा) व शहनशहा (नरेंद्र मोदी)’ कशी वाटचाल करणार, याकडे प्रत्येकाचे लक्ष न लागले तरच नवल! ●●●

# धार्मिक ध्रुवीकरणाने देशातील प्रश्न बनतील अधिक गुंतागुंतीचे



बी.जी.वाघ

मोदींची बुद्धीजीवी वर्गाला भीती वाटते. मोदींविरूद्ध टीका करणे म्हणजे भक्तांना राष्ट्रद्रोह वाटतो. हे फॅसिझमचे लक्षण आहे. मोदींचे आर्थिक धोरण कॉर्पोरेट कॅपिटॅलिझमचेच राहील. सामान्य माणसाच्या हिताची धोरणे फारशी राबवली जाणार नाहीत. पुढील काळात खाजगीकरणाचा वेग प्रचंड वाढणार आहे. अमेरिकन पद्धतीचे आर्थिक मॉडेल मोदींसमोर आहे. नवउदारमतवादी अर्थव्यवस्थेत शेतकरी, शेतमजूर, कामगार, अनुसूचित जाती जमातींचे प्रश्न गौण ठरणार आहेत. धार्मिक ध्रुवीकरणाने देशाचे प्रश्न सुटणार नाहीत ते अधिक गुंतागुंतीचे होतील व त्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रतिमा डागाळली जात आहे हे मोदींच्या लक्षात येईलच.

पंतप्रधान मोदी यांचा विजय हा अपेक्षित असला तरी भयचकीत करणारा आहे. तो एका सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या नावाने जाणारा मध्ययुगीन शक्तींचा विजय आहे. जगात सगळीकडे उजव्या शक्ती, फॅसिझम वा नाझीझम वेगाने वाढत आहे. याला बहुसंख्याकवाद असेही म्हणता येईल. आम्ही बहुसंख्याक आहोत म्हणून आम्ही जे म्हणू तेच सत्य आणि तोच धर्म असा त्यांचा आग्रह असतो. तो एक झुंडशाहीकडे जाणारा प्रवाह आहे. माणूस कितीही शिकला, प्रबुद्ध झाला तरी तो जात, धर्म, वंश या मानसिकतेतून बाहेर पडत नाही. त्यातूनच या उजव्या शक्ती वाढत जातात. त्यांचे यश बहुसंख्याकांनी अल्पसंख्याकांवर लादलेले असते. म्हणून मोदींच्या यशाचे स्वागत करतानाच त्याच्याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. या यशाचा भारतीय समाजव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होणार आहे. कारण मोदींचे राजकीय यश भारताच्या मूळ प्रवृत्तीच्या विरोधी आहे; परंतु बहुसंख्याक भारतीयांनी त्यांना निवडून दिले आहे. त्यामुळे खरा भारत कोणता, हा प्रश्न निर्माण होईल. खरे म्हणजे, भारत हा देश एका सांस्कृतिक, धार्मिक मुद्यात विभागला गेला आहे. जागतिक वृत्तपत्रांनी तसेच म्हटले आहे. 'गार्डियन' या वृत्तपत्राने देशासाठी व जगासाठी ती वाईट बातमी ठरवली आहे. 'ख्रिस्तॉफ जेफ्रेलो' या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या राजकीय विश्लेषकाला मोदींचा विजय हा हिंदू राष्ट्रवादाचा आहे असे वाटते. 'न्यूयॉर्क टाईम्स'ने त्यांना डिव्हायडर-इन-चिफ असे म्हटले. तरीदेखील मोदींच्या विजयाच्या इतक्या मोठ्या व्याख्या करता येणार नाहीत. कारण मुस्लिमबहुल प्रदेशातही (जम्मू आणि काश्मिर) मोदींना भरभरून यश मिळाले आहे. लोकशाहीत इतके भरभरून यश अपवादात्मक परिस्थितीतच मिळते. जसे इंदिरा गांधींच्या मृत्यूनंतर काँग्रेसला मिळाले होते. लोकशाही देशात इतके यश मिळणे भयसूचक आहे. हा एक प्रकारे लोकशाही मार्गाने हुकूमशाहीकडे जाणारा प्रवास आहे. मोदींचा २०१४ मधील विजय तर्कसंगत होता. काँग्रेसमधील भ्रष्टाचार, अण्णा हजारेंचे आंदोलन, मूर्खदुर्बळ वृद्ध पंतप्रधान आणि समोर आक्रमक नव्या दमाचे मोदी त्यामुळे भाजपसाठी ते वातावरण अनुकूलच होते. तेव्हा ते विकासाची भाषा बोलत होते आणि 'अच्छे दिन'ची अनेक स्वप्ने भारतीय जनतेला दाखवित होते. मनमोहन सिंगांसारखा प्राथमिक माणूस राजकारणात सापडणे कठीण; परंतु त्यांना पद्धतशीरपणे बदनाम करण्यात आले आणि काँग्रेसला हरवण्यात आले. तेव्हाही काँग्रेसला बदलत्या वातावरणाचा अंदाज आला नाही. भारताची आर्थिक परिस्थिती उत्तम होती तरी काँग्रेस हरली. कारण जनता आणि काँग्रेस यात अंतर पडत गेले. लोकांना स्वप्नं दाखवणारा, भुलवणारा, बेदरकार नेता हवा असतो. मोदींनी त्यावेळी भ्रष्टाचार दूर करणे, विकास आदी मुद्यांवर जोर देऊन निवडणूक लढवली. त्यावेळीदेखील त्यांनी धार्मिक ध्रुवीकरणाचा मार्ग स्वीकारलेलाच होता; परंतु भाषा विकासाची होती. २०१९ ला धार्मिक ध्रुवीकरण हेच मुख्य उद्दिष्ट होते. मागील पाच वर्षांत मोदींनी भ्रष्टाचाराला लगाम घातला, असे दिसत नाही. उलट नोटाबंदीने अनेकांनी आपला काळा पैसा पांढरा करून घेतला. सामान्य माणसांचे अतोनात हाल



**देशात दलितांवर अत्याचार पूर्वीपासूनच होतात. परंतु मॉबलिंचिंगच्या घटना मोदी सरकार सत्तेत आल्यापासूनच घडत आहेत.**

झाले. बेरोजगारी वाढली, छोटे उद्योग बंद पडले, शेती आणि शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. स्टार्टअप इंडिया, मेक इन इंडिया आदी योजना कधी व्यवस्थित सुरू झाल्या नाहीत. जीडीपी पाच टक्क्यांच्यावर पुढे कधी सरकला नाही. मनमोहन सिंगांच्या काळात तो दहा टक्क्यांवर होता. आर्थिक आघाडीवर इतकं प्रचंड अपयश असूनही मोदींना इतकं घवघवीत यश मिळालं. याचे महत्त्वाचे कारण त्यांची संघटनात्मक बांधणी, घेतलेली मेहनत, संपत्ती आणि साधनसामग्रीची विपुलता आणि जनतेला भुलवणारे वक्तृत्त्व; परंतु या पलिकडे होता तो हिंदू राष्ट्रवाद, बहुसंख्याकवाद, धार्मिक व जातीय ध्रुवीकरण आणि धर्मनिरपेक्षतेला उघड विरोध. धार्मिक उन्माद कुठलीही नितीमूल्ये मानत नाही, त्यातून मॉब लिंचिंग, स्त्रियांवरील बलात्कार व धार्मिक दंगली घडून आल्यात. मोदींनी त्यांचा कधीही निषेध केला नाही. प्रज्ञा ठाकूर यांना तिकिट देणे आणि निवडून आणणे हा देखील एका व्यापक स्ट्रॅटेजीचा भाग होता. या सर्व प्रकारातून घटनात्मक चौकट खिळखिळी झाली. गांधीजींच्या पुतळ्याला गोळ्या घालणे व गोडसेला राष्ट्रभक्त ठरविणे हादेखील धार्मिक ध्रुवीकरणाचाच एक भाग. गांधी-नेहरूंच्या राजकीय, सामाजिक विचारसरणीला नकार देणे, ती हिंदूविरोधी ठरविणे हे या राजकीय चळवळीचे मुख्य सूत्र होते. मोदींचे परदेश दौरे व त्यातून काहीही निष्पन्न न होणे, मन की बात व पार्लमेंटला तोंड न दाखवणे, विरोधी पक्षांचा उपहास करणे व त्यांना कालबाह्य ठरविणे यातून मोदींनी आपली प्रतिमा प्रत्यक्षाहून अधिक उत्कृष्ट करण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या आर्थिक समस्यांना प्रत्यक्ष हात न घालता त्यांना भावनिक बनवण्याचे काम मोठ्या प्रमाणात करण्यात आले. जणू काही धर्मनिरपेक्षता या देशाला लागलेला कलंक आहे, असे वातावरण निर्माण करण्यात आले. त्यातून आपण हिंदू अस्मितेचे तारणहार अशी प्रतिमा त्यांनी ठसठशीतपणे उभी केली. त्यासाठी धार्मिक प्रतीक व परंपरांचा वापर करणे व इतिहासाचे उदात्तीकरण करणे, विज्ञानापेक्षा धर्माला श्रेष्ठ ठरवणे, घटनेपेक्षा श्रद्धा श्रेष्ठ असा प्रचार साधूसंतांकडून करवून घेणे या गोष्टी आल्याच. मॉब लिंचिंग हा प्रकार भारतात पहिल्यांदाच घडून येत होता. दलितांवर असे अत्याचार पूर्वीपासूनच होत आले; परंतु हा संघटनात्मक पातळीवरून होत होता. विरोधी विचार व व्यक्तींचे शिरकाण करणे हा त्यातीलच एक भाग. भारताच्या मूळ गंगाजमनी संस्कृतीला एका धार्मिक असहिष्णू एकारलेल्या अस्मितेत रूपांतरित करणे हा मुख्य हेतू होता. असे असले तरी मोदींचे यश निर्विवाद आहे. ईव्हीएम घोटाळा म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. या यशाची कारणे आणि त्याचा परिणाम कुठल्याही सुबुद्ध समाजाला समजून घेणे आवश्यक आहे. धर्माधारित राष्ट्रवाद जगात कुठेही यशस्वी झालेला नाही. तो फक्त राष्ट्राची धर्माधारित विभागणी करतो आणि विभागलेले राष्ट्र कधीही सुखी राहू शकत नाही. धार्मिक जिहादी संघटनांचे प्राबल्य वाढते, विज्ञान विरोध वाढतो आणि विकासाला खीळ बसते. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, व्यक्तीचे मूलभूत अधिकार व आविष्काराचे मुक्त स्वातंत्र्य यामुळेच देशात शांतता टिकून राहते व विकास होतो. गेल्या हजार वर्षाच्या मानवी प्रज्ञेचे यश त्याच्या धर्मनिरपेक्षतेत आहे. यूरोपचा इतिहास व प्रबोधनाची चळवळ

अभ्यासल्याने हे आपल्या लक्षात येते. असे असताना इतिहासाची चाके उलटी फिरवून हिंदू राष्ट्रवाद या देशाला कोणता संदेश देऊ इच्छितो? मागील निवडणुकीत धर्मनिरपेक्षता विरूद्ध हिंदू राष्ट्रवाद असा सरळ सामना होता. त्याची गंभीर दखल तथाकथित पुरोगाम्यांनी, विचारवंतांनी किंवा राजकीय पक्षांनी घेतली नाही. मुद्दे आर्थिक नव्हतेच. बेरोजगारी, दारिद्र्य, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वाढती महागाई, ढासळती अर्थव्यवस्था या मुद्यांना प्रचारात मोदींनी स्पर्शदेखील केला नाही. गाईंच्या वाढत्या संख्येमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले! नोटाबंदी, जीएसटी, बँकेतील करोडोंचे गैरव्यवहार, बँकांनी लक्षावधी कोटींची बड्या उद्योगपतींची केलेली कर्जमाफी हे मुद्दे कधीही प्रचारात आले नाहीत. 'चौकीदार चोर' म्हणून प्रश्न सुटत नव्हते. खरी जबाबदारी जनतेची होती. शेवटी राजकीय नादानपणामुळे दुःख त्यांनाच भोगावे लागते. लोकांनी विवेकाने नाही तर भावनिक उन्मादात मतदान केल्याचे दिसून येते. प्रज्ञा ठाकूर निवडून येण्याचे तेच एक कारण आहे. सामान्य माणसे आपले हक्क आणि अधिकारांसाठी जागृत असतील तरच लोकशाही टिकून राहते. विरोधी पक्षांना संपवण्याच्या नादात आपण हुकूमशाही तर आणत नाही ना, हे पाहिले पाहिजे. कारण तेच सरकारच्या अनियंत्रित सत्तेला नियंत्रित करीत असतात. सामान्य माणसांना सत्तेशी लढणे सोपे नसते. अर्थात, विरोधी पक्षही तितकेच कमिटेड असावे लागतात. सध्याच्या परिस्थितीत त्यांनी स्वतःच्या स्वार्थापलिकडे जास्त काही पाहिले नाही.

पर्यायी प्रबळ विरोधी पक्ष नसल्याने मोदींना सहज यश मिळू शकले. विरोधी पक्षांना सामाजिक व राजकीय परिस्थितीचे नीट आकलन झाले नाही. मोदींसारखे वक्तृत्त्व आणि कष्ट करण्याची क्षमता इतर कुठल्याही राजकीय पुढाऱ्याकडे नाही. निष्ठावान आणि समर्पणशील कार्यकर्ते जे मोदींकडे आहेत, त्यांचा अभाव मुख्यतः काँग्रेसकडे आहे. काँग्रेसी नेते आणि कार्यकर्ते कायम संधीसाधू

*मोदींना पाशवी बहुमत मिळाले आहे त्यामुळे ते हुकूमशाहीच्या मार्गानेच जाऊ शकतात. त्यांना रोखणारी आता एकही शक्ती अस्तित्वात नाही. कारण भारतातील जनमत धर्मदूषित झालेले आहे किंवा त्यांना आपल्या राष्ट्रीय कर्तव्याची जाण नाही. 'इंदिरा इज इंडिया' असे एकेकाळी देवकांत बरूआ यांनी म्हटले होते. इतके आत्यंतिक व्यक्तीप्रेम देशाला घातक आहे. वास्तविक, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सारी राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व आर्थिक सत्ता हिंदूंकडेच आहे. असे असताना ते भयग्रस्त का असावेत? एकविसाव्या शतकात 'धर्म व राष्ट्र' या संकल्पना कालबाह्य झालेल्या आहेत. बहुसंख्य हिंदूंना असा आत्मघातकी हिंदू राष्ट्रवाद मान्य होणार नाही. जर्मनीचे आणि हिटलरचे पुढे काय झाले ते त्यांना माहीत आहे.*

राहिले आहेत. ऐन युद्धाच्या वेळी ते पळ काढतात. काँग्रेसकडे माणूसबळ, पैसा आणि इतर संसाधनेही नाहीत. देशाच्या उद्योगपतींनी मोदींना भरभरून पैसे दिले. स्थानिक पक्षांनी काँग्रेसला जवळ केले नाही. काँग्रेसवर घराणेशाहीचा आरोप केला जातो; परंतु सर्वच पक्षांत घराणेशाही आहे. महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, हे सारे पक्ष पुढे मोदींशी कसे लढतील आणि लढू शकतील की नाही. कारण त्यांचा आत्मविश्वास हरवलेला आहे. त्यांचे हितसंबंध परस्परविरोधी आहेत. दुसरा प्रश्न आहे की, मोदींचे सामाजिक, आर्थिक, राजकीय धोरण काय राहील. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा हिडन अजेंडा राबवतील की स्वतंत्र निर्णय घेऊन राष्ट्रउभारणीचे काम करतील. मोदींना पाशवी बहुमत मिळाले आहे त्यामुळे ते हुकूमशाहीच्या मार्गानेच जाऊ शकतात. त्यांना रोखणारी आता एकही शक्ती अस्तित्वात नाही. कारण भारतातील जनमत धर्मदूषित झालेले आहे किंवा त्यांना आपल्या राष्ट्रीय कर्तव्याची जाण नाही. 'इंदिरा इज इंडिया' असे एकेकाळी देवकांत बरूआ यांनी म्हटले होते. इतके आत्यंतिक व्यक्तीप्रेम देशाला घातक आहे. वास्तविक, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सारी राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व आर्थिक सत्ता हिंदूंकडेच आहे. असे असताना ते भयग्रस्त का असावेत? एकविसाव्या शतकात 'धर्म व राष्ट्र' या संकल्पना कालबाह्य झालेल्या आहेत. बहुसंख्य हिंदूंना असा आत्मघातकी हिंदू राष्ट्रवाद मान्य होणार नाही. जर्मनीचे आणि हिटलरचे पुढे काय झाले ते त्यांना माहीत आहे. हिंदूंची भूमिका मुळातच वैश्विक राहिली आहे. ऋग्वेदात म्हटले आहे की, आपण सारे एक आहोत, आपण एका मनाने विचार करूया. हिंदूंच्या सर्व संतांची, धर्मसंस्थापकांची भूमिका तशीच आहे. स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी हे त्याच परंपरेचे प्रतिनिधी आहेत. मूर्तिपूजा नाही तर मानवपूजा हाच त्यांचा संदेश होता. द्वेषातून धर्मच नाही तर राष्ट्रही महान होत नाही. मोदींची बुद्धीजीवी वर्गाला भीती वाटते. मोदींविरूद्ध टीका करणे म्हणजे भक्तांना राष्ट्रद्रोह वाटतो. हे फॅसिझमचे लक्षण आहे. मोदींचे आर्थिक धोरण कॉर्पोरेट कॅपिटॅलिझमचेच राहील. सामान्य माणसाच्या हिताची धोरणे फारशी राबवली जाणार नाहीत. पुढील काळात खाजगीकरणाचा वेग प्रचंड वाढणार आहे. अमेरिकन पद्धतीचे आर्थिक मॉडेल मोदींसमोर आहे. नवउदारमतवादी अर्थव्यवस्थेत शेतकरी, शेतमजूर, कामगार, अनुसूचित जाती जमातींचे प्रश्न गौण ठरणार आहेत. धार्मिक ध्रुवीकरणाने देशाचे प्रश्न सुटणार नाहीत ते अधिक गुंतागुंतीचे होतील व त्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रतिमा डागाळली जात आहे हे मोदींच्या लक्षात येईलच. भारताची मूळ संस्कृती सर्वसमावेशक, सहिष्णू आणि उदारमतवादी आहे. मोदींना गांधी आणि बुद्धाकडेच वळावे लागेल. अन्यथा इतिहासात एक विध्वंसकारी नेता अशीच त्यांची प्रतिमा राहील. ●●●



जयदेव डोळे

# वंचित काँग्रेस, बहुजन भाजप आणि आखडलेली आघाडी!

गेल्या दोनेक वर्षांपासून आपल्याला न्यू इंडिया घडवायचाय असा पंतप्रधान मोदी यांचा सततचा दावा असे. त्याप्रमाणे त्यांनी कार्यारंभ केलेला होता. त्याची पावती लोकांनी म्हणजे मतदारांनी त्यांना दिली. भाजपेत्तर मतदानदेखील देशात आणि काही राज्यांत टिकून आहे. त्यामुळे अगदीच हाय खाल्ल्यासारखे वाटून घेणे कामाचे नाही. यापुढे भारतीय राजकारणाचे स्वरूप 'भाजप व भाजपेत्तर' असे करावे लागेल. पूर्वी ते काँग्रेस-काँग्रेसेत्तर असे. या शब्दप्रयोगासोबतच भाजपने ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर, बहुजन-अभिजन, सवर्ण-अवर्ण ही शब्दरचनाही बदलायचा चंग बांधलेला दिसतो. मोदी यांनी २५ मे रोजी संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये केलेल्या भाषणात ही निवडणूक सामाजिक ऐक्य साधणारी ठरली असे म्हटले. समता, ममता, समभान, ममत्त्व असा शब्दप्रयोग त्यांनी केला. याचा अर्थ काय? मोदींचेच नव्हे तर संघ परिवाराचे उद्दिष्ट भारतीयांच्या विचार विश्वातून आणि चर्चा विश्वामधून अनेक संज्ञा-संकल्पना काढून टाकून त्याजागी संघाला प्रिय अशी शब्दावली घुसवायची, हे आहे. त्याचा आरंभ म्हणजे नवा भारत, नवे युग आणि २०१९ ची निवडणूक!

लोकशाहीत जनतेचा कौल प्रमाण मानण्याचा प्रघात आहे. निवडणूक यासाठी घ्यायची की कोण बरोबर, कोण नालायक हे जनता ठरवेल असे म्हणत एकमेकांना आव्हान द्यायचे. सत्तापक्ष योग्य होता की प्रतिपक्ष, याचा निवाडा जनता करीत असते, असे ठरवून मतदार व मतदान यांच्याकडे न्यायाधीशाची भूमिका सोपवायची. त्याप्रमाणे १७ वी लोकसभा स्थापन झाली. तिची अवस्था शीर्षकाद्वारे व्यक्त केलेली आहे. असे दिसते आहे की, स्वातंत्र्य चळवळीच्या वेळची मूल्यव्यवस्था मतदारांना जुनाट वाटू लागली आहे. कारण त्या मूल्यांचा आधार घेऊन राजकारण करतो असे सांगणारे सारे राजकीय पक्ष लोकसभेत बहुमत मिळवू नाही शकले. काँग्रेस आणि काँग्रेससम सारे पक्ष एका नव्या अडथळ्याला ठेचकाळले. तो म्हणजे भारतीय जनता पार्टी. तो याचा अर्थ राष्ट्रीय स्वंयसेवक संघ असाही आहे. मात्र संघाचा दर्शनी भाग भाजप असल्याने आपल्याला प्रामुख्याने त्यावर चर्चा करावी लागेल. अँटी काँग्रेसीझम् अर्थात काँग्रेसविरोध सलग दुसऱ्या लोकसभेच्या स्थापनेचा पाया ठरलाय.

गेल्या दोनेक वर्षांपासून आपल्याला न्यू इंडिया घडवायचाय असा पंतप्रधान मोदी यांचा सततचा दावा असे. त्याप्रमाणे त्यांनी कार्यारंभ केलेला होता. त्याची पावती लोकांनी म्हणजे मतदारांनी त्यांना दिली. भाजपेत्तर मतदानदेखील देशात आणि काही राज्यांत टिकून आहे. त्यामुळे अगदीच हाय खाल्ल्यासारखे वाटून घेणे कामाचे नाही. यापुढे भारतीय राजकारणाचे स्वरूप 'भाजप व भाजपेत्तर' असे करावे लागेल. पूर्वी ते काँग्रेस-काँग्रेसेत्तर असे. या शब्दप्रयोगासोबतच भाजपने ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर, बहुजन-अभिजन, सवर्ण-अवर्ण ही शब्दरचनाही बदलायचा चंग बांधलेला दिसतो. मोदी यांनी २५ मे रोजी संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये केलेल्या भाषणात ही निवडणूक सामाजिक ऐक्य साधणारी ठरली असे म्हटले. समता, ममता, समभान, ममत्त्व असा शब्दप्रयोग त्यांनी केला.

याचा अर्थ काय? मोदींचेच नव्हे तर संघ परिवाराचे उद्दिष्ट भारतीयांच्या विचार विश्वातून आणि चर्चा विश्वामधून अनेक संज्ञा-संकल्पना काढून टाकून त्याजागी संघाला प्रिय अशी शब्दावली घुसवायची, हे आहे. त्याचा आरंभ म्हणजे नवा भारत, नवे युग आणि २०१९ ची निवडणूक!

याचा अर्थ जुने तत्त्व सर्वथा अपरिवर्तनीय असून नवे काही स्वीकारण्याजोगे नाही हा होत नाही. बदलांची अपेक्षा, तयारी आणि घोषणा करणारे कोण आहेत, त्याचा अभ्यास करायला नको का? सरसंघचालक मोहन भागवत गेल्या सप्टेंबरात म्हणाले तसे गोळवलकर गुरूजींचे विचार आता संघ प्रमाण मानत नाही, म्हणून हे परिवर्तन घडले, असे मानायचे का? संघाला हिंदू हीच एकमेव ओळख भारतीय समाजाची घडवायची आहे. त्यामध्ये जात या वास्तवाचा अडथळा येतो. म्हणून जातपातीचा उच्चारसुद्धा कोणी करू नये असे संघ (म्हणजे गोळवलकर) मानतो. याचा अर्थ संघ जातिव्यवस्थेला भीक घालत नाही असा नसतो. हिंदूंचे ऐक्य जातीजातींमुळे भंग पावत असेल तर ऐक्य महत्त्वाचे, जात दुय्यम असे संघ म्हणतो. म्हणून प्रचारात भाजपने राष्ट्रवाद, देशप्रेम यांचा उच्चार करीत हिंदुत्त्वाचाच जागर केला आणि हिंदू धर्माचे गलिच्छ, बीभत्स लक्षण असलेल्या जातिव्यवस्थेचा उल्लेखच

केला नाही. ही लपवा-छपवी झाली. संघ व भाजप यांचा राष्ट्रवाद हिंदू असण्याचे कारण 'त्यांचे' राष्ट्र हिंदू आहे. किंबहुना हिंदूराष्ट्र ही 'त्यांची' जीवननिष्ठा आहे. त्यासाठी ते वाट्टेल त्या थराला जातात.

हा जो बेगुमान, बेलगाम, बेछूट, वाट्टेल त्या थराला जायचा संघ परिवाराचा स्वभाव आहे, तोच नव्या भारताच्या मुळाशी आहे. त्याची मूल्यव्यवस्था १७ व्या लोकसभेच्या निर्मितीवेळी प्रचारामध्ये जाणवली. कोणती ती मूल्ये? १) खोटारडेपणा २) इतिहास विकृत व विपर्यस्त करून मांडणे ३) देवधर्म यांचा उघड स्वीकार ४) पैसा, सत्ता यांचा प्रचंड वापर ५) आपल्या पक्षात जो जो येऊ इच्छितो त्यास घेणे ६) विद्यमान व्यवस्थेची नैतिक चौकट जितकी मोडता येईल तेवढी मोडून टाकणे ७) देशाचे शत्रू व पक्षाचे शत्रू विरोधी पक्षांशी जोडून टाकणे ८) हिंदूंखेरीज अन्य धर्म अदखलपात्र ठरवणे ९) हिंदू भारत असुरक्षित असल्याचा कांगावा करणे १०) श्रीमंत आणि उद्योगपती यांच्याविरूद्ध अवाक्षरही न काढणे.

यांत आणखीही भर टाकता येईल, पण मुस्लिमविरोध आणि दलितविरोध प्रचारात फार उघडपणे व्यक्त झाला. मायावती यांचे राजकारण जातीयवादी असल्याचा शोध नुकताच लागल्यासारखा आरोप करीत राहणे हाही भाजपचा एक कांगावा आहे. समाजवादी पार्टी केवळ यादव जातींपुरती मर्यादित नाही. समाजवाद हा तिचा मूलाधार असूनही जातींचे महत्त्व ती फेटाळत नाही, याचा अर्थ आंबेडकर-लोहिया यांच्या सिद्धांताचे राजकारण ती करते; परंतु मोदी यांनी या पक्षाविरूद्ध खोटा प्रचार केला. थोडक्यात, जात आणि जातीयता काय असते त्याची व्याख्या आता मोदी-शाह यांचा संघ परिवार ठरवणार. भाजपसुद्धा जातीचे राजकारण करतोच. पण लपून-छपून!

ही सारी मंडळी निखालस उजव्या विचारांची आहे. त्यांचा उघडपणे समाजवाद, समता, सामाजिक न्याय, उदारमतवाद, धर्मनिरपेक्षता आदी तत्त्वांना विरोध असतो. भांडवलशाहीच्या प्रसाराला ज्या ज्या तत्त्वांचा अडथळा राहील, तो सारा उपटून काढणे हे या पक्षाचे तत्त्व आहे. त्यातच जागतिकीकरणामुळे सगळीकडे उगाचच वैश्विक, बंधुभावात्मक वातावरण निर्माण झाल्यासारखे वाटू लागले होते. हिंदुत्त्ववाद्यांचा त्यास विरोध होता. कारण जागतिकीकरण व तंत्रज्ञान यासोबत जे भांडवल आले ते ख्रिश्चनधर्मी आणि उदारमतवादी, स्वातंत्र्यप्रिय होते. त्यामुळे जात, संस्कृती परंपरा, इतिहास, कर्मकांड आदी संघपरिवाराला प्रिय अशा खूप गोष्टी अडगळीत पडल्या होत्या. जागतिकीकरणसुद्धा उजव्या विचारांची एक आवृत्ती होती; पण तिचे हे रूप संघाचा पाया खचवणारे निघाले. म्हणून २०१४ पासून संघ परिवाराने प्रयत्नपूर्वक जागतिकीकरण व वैश्विक जवळीक संपवण्यासाठी हिंदूत्त्वप्रसार, मुस्लिमद्वेष आणि पुरोगामी विचारांची निंदा सुरू केली. लोकांनाही जागतिकीकरणाच्या काळात जात, राष्ट्रधर्म, भाषा, प्रदेश आदी आपले अस्तित्त्वाचे, अस्मितेचे जीवनतत्त्व चेंगरून गेल्याचे जाणवू लागले होते. त्यांनी काँग्रेस म्हणजे मुस्लिमांचा अनुमय वगैरे कुभांड रचलेल्या संघ परिवाराची कड घेतली. निवडणुकीत भाजपला जिंकवले. मधल्यामध्ये डावे, समाजवादी यांचाही नाश झाला. कारण त्यांनी केलेला जागतिकीकरणाचा विरोध फक्त आर्थिक बाजूंचा होता. शिवाय विषमता आणि अन्याय यांचा पुरस्कार करणारी सवर्ण हिंदूंची बहुसंख्याक संस्कृती स्वीकारण्याचाही प्रश्न नव्हता. ही वेळ संघ परिवाराने साधली आणि एका फटक्यात काँग्रेस व समाजवादी यांना उद्ध्वस्त केले.

काँग्रेस पक्ष खूप साव आहे असे कोणाला या विवेचनावरून वाटले तर ते योग्य नाही. कारण समाजवाद, मार्क्सवाद, गांधीवाद, आंबेडकरवाद संपवण्यासाठी काँग्रेसने भरपूर प्रयत्न केले. त्यासाठी म्हणजे उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण यांच्या प्रसाराला भाजपची साथ काँग्रेसने मिळवली. भाजपनेही वाजपेयी यांच्या काळात काँग्रेसचाच हा खा.ऊ.जा. कार्यक्रम पुढे रेटला. याचा अर्थ, ॲड. आंबेडकर व बॅ. ओवेसी मानतात त्याप्रमाणे काँग्रेस आणि भाजप या एका नाण्याच्या दोन बाजू नाहीत. राज्यघटना काँग्रेसच्या नव्हे, तर भारतभरच्या सामूहिक शहाणपणाचे सार आहे. त्यावेळी हिंदू महासभा आणि रा.स्व.संघ यांनी या राज्यघटनेचा धिक्कार केलेला होता. भारतीय जनसंघदेखील कुरकुर करीतच संविधानाला मानू लागला. आजही अनंतकुमार हेगडे, साक्षी महाराज ही मंडळी संविधान बदलाची भाषा करून बसलीय हे विसरता येत नाही.

२५ मे ला संविधानाच्या प्रतीपुढे डोके टेकवून पंतप्रधान मोदी यांनी संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये भाषण सुरू केले. याचा अर्थ आता संविधान देव्हाऱ्यात ठेवायचे अन् त्याच्या पावित्र्याचे स्तोम माजवत राहून आपल्याला हवा तसा मनमानी कारभार करायचा हा भाजपचा-मोदींचा डाव दिसतो. मतदार नव्हे जनता जनार्दन, निवडणूक नव्हे तीर्थयात्रा, असे गौरवपूर्ण वर्णन करीत राहून निवडणुकीच्या अंताला आपली प्रदर्शनीय व कॅमेराबंद ध्यानधारणा आणि केदारनाथभ्रमण करणारे मोदी मुद्दाम हिंदू धर्म पुढे आणत आहेत. मुसलमानांचे प्रश्न सोडवायला हवेत, असेही ते म्हणतात आणि सेक्युलॅरिझम या तत्त्वाची टिंगल भाजपच्या मुख्यालयातील भाषणात करतात. स्वतःकडे सारी प्रसिद्धी खेचून घेणारे मोदी नव्या खासदारांना पत्रकारांपासून चार हात लांब राहण्याचा इशारा देतात. सलग दोन-तीन दिवसांत केलेल्या भाषणांत मोदींनी खूप विसंगती व विरोधाभास दाखवले. हा एखाद्या हुकूमशाहीचा एककल्ली व लहरी आविष्कारच होय. तो येणाऱ्या पाच वर्षांत खूप पाहावा लागणार.

आपण एककल्ली, आप्तलुब्ध आणि हिटलरछाप नसून मोकळे आहोत असे भासवायला मोदींनी केवढी केविलवाणी धडपड केली! नमोटीव्ही नावाचा एक प्रकार बरोबर निवडणुकीच्या काळात अवतरतो काय अन् निकालाच्या आदल्या दिवशी गायब काय होतो, याबाबतीत मोदी कसे अनभिज्ञ, साळसूद, सावासारखे वागले!! ही इमानदारी झाली का? पक्षाच्या व्यासपीठावर मुद्दाम टीव्हीच्या

बातमीदारांना प्रश्नोत्तरासाठी वेळ द्यायची. मुलाखत घेतल्यासारखा आभास देणारा हा कार्यक्रम इतका एकतर्फी आणि कुरवाळणे या प्रकारातील होता की वाटले हा कसला लोकशाहीचा पुरस्कर्ता? राफेल, अदानी, फसल बीमा योजना, पाणीटंचाई, बेरोजगारी अशा भंबेरी उडवणाऱ्या प्रश्नांना परवानगीच नसे. मग ही कशाची मुलाखत? निवडणुकीत प्रचारावर भाजपने किती खर्च केला याचा अंदाजही कोणी छापला नाही, एवढी दहशत या पक्षाने पत्रकारांवर बसवलेली आहे. वरती गरिबांचा कळवळा प्रत्येक भाषणातून मोदी दाखवणार! अक्षयकुमार हा अभिनेता कॅनडाचा नागरिक. तो भारताच्या निवडणुकीत मतदान करू शकत नाही; परंतु त्याला दीड तासाची मुलाखत देऊन आपण काय खातो, आपली आवड काय, इत्यादी गोष्टी त्यांनी सांगितल्या. हा व्यक्तीमहात्म्याचा प्रकार नव्हता की काय? चष्मा, जॅकेट, जोडे, पेन, घड्याळ, झब्बा इत्यादींवर अमाप खर्च करणारे मोदी गरिबांच्या बाजूचे असल्याचे सांगतात ते मग कशाच्या जीवावर?

मोदींची हुकूमशहासदृश्य अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या भाषणात आपल्या सहकाऱ्यांचा उल्लेख कधी नसतो. ना कोणाचे कौतुक, ना कोणाचा गौरव! 'मोदी सरकार' असा उल्लेख ते स्वतःच करीत राहिले. अवघा प्रचार त्यांनी भाजप वा रा.लो.आघाडी यांचा संदर्भ न देता करून टाकला. त्यांच्या भाषणांत भारतीय वा पाश्चात्य विद्वान, विचारवंत, लेखक, कलावंत आदींची नावे आणि कार्यकर्तृत्त्व कधीही ऐकू येत नाही. त्यांची भाषणे म्हणजे जुन्या ऐतिहासिक नाटकांमधील पात्रे हातवारे करीत जाड्याभरड्या आवाजात संवाद ओरडून म्हणत, तशी झालेली आहेत. मोदींची भाषणे निंदा, कुत्सितपणा, टिंगल, अपमान, थापा यांनी गजबजून गेलेली दिसली. डॉ. आंबेडकरांनी वंशवादावर १९४० साली जे व्याख्यान दिले ते काँग्रेसला लागू पडले असे मोदी बऱ्याच ठिकाणी बोलले. वास्तवात डॉ. बाबासाहेबांचे ते भाषण व्यक्तीवाद या विषयावरचे पुणे येथे झालेले होते. व्यक्तीस्तोमासाठी त्यांनी गांधीजींवर टीका केलेली होती. बालाकोट व पुलवामा येथील घटनांविषयी विचारलेले प्रश्न जणू देशद्रोह झाला असे मोदींनी सर्व प्रचारात भासवले. थोडक्यात, मोदी फार संकुचित, दीर्घद्वेषी आहेत. तरीही मोदी हे आपल्या देशाचे पंतप्रधान आहेत. त्यांना मत देणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. किंबहुना लोकशाही, प्रजासत्ताक देशात जनता सर्वश्रेष्ठ असते आणि तसेही मोदी स्वतः ला प्रधानसेवक म्हणवून घेतातच; परंतु मोदींचा आपल्याला सगळे कळते हा आव लपून राहत नाही. सत्तेचे त्यांच्या हाती झालेले केंद्रीकरण देशाच्या राज्यघटनेच्या तत्त्वविरोधी आहे हे का त्यांना समजत नाही? पंतप्रधान कार्यालय आणि पक्षाध्यक्ष यांच्याकडून प्रसार माध्यमांचे संचालन चालते असा आरोप गेल्या पाच वर्षांत कुजबुजीच्या रूपात होत होता. एवढे बहुमत मिळवल्यावरही प्रसार माध्यमांवर काबू ठेवणे योग्य नाही. अर्थव्यवस्था इतकी गडगडलेली आहे की, एकटे मोदी काही करू शकणार नाहीत. महागाई निकालापाठोपाठ वाढत चालली आहे! ती वाढणार, कारण ज्यांनी प्रचाराला पैसा दिला ते आता वसुली करणारच ना!



माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी हे आरएसएसच्या तृतीय वर्ष प्रशिक्षण वर्गास उपस्थित राहिले तेव्हा ही नव्या युगाची सुरूवात असू शकते, असे म्हटले गेले. ते आता खरे ठरू पाहत आहे.

भाजपेत्तर पक्षांनी अशा परिस्थितीत कसे वागावे व काय करावे? सुरुवातीला ज्या मुद्यांची चर्चा केली, त्यानुसार या पक्षांना आपले ऐतिहासिक कार्य संपले असे वाटू लागले; परंतु विरोधी पक्ष म्हणून इतिहास घडवायची वेळ आता त्यांच्यावर आलेली आहे. संविधान म्हणा की स्वातंत्र्य चळवळ, कोणतीच तत्त्वे मलूल पडलेली नाहीत आणि पडणारही नाहीत. घराणेशाही, वंशवाद, भ्रष्टाचार इत्यादी मुद्दे मोदींनी काढलेले नाहीत. ते खूप जुने तर आहेतच शिवाय कालोचित आहेत. ती भाजपवर उलटवली पाहिजेत. होत असे आहे की, भाजपची राज्य सरकारे आपल्या कार्यकर्त्यांना विकासाची कामे वाटताना थोडीशी राष्ट्रवादी, काँग्रेस, जनता दल आदी पक्षांच्या कार्यकर्त्यांनाही देतात. त्यामुळे लाचार अन् याचक झालेले विरोधी कार्यकर्ते पक्षांचा आवाज मुक्तपणे काढू शकत नाहीत. सारे सत्ताधारी पक्ष आपली कमाई सरकारी योजनांमधून करीत असतात. भाजपने त्याला स्पर्शही केला नाही असे समजणारा फक्त शाखेत जाणारा एखादा भाबडा मोदीभक्तच असू शकतो. त्यामुळे सरकारी पातळीवरचा भ्रष्टाचार, योजनांचा गरिबांना न होणारा लाभ, श्रीमंतांच्या फायद्याची धोरणे, मुस्लिम-दलितांवरील हल्ले उघडकीस आणत राहून मुकाबला करण्याखेरीज कोणाची सुटका नाही. ●●●

# वंचित बहुजन आघाडी राजकीय परिवर्तनाच्या दिशेने





✍ **यशपाल भिंगे (नांदेड)**

सव्वा महिन्याच्या प्रतीक्षेनंतर लोकसभा निवडणुकीचे निकाल देशासमोर आले. हे निकाल अपेक्षित किंवा अनपेक्षित होते का, या खोलात जाणे आज घडीला संयुक्तिक ठरणारे नाही. या निकालाने राजकारणाची दिशा बदलली इतके मात्र नक्की. देशपातळीवर मोदींचा एकहाती करिष्मा चालला, तर वंचित बहुजन आघाडीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात एका नव्या पर्यायी राजकारणाची सुरुवात झाली.

महाराष्ट्राचा सामाजिक व राजकीय चेहरा हा पुरोगामी राहिला आहे. या भूमित जन्मलेल्या महापुरुषांच्या दूरदृष्टीतून सामाजिक क्रांती घडली. फुले-शाहू-आंबेडकरांचे नाव घेतल्याशिवाय पुढे जाता येत नाही, याकडे समता व न्यायाच्या भूमिकेतून पाहिले जाते. या महापुरुषांच्या कार्याची दखल 'पुरोगामी महाराष्ट्र' अशा गौरवपूर्ण उल्लेखाने घेतली जाते. या सामाजिक बदलांकडे राजकीय चष्म्यातून पाहणाऱ्या धर्मनिरपेक्ष पक्षांनी पुरोगामित्वाचे पेटंट आमचेच आहे, असे भासवून अनेक वर्षे सत्ता उपभोगली.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेससह अन्य पक्षांचा पराभव झाला होता. त्यापेक्षा त्यांचा दारूण पराभव २०१९ च्या निवडणुकीत झाला. या पराभवाची कारणे अनेक आहेत. याच्या खोलात पुढे जाता येईल. अगोदर मागील पाच वर्षांमध्ये दलितांवर वाढलेल्या अन्यायाच्या आकडेवारीचा गंभीरतापूर्वक विचार करावा लागेल. भीमा कोरेगावमध्ये दलितविरोधी उसळलेली दंगल हा दलितांना लक्ष्य बनविण्याच्या कटाचाच एक भाग होता; परंतु या दंगलीचा प्रतिकार दलितांनी रस्त्यावर येऊन केला. भीमा कोरेगावची लढाई दलितविरोधी असतानासुद्धा येथील धर्मनिरपेक्ष किंवा पुरोगामी म्हणवणाऱ्या विरोधी पक्षांनी तोंडावर बोट ठेऊन बघ्याची भूमिका घेतली होती. या लढाईत भारिप-बहुजन महासंघाचे अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर उतरले नसते तर भीमा कोरगावातील लढाईला धार आली नसती. यावेळी दलितांचे अनेक स्वयंघोषित राष्ट्रीय नेते मूग गिळून बसले होते. त्यातील कुणीही रस्त्यावर येण्याची हिंमत दाखवलं नाही. अशा वेळी संवैधानिक राजकारण करणाऱ्या ॲड. बाळासाहेब आंबेडकरांना रस्त्यावर उतरण्यावाचून पर्याय नव्हता. भीमा कोरेगाव घटनेच्या निषेधार्थ मुंबईसह महाराष्ट्र बंद होऊ शकतो, हे ॲड. बाळासाहेब आंबेडकरांनी दाखवून दिले. सम्यक मार्गाने राजकारण व समाजकारण करणारे ॲड. बाळासाहेब आंबेडकर हे समाजाचा आवाज बनले. प्रत्येक दलित तरुणांच्या गळ्यातील ताईत बनले.

> 'वंचित बहुजन आघाडीला काँग्रेस महाआघाडीत घेण्याचं राहुल गांधी आणि शरद पवार यांना गांभीर्य वाटलं नसावं. त्यामुळेच त्यांचं मोठं नुकसान झालं. 'वंचित'ने एक जागा मिळवली असली तरी तिला १२ मतदारसंघांमध्ये एक लाखांवर मतं मिळाली. अनेक ठिकाणी भरघोस मतदार करून मतदारांनी 'वंचित'ची ताकद दाखवून दिली आहे. येत्या विधानसभा निवडणुकीत आघाडी उत्तम कामगिरी करणार असून राजकीय परिवर्तन घडणार आहे.'

भीमा कोरगाव दंगलीच्या विरोधात ॲड. आंबेडकर यांनी समाजाच्या बाजूने दिलेला लढाच तमाम आंबेडकरी व दलित समाजात एकीची बीजे रोवणारा होता. त्यास पुढील काळात राजकीय सूत्रामध्ये बांधण्याचा प्रयत्न त्यांनी यशस्वीरित्या केला. हे लोकसभा निवडणुकीत दिसून आले. दलित समाज एकसंघपणे

ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी उभा राहिला. त्यापूर्वी आंबेडकर भवन पाडल्यानंतर दलित समाज बाळासाहेबांच्या बाजूने उभा राहिला होता; परंतु त्यात समाजहित अधिक होते.

भीमा कोरेगावच्या घटनेनंतर ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी समाजाची ताकद उभी राहिली. आंबेडकरी समाजाने एकखांबी नेतृत्व ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्याकडे सोपविले. गटातटात विस्तारलेला दलित समाज ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली एकसंघ झाला आणि रिपब्लिकन पक्षाचे गट-तट बाजूला पडले.

समाजकारणाला राजकारणाची जोड दिल्याशिवाय परिवर्तन घडत नाही, हे बाळासाहेब पुरेपूर जाणून आहेत. यातूनच धनगर समाजाला सोबत घेऊन वंचित बहुजन आघाडीची स्थापना करण्यात आली. पंढरपूरच्या धनगर समाज मेळाव्यात धनगर समाजाच्या पुढाकारातून यावर शिक्कामोर्तब झाले. राजकीय सत्तेपासून वंचित असलेल्या जातसमूहांना जोडण्यात ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांना यश आले. त्यात एमआयएमच्या माध्यमातून मुस्लिम समाजही या आघाडीचा महत्त्वाचा भाग बनला. तेथूनच प्रस्थापित राजकीय पक्षांना हादरे बसायला सुरुवात झाली.

वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून ओबीसींमधील विविध जाती, दलित व मुस्लिमांचे साधलेले नवे समीकरण नव्या पर्वाची नांदीच म्हणावी लागेल. याचा पहिला प्रयोग महात्मा गांधी जयंतीदिनी झाला. या दिवशी आयोजित करण्यात आलेली वंचित बहुजन आघाडी व एमआयएमची संयुक्त विराट सभा परिवर्तनाची साक्ष देणारी त्याचबरोबर महाराष्ट्राच्या राजकारणाला एक नवा पर्याय देणारी ठरली. त्यानंतर प्रत्येक जिल्ह्यात झालेल्या सभा लक्षवेधी राहिल्या. सरकारच्या धोरणांवर सडकून टीका करताना काँग्रेस व राष्ट्रवादीचे वाभाडे सभेच्या माध्यमातून निघू लागले. प्रत्येक समाजातून 'वंचित'मध्ये बोलणारे वक्ते व नेत्यांची फौज तयार झाली. मैदान मारणाऱ्या नेत्यांची भाषणे प्रेरणादायी ठरत गेली. या सभांना मिळणारा प्रतिसाद तुफान व स्वयंस्फूर्त होता. कुठलेही आमिष नव्हते. ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात राज्यात बदल घडवायचा, ही खूणगाठ बांधून लोक सभेला येत होते. सभेला येणारा वर्ग स्वखर्चाने व पोटासाठी भाकरी बांधून येत होता. मार्च व एप्रिल महिन्यांत ४० ते ४२ अंश तापमान असतानाही रखरखत्या उन्हात सभांना मोठी गर्दी उसळली.

या सभांना मिळणारा प्रतिसाद पाहून काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेससह भाजप-सेनेच्या पायाखालची वाळू सरकत गेली. आघाडीबाबत ॲड. बाळासाहेब आंबेडकरांना सोबत घेऊ; पण आम्हाला एमआयएम हे कार्ड चालणार नाही, अशी भाषा काँग्रेस व राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या तोंडून येऊ लागली. एमआयएमचा इतिहास तपासण्यापेक्षा वर्तमानात खासदार असदुद्दीन ओवेसी यांची भाषणे कुठेही राष्ट्रवादाला किंवा देशाच्या धर्मनिरपेक्षतेला बाधा आणणारी नव्हती. देशाच्या हितावरील त्यांची भाषणे ही मोदी सरकारच्या धोरणांवर टीका करणारी व काँग्रेसच्या पुळचट राजकारणाचा समाचार घेणारी होती.

मुळात काँग्रेस-राष्ट्रवादीला मुस्लिम मते ही आमची व्होट बँक असावी, एमआयएमला त्याचे श्रेय जाता कामा नये, हा अहंकार नडला. जागा वाटपाचे भिजत घोंगडे दोन्ही पक्षांनी तसेच ठेवले होते. कमी जागा लढून आम्हाला तुमचा अधिक लाभ मिळवून द्या, अशी त्यांची भूमिका होती. एकूण काय तर, आमच्या मतावर त्यांनी राज्य करावे, असा त्यांचा मतलबी व्यवहार होता. तो ॲड. बाळासाहेबांना मान्य नसल्याने त्यांनी वंचित बहुजन आघाडी स्वबळावर रिंगणात उतरवली. या निवडणुकीच्या निमित्ताने ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी दलित-मुस्लिमांच्या मतांचा वापर थांबविला. ते योग्यच झाले.

ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी मागितलेल्या बारा जागा काँग्रेस आघाडीने दिल्या असत्या, तर आज राज्यात वेगळे चित्र बघायला मिळाले असते. वंचित बहुजन आघाडीसोबत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसची आघाडी व्हावी याकडे राजकीय महत्वाकांक्षा बाळगणारा जाणता राजा व युवराजानेही लक्ष घातले नाही. काँग्रेसने लोकसभेची निवडणूक शरद पवार यांच्या नियोजनाने चालविली. तसे नसते तर राधाकृष्ण विखे पाटील यांच्या चिरंजीवावर भाजपत जाण्याची वेळ आली नसती. 'वंचित'बरोबर काँग्रेस महाआघाडीची आघाडी व्हावी यासंदर्भात शरद पवार व राहुल गांधी यांना गांभीर्य वाटले नसावे. त्यामुळेच त्यांचे अधिक नुकसान झाले, असे मी मानतो.

लोकसभा निवडणुकीच्या काळात वंचित बहुजन आघाडीच्या झालेल्या सभांना मोठा प्रतिसाद मिळाला. प्रस्थापित पक्षांच्या उमेदवारांनी निवडणुकांमध्ये पैसे वाटून राजकीय सूत्रे हलविली. इकडे वंचित बहुजन आघाडीसाठी लोकांनी पैसे जमा करून ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांना दिले. राज्यात हे अपवादानेच घडले असेल. ॲड. बाळासाहेब आंबेडकर, खा. ओवेसी व इतर पक्षांच्या वक्त्यांनी प्रचाराची खिंड लढवली. तरीही वंचित बहुजन आघाडीला औरंगाबादचीच जागा मिळाली. अन्य ठिकाणी आघाडीला यश मिळाले नसले तरी बहुतांश मतदारसंघांमध्ये आघाडीच्या उमेदवारांना चांगली मते मिळाली. बारा ठिकाणी तर 'वंचित'च्या उमेदवारांनी एक लाखापेक्षा अधिक मते मिळवली. पहिल्या प्रयोगात 'वंचित'ला औरंगाबाद वगळता इतरत्र बाजी मारता आली नसली, तरी प्रत्येक मतदारसंघात भरघोस मतं मिळाली. तसे पाहिले तर लोकसभा मतदारसंघ मोठा असतो. पंधरा ते वीस लाख मतदारसंख्या असते. अशा लहान पक्षांच्या उमेदवारांकडे पैसा व यंत्रणेचा मोठा अभाव असताना वाटाघाटी बिघडल्या, की भाजपची बी टीम असा आरोप केला जातो. काँग्रेस व राष्ट्रवादीनेही 'वंचित'वर असा आरोप केला. ही त्यांची दुटप्पी भूमिकाच म्हणावी लागेल. काँग्रेसला पाडण्यासाठी वंचित आघाडीने उमेदवार उभे केल्याचा आरोप करण्यात आला. अकोल्यात मागील अनेक निवडणुकांमध्ये काँग्रेसने ॲड. बाळासाहेब आंबेडकरांना पाडण्याचेच काम केले. तेव्हा बाळासाहेब धर्मांध होते काय? बाळासाहेबांनी अकोला सोडण्याची मागणी काँग्रेसकडे केलीच होती ना. तेव्हा डॉ. बाबासाहेबांचे नातू कधीच दिसले नाहीत. नातू

# लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीला राज्यभरात मिळालेली मते

| मतदारसंघ | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|
| अहमदनगर | सुधाकर आव्हाड | ३१,३८८ |
| अकोला | ॲड. बाळासाहेब आंबेडकर | २,७४,६१८ |
| अमरावती | गुणवंत देवपारे | ६४,५१६ |
| औरंगाबाद | इम्तियाज जलील | ३,८७,५२९ |
| बारामती | नवनाथ पडळकर | ४३,९५३ |
| बीड | प्रा. विष्णू जाधव | ९१,९४५ |
| भंडारा-गोंदिया | एन.के. नान्हे | ४२,९४२ |
| भिवंडी | डॉ. अरूण सावंत | ५०,३८० |
| बुलढाणा | बळीराम सिरस्कार | १,७०,६९४ |
| चंद्रपूर | ॲड. राजेंद्र महाडोळे | ९५,२८५ |
| धुळे | नबी अहमद अहमदुल्ला | ३९,३३६ |
| दिंडोरी | बापू बर्डे | ५७,४८२ |
| गडचिरोली | डॉ. रमेश गजबे | १,०८,७४६ |
| हातकणंगले | अस्लम बादशाहजी | १,१८,२५८ |
| हिंगोली | मोहन राठोड | १,५५,५८३ |
| जळगाव | अंजली बाविस्कर | ३७,१६४ |
| जालना | डॉ. शरदचंद्र वानखेडे | ७६,४०० |
| कल्याण | संजय हेडाऊ | ६३,१०६ |
| कोल्हापूर | डॉ. अरूणा माळी | ६३,२५१ |
| लातूर | राम गारकर | १,०८,०५० |
| माढा | ॲड. विजय मोरे | ५१,२०५ |
| मावळ | राजाराम पाटील | ७५,७१३ |
| मुंबई दक्षिण | डॉ. अनिलकुमार | ३०,२१३ |
| मुंबई उत्तर | सुनील थोरात | १४,६३९ |
| मुंबई उत्तर मध्य | अब्दुर रहेमान अंजारिया | ३३,३०० |
| मुंबई उत्तर पूर्व | निहारिका खोदले | ६८,०७९ |
| मुंबई उत्तर पश्चिम | सुरेश शेट्टी | २२,९६८ |
| मुंबई दक्षिण मध्य | डॉ. संजय भोसले | ६३,२५६ |
| नागपूर | सागर डाबरसे | २३,३५४ |
| नांदेड | प्रा. डॉ. यशपाल भिंगे | १,६२,६१२ |
| नंदूरबार | सुशील अंतुर्लीकर | २५,५९४ |
| नाशिक | पवन पवार | १,०४,२१४ |
| उस्मानाबाद | अर्जुन सलगर | ९८,१०८ |
| पालघर | सुरेश पाडवी | १३,७१५ |
| परभणी | आलमगीर खान | १,४९,८३४ |
| पुणे | अनिल जाधव | ५९,३९८ |
| रायगड | सुमन कोळी | २३,०४२ |
| रामटेक | किरण पाटणकर | २६,०५२ |
| रत्नागिरी-सिंधुदुर्ग | मारूती जोशी काका | ३०,६३९ |
| रावेर | नितीन कांडेलकर | ८८,१०८ |
| सांगली | गोपिचंद पडळकर | २,९२,००० |
| सातारा | सहदेव ऐवळे | ४०,३०३ |
| शिर्डी | संजय सुखदान | ६२,९५२ |
| शिरूर | राहुल ओव्हाळ | ३८,०२८ |
| सोलापूर | ॲड. बाळासाहेब आंबेडकर | १,६८,४३४ |
| ठाणे | मल्लिकार्जून पुजारी | ४५,१६७ |
| वर्धा | धनराज वंजारी | २८,२९१ |
| यवतमाळ-वाशिम | प्रा. प्रवीण पवार | ९०,९९४ |
| **एकूण** | | **४०,१०,८२८** |

राजकारणात उभा राहिला नाही पाहिजे,याचीच अधिक काळजी काँग्रेसने घेतली. यावेळीसुद्धा काँग्रेसने तेच केले.

दलित, मुस्लिम व ओबीसींच्या अधिकारांचे राजकारण वंचित बहुजन आघाडी करत असल्यास त्याचे वावगे वाटण्याचे कारण नसावे, असे मी समजतो. दलित, मुस्लिम व इतर लहान ओबीसी जातींनी वर्षोनुवर्षे आपणास मतदान करावे आणि आपण सत्तेचा सोपान चढावा, असेच कित्येक वर्षे चालत आले. आम्ही राजकीय महत्वाकांक्षा ठेवली, की जातीवादी पक्षांना अप्रत्यक्ष मदत करतोय, असा आरोप केला जातो. त्यांच्या सोयीचे राजकारण आम्ही चालवून घ्यायचे, असाच याचा अर्थ होतो.

वंचित बहुजन आघाडी ही कोणाची बी टीम नसून स्वतःचे नवे राजकारण उभे करून नवा राजकीय पर्याय प्रस्थापितांविरोधात उभा करत आहे. ती भाजप-सेना असो, की काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस असो. त्यामुळेच औरंगाबादमधून सेनेचा खासदार पराभूत झाला. तिथे वंचित बहुजन आघाडीने काँग्रेसला थोडेच पराजित केले? सेना-भाजपची पाठ लोळविली.

या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीला राज्यभरात चाळीस लाखांहून अधिक मतदान झाले आहे. काँग्रेसचा राज्यातील जनाधर घटत असून या निवडणुकीत काँग्रेस ऐंशी लाखांवर आली आहे. देशपातळीवर कमकुवत झालेल्या काँग्रेसला साथ देण्यापेक्षा वंचित बहुजन आघाडीने स्वबळावर निवडणूक लढणे अधिक फायद्याचे राहिले. विधानसभेत आमची आघाडी उत्तम कामगिरी करणार असून अनेक जागांवर विजय नक्की मिळणार आहे. लोकसभा निवडणुकीत मतदारांनी एकसंघ ताकद दाखवून दिली. त्यामुळे काँग्रेस व राष्ट्रवादीला वंचितच्या ताकदीची चिंता सतावू लागली आहे. आता वंचित बहुजन आघाडी राजकारणाचा प्रयोग राहिली नसून प्रादेशिक पक्ष म्हणून नावारुपाला येत आहे. पुढील निवडणुकीत संघटनात्मक व सूक्ष्म पद्धतीने नियोजन करून प्रत्येक मतदारसंघात तगडे उमेदवार दिल्यास समाधानकारक यश मिळू शकते. लोकसभेत एक जागा आली, पण इतर ठिकाणी मतदारांनी भरघोस मतदान करून वंचितची ताकद आघाडीसह युतीला दाखवून दिली आहे. या ताकदीचे रुपांतर विधानसभेला विजयामध्ये होणार अशी खात्री वाटते. ●●●

# मातब्बरांचे पानिपत

१७ व्या लोकसभा निवडणुकीत अनेक दिग्गजांना पराभवाला सामोरे जावे लागले. यामध्ये काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीद्वय अशोक चव्हाण आणि सुशीलकुमार शिंदे, मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजयसिंग, हरियाणाचे माजी मुख्यमंत्री भूपेंद्रसिंह हुडा, जम्मू-काश्मिरच्या मुख्यमंत्री महेबुबा मुफ्ती, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री वीरप्पा मोईली या प्रमुख नेत्यांचा समावेश आहे.

काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी केरळमधील वायनाडमधून विक्रमी पावणेआठ लाख मतांच्या आघाडीने निवडून आले असले तरी त्यांच्या पारंपारिक अमेठी मतदारसंघातून मात्र ते पराभूत झाले. केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी त्यांचा ५५,२१० मतांनी पराभव केला.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण नांदेडमधून पराभूत झाले. भाजपचे प्रताप पाटील चिखलीकर यांनी त्यांचा ४०,०१० मतांनी पराभव केला. माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे हे सलग दुसऱ्यांदा सोलापुरातून हरले. यावेळी त्यांना भाजपचे सिद्धेश्वर स्वामी यांनी १,५८,६०८ मतांनी पराभूत केले. काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे यवतमाळमधून पराभूत झाले. शिवसेनेच्या भावना गवळींनी त्यांना १,१७,०४८ मतांनी मात दिली. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा अकोला व सोलापूर अशा दोन्ही मतदारसंघांतून पराभव झाला. अकोल्यात भाजपचे संजय धोत्रे यांनी त्यांना २,७५,५९६ मतांनी हरवले. सोलापूर मतदारसंघात ते तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांचा शिवसेनेच्या धैर्यशील माने यांनी ९६,०३९ मतांनी पराभव केला. यामुळे हातकणंगले मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा लोकसभेत बसण्याची त्यांची संधी हुकली. चंद्रपूर मतदारसंघातून काँग्रेसचे बाळू धानोरकर यांनी विद्यमान केंद्रीय मंत्री हंसराज अहिर यांचा ४५,३५५ मतांनी पराभव केला. या ठिकाणी काँग्रेसने अगोदरचा आपला उमेदवार बदलून धानोरकर यांना रिंगणात उतरवले होते. माजी पंतप्रधान एच.डी. देवेगौडा हे कर्नाटकातील तुमकूर मतदारसंघातून हरले. भाजपचे जी.एस. बसवराज यांनी त्यांना पराभूत केले. ही देवेगौडांची शेवटची निवडणूक मानली जात होती. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्राचे प्रभारी मल्लिकार्जून खरगे गुलबर्गा मतदारसंघातून पराभूत झाले. त्यांना भाजपचे उमेश जी. जाधव यांनी हरवले. खरगे यांचा पराभव काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जात आहे. मध्यप्रदेशचे दोनवेळा मुख्यमंत्री राहिलेले राज्यसभा सदस्य दिग्विजयसिंग भोपाळमधून पराभूत झाले. भाजपच्या प्रज्ञासिंग ठाकूर यांनी त्यांचा साडेतीन लाखांवर मतांनी पराभव केला. कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री वीरप्पा मोईली चिकबेलापूर मतदारसंघातून पराभूत झाले. भाजपचे बी.एन.बचेगौडा यांनी त्यांचा १ लाख ८२ हजार ११० मतांनी पराभव केला.

पीपल्स डेमॉक्रॅटिक पार्टीच्या नेत्या आणि जम्मू-काश्मिरच्या माजी मुख्यमंत्री महेबुबा मुफ्ती अनंतनाग मतदारसंघातून पराभूत झाल्या. त्यांना नॅशनल कॉन्फरन्सचे हसनैन मसुदी यांनी हरवले. हरियाणाचे माजी मुख्यमंत्री भूपेंद्रसिंह हुडा हे सोनिपत मतदारसंघातून निवडणूक हरले. भाजपचे रमेशचंद्र कौशिक यांनी त्यांना पराभूत केले. काँग्रेस उमेदवार ज्योतिरादित्य शिंदे गुना मतदारसंघातून पराभूत झाले. भाजपचे कृष्णपाल सिंग यांनी त्यांना दीड लाखांवर मतांनी पराभूत केले. निवडणुकीच्या तोंडावर मुंबई प्रदेश काँग्रेसची धुरा सांभाळलेले मिलिंद देवरा दक्षिण मुंबई मतदारसंघातून पराभूत झाले. शिवसेनेच्या अरविंद सावंत यांनी त्यांना एक लाख सदुसष्ठ मतांनी हरवले.

खासदारकीचा राजीनामा देऊन भाजपमधून काँग्रेसमध्ये आलेले नाना पटोले नागपूरमधून हरले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांचा २,१३,१२७ मतांनी पराभव केला. जवाहरलाल नेहरू विद्यापीठ विद्यार्थी संघाचा माजी अध्यक्ष कन्हैयाकुमार बिहारमधील बेगुसराईमधून निवडणूक हरला. केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांनी त्याला मात दिली. महाराष्ट्र स्वाभिमानी पक्षाने नीलेश राणे रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून निवडणूक हरले. शिवसेनेचे विनायक राऊत यांनी त्यांचा १,७८,३२२ मतांनी पराभव केला. उत्तरप्रदेशातील कन्नौज मतदारसंघाचे दोन वेळा प्रतिनिधित्व करणाऱ्या डिंपल यादव यांचा भाजपचे सुब्रत पाठक यांनी १० हजारांवर मतांनी पराभव केला. समाजवादी पार्टीचे सर्वेसर्वा आणि उत्तरप्रदेशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांच्या डिंपल यादव या पत्नी आहेत. ●●●

## सिताऱ्यांचा जय-पराजय

अनेक सिनेताऱ्यांनी या निवडणुकीत आपले नशीब आजमावले. यातील सनी देओल (भाजप), बाबुल सुप्रियो (भाजप), मिमी चक्रवर्ती (तृणमुल काँग्रेस), गौतम गंभीर (भाजप), हंसराज हंस (भाजप), रवी किशन (भाजप), हेमा मालीनी (भाजप), मनोज तिवारी (भाजप), किरण खेर (भाजप) आदी कलावंतांनी बाजी मारली. मात्र शत्रुघ्न सिन्हा (काँग्रेस), जया प्रदा (भाजप), उर्मिला मातोंडकर (काँग्रेस), पुनम सिन्हा (काँग्रेस) हे निवडणुकीत पराभुत झाले. भाजप विरोधात जहरी टिका करणारे दक्षिणात्य बहुभाषीक अभिनेता प्रकाश राज हे २८ हजार ९०६ मते घेऊत तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

# लोकसभा निवडणूक २०१९:
# राज्यनिहाय निकाल

### उत्तरप्रदेश : ८०

| पक्ष | २०१९ | २०१४ |
|---|---|---|
| भाजप | ६१ | ७१ |
| काँग्रेस | १ | २ |
| बसपा | १० | ० |
| सपा | ६ | ५ |
| अपना दल | २ | २ |

### महाराष्ट्र : ४८

| पक्ष | २०१९ | २०१४ |
|---|---|---|
| भाजप | २३ | २३ |
| शिवसेना | १८ | १८ |
| काँग्रेस | १ | २ |
| राष्ट्रवादी | ५ | ४ |
| वंबआ | १ | – |

### पश्चिम बंगाल : ४२

| | | |
|---|---|---|
| भाजप | १८ | २ |
| काँग्रेस | २ | ४ |
| तृणमूल काँग्रेस | २२ | ३४ |
| भाकप (मा) | ० | २ |

### बिहार : ४०

| | | |
|---|---|---|
| भाजप | १७ | २२ |
| काँग्रेस | १ | २ |
| जदयू | १६ | २ |
| लो.ज.पार्टी | ६ | ६ |
| रा.लो.स.पा. | ० | ३ |
| रा.ज.दल | ० | ४ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ० | १ |

### तामिळनाडू : ३९

| | | |
|---|---|---|
| काँग्रेस | ८ | ० |
| द्रमुक | २३ | ० |
| अण्णाद्रमुक | १ | ३७ |
| भाकप | २ | ० |
| व्ही.सी.के. | १ | ० |
| माकप | २ | ० |
| आय.यू.एम.एल. | १ | ० |
| भाजप | ० | १ |
| पीएमके | ० | १ |

### मध्यप्रदेश : २९

| | | |
|---|---|---|
| भाजप | २८ | २७ |
| काँग्रेस | १ | २ |

### कर्नाटक : २८

| | | |
|---|---|---|
| भाजप | २५ | १७ |
| काँग्रेस | १ | ९ |
| जनता दल (ध) | १ | २ |
| इतर | १ | ० |

### गुजरात : २६

| | | |
|---|---|---|
| भाजप | २६ | २६ |
| काँग्रेस | ० | ० |
| बीटीपी | ० | ० |

### राजस्थान : २५

| | | |
|---|---|---|
| भाजप | २४ | २५ |
| काँग्रेस | ० | ० |
| बीटीपी | ० | ० |
| आरएलपी | १ | ० |

### आंध्रप्रदेश : २५

| | | |
|---|---|---|
| तेलुगू देसम पक्ष | ३ | १५ |
| वायएसआर काँग्रेस | २२ | ८ |
| भाजप | ० | २ |
| काँग्रेस | ० | ० |
| जनसेना | ० | ० |

### ओडिशा : २१

| | | |
|---|---|---|
| भाजप | ८ | १ |
| बीजेडी | १२ | २० |
| काँग्रेस | १ | ० |

### केरळ : २०

| | | |
|---|---|---|
| आययूएमएल | २ | २ |
| काँग्रेस | १५ | ८ |
| केसी (मनी) | १ | १ |
| डावी आघाडी | १ | ६ |
| आरएसपी | १ | १ |
| अपक्ष | ० | २ |

### उत्तराखंड : ५

| | | |
|---|---|---|
| भाजप | ५ | ५ |
| काँग्रेस | ० | ० |

### तेलंगणा : १७

| | | |
|---|---|---|
| टीआरएस | ९ | ११ |
| काँग्रेस | ३ | २ |
| भाजप | ४ | १ |
| एआयएमआयएम | १ | १ |
| तेलुगू देसम पक्ष | ० | १ |
| वायएसआर काँग्रेस | ० | १ |

### झारखंड : १४

| | | |
|---|---|---|
| भाजप | ११ | १२ |
| काँग्रेस | १ | ० |
| एजेएसव्ही | १ | ० |
| झामुमो | १ | २ |

### आसाम : १४

| | | |
|---|---|---|
| भाजप | ९ | ७ |
| काँग्रेस | ३ | ३ |
| आ.ग.प. | १ | ० |
| एआययूडीएफ | १ | ३ |
| अपक्ष | ० | १ |

### पंजाब : १३

| | | |
|---|---|---|
| भाजप | २ | २ |
| काँग्रेस | ८ | ३ |
| आप | १ | ४ |
| शि.अ.दल | २ | ४ |

### छत्तीसगड : ११

| | | |
|---|---|---|
| भाजप | ९ | १० |
| काँग्रेस | २ | १ |

### हरियाणा : १०

| | | |
|---|---|---|
| भाजप | १० | ७ |
| काँग्रेस | ० | १ |
| भारालो | ० | २ |

### दिल्ली : ७

| | | |
|---|---|---|
| भाजप | ७ | ७ |
| काँग्रेस | ० | ० |
| आप | ० | ० |

### हिमाचल प्रदेश : ४

| | | |
|---|---|---|
| भाजप | ४ | ४ |
| काँग्रेस | ० | ० |

### जम्मू-काश्मिर : ६

| | | |
|---|---|---|
| भाजप | ३ | ३ |
| काँग्रेस | ० | ० |
| नॅशनल कॉन्फरन्स | ३ | ० |
| जेकेपीडीपी | ० | ३ |

### गोवा : २

| | | |
|---|---|---|
| भाजप | १ | २ |
| काँग्रेस | १ | ० |

### मेघालय : २

| | | |
|---|---|---|
| भाजप | ० | ० |
| काँग्रेस | १ | १ |
| एनपीपी | १ | १ |

### मणिपूर : २

| | | |
|---|---|---|
| भाजप | १ | ० |
| काँग्रेस | ० | २ |
| इतर | १ | ० |

### त्रिपुरा : २

| | | |
|---|---|---|
| भाजप | २ | ० |
| काँग्रेस | ० | ० |
| माकप | ० | २ |

### अरूणाचल प्रदेश : २

| | | |
|---|---|---|
| भाजप | २ | १ |
| काँग्रेस | ० | १ |

### मिझोराम : १

| | | |
|---|---|---|
| भाजप | ० | ० |
| एमएनएफ | १ | ० |
| काँग्रेस | ० | १ |

### सिक्कीम : १

| | | |
|---|---|---|
| भाजप | ० | ० |
| काँग्रेस | ० | ० |
| एसडीएफ | ० | १ |
| इतर | १ | ० |

### नागालॅण्ड : १

| | | |
|---|---|---|
| एनडीपीपी | १ | ० |
| काँग्रेस | ० | ० |
| नापीफ्र | ० | १ |

### अंदमान आणि निकोबार बेटे : १

| | | |
|---|---|---|
| काँग्रेस | १ | ० |
| भाजप | ० | १ |

### दादरा आणि नगर हवेली : १

| | | |
|---|---|---|
| काँग्रेस | ० | ० |
| भाजप | ० | १ |
| इतर | १ | ० |

### चंदीगड : १

| | | |
|---|---|---|
| भाजप | १ | १ |
| काँग्रेस | ० | ० |

### दीव आणि दमण : १

| | | |
|---|---|---|
| काँग्रेस | ० | ० |
| भाजप | १ | १ |

### पाँडिचेरी : १

| | | |
|---|---|---|
| काँग्रेस | १ | ० |
| भाजप | ० | ० |
| एटीएनआर (कॉं) | ० | १ |

### लक्षद्वीप : १

| | | |
|---|---|---|
| काँग्रेस | ० | ० |
| भाजप | ० | ० |
| राष्ट्रवादी काँग्रेस | १ | १ |

# महाराष्ट्राचा मतदारसंघनिहाय निकाल

### नंदुरबार
**हीना गावित (भाजप) ....... ६,३९,१३६**
ॲड. के. सी. पाडवी (काँग्रेस)......५,४३,५०७
सुशील अंतुर्लीकर (वंचित आघाडी) .. २५,७०२

### धुळे
**डॉ. सुभाष भामरे (भाजप).. ६,१३,५३३**
कुणाल पाटील (काँग्रेस)............३,८४,२९०
नबी अहमद (वंचित आघाडी) ......... ३९,४४९

### जळगाव
**उन्मेष पाटील (भाजप) ..... ७,११,५८८**
गुलाबराव देवकर (राष्ट्रवादी काँग्रेस)३,०१,२६८
अंजली बाविस्कर (वंचित आघाडी)... ३७,३५०

### रावेर
**रक्षा खडसे (भाजप)......... ६,५५,३८६**
डॉ. उल्हास पाटील (काँग्रेस).......३,१९,५०४
नितीन कांडेलकर (वंचित आघाडी)...८८,३६५

### बुलडाणा
**प्रताप जाधव (शिवसेना).... ४,६४,६१८**
डॉ. राजेंद्र शिंगणे (राष्ट्रवादी काँग्रेस)३,४६,९७४
बळीराम सिरस्कार (वंचित आघाडी)१,५७,१३९

### अकोला
**संजय धोत्रे (भाजप) ........ ४,१५,७४०**
प्रकाश आंबेडकर (वंचित आघाडी) २,७३,११२
हिदायत पटेल (काँग्रेस) ............२,४७,०२१

### अमरावती
**नवनीत राणा (अपक्ष)....... ५,०७,८४४**
आनंदराव अडसूळ (शिवसेना)......४,७०,५४९
गुणवंत देवपारे (वंचित आघाडी) ...... ६४,५९५

### वर्धा
**रामदास तडस (भाजप)..... ४,०३,५६२**
चारुलता टोकस (काँग्रेस)..........२,६७,०४७
शैलेश अग्रवाल (बसपा) ............... २७,५७२

### रामटेक
**कृपाल तुमाने (शिवसेना) ... ३,९७,७७२**
किशोर गजभिये (काँग्रेस) ..........३,२६,७३९
किरण रोडगे (वंचित आघाडी)........ २२,१०९

### नागपूर
**नितीन गडकरी (भाजप).... ६,३७,६०५**
नाना पटोले (काँग्रेस)...............४,३२,१७१
मोहम्मद जमाल (बसपा) ................ १,७१४

### भंडारा-गोंदिया
**सुनील मेंढे (भाजप)......... ६,१८,९७६**
नाना पंचबुद्धे (राष्ट्रवादी)............४,२९,६७३
विजया नांदुरकर (बसपा) .............५१,७१७

### गडचिरोली-चिमूर
**अशोक नेते (भाजप)........ ४,०६,२४५**
डॉ. नामदेव उसेंडी (काँग्रेस)........३,५५,३३०
रमेश गजबे (वंचित आघाडी) ......... ९८,४९१

### चंद्रपूर
**सुरेश धानोरकर (काँग्रेस). २,८९,१३८**
हंसराज अहीर (भाजप).......... २,७७,९१२
ॲड.राजेंद्र महाडोळे (वंचित आघाडी) ... ९२,४६२

### यवतमाळ-वाशीम
**भावना गवळी (शिवसेना) . ४,४०,४७७**
माणिकराव ठाकरे (काँग्रेस) ...... ३,४७,६०९
प्रवीण पवार (वंचित आघाडी) ...... ७६,६५४

### हिंगोली
**हेमंत पाटील (शिवसेना) .. ५,३९,२३१**
सुभाष वानखेडे (काँग्रेस) ........ २,८४,९०१
मोहन राठोड (वंचित आघाडी) .. १,५८,५९३

### नांदेड
**प्रताप चिखलीकर (भाजप)४,७५,८०१**
अशोक चव्हाण (काँग्रेस) .........४,३३,५०२
यशपाल भिंगे (वंचित आघाडी).. १,६२,६१२

### परभणी
**संजय जाधव (शिवसेना).. ५,२९,१४८**
राजेश विटेकर (राष्ट्रवादी काँग्रेस)४,९१,००२
आलमगीर खान (वंचित आघाडी)१,४७,८४९

### जालना
**रावसाहेब दानवे (भाजप). ६,६७,५०९**
विलास औताडे (काँग्रेस)......... ३,५२,९५९
शरदचंद्र वानखेडे (वंचित आघाडी) ७४,८८७

### औरंगाबाद
**इम्तियाज जलील (एमआयएम)३,८७,९२५**
चंद्रकांत खैरे (शिवसेना) ......... ३,८१,८३०
हर्षवर्धन जाधव (अपक्ष).......... २,८१,६५६

### दिंडोरी
**भारती पवार (भाजप)..... ५,६७,४७०**
धनराज महाले (राष्ट्रवादी)........ ३,६८,६९१
जे. पी. गावित (माकप) .......... १,०९,५७०

### नाशिक
**हेमंत गोडसे (शिवसेना) . ५,६१,६९८**
समीर भुजबळ (राष्ट्रवादी) ........ २,७०,७८३
माणिकराव कोकाटे (अपक्ष) ..... १,३४,२११

### पालघर
**राजेंद्र गावित (शिवसेना)......... ५,७९,९८९**
बळीराम जाधव (वंचित)....................४,९१,३९१
दत्ताराम करबत (अपक्ष).......................१३,९२१

### भिवंडी
**कपिल पाटील (भाजप) .......... ५,१८,०३१**
सुनील टावरे (काँग्रेस)........................३,६४,८५५
प्रो. अरुण सावंत (वंचित आघाडी)..........५०,८६९

### कल्याण
**श्रीकांत शिंदे (शिवसेना) ......... ५,४७,७९२**
बाबाजी पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) .........१,८०,५३७
संजय हेडाऊ (वंचित आघाडी)................६४,४२४

### ठाणे
**राजन विचारे (शिवसेना)..७,२५,००९**
आनंद परांजपे (राष्ट्रवादी)........ ३,२१,६५१
मल्लिकार्जुन पुजारी (वंचित आघाडी)४६,५५२

### उत्तर मुंबई
**गोपाळ शेट्टी (भाजप) ..... ६,३५,८७२**
ऊर्मिला मातोंडकर (काँग्रेस)..... २,१६,९१८
सुनील थोरात (वंचित आघाडी).... ११,८२०

### वायव्य मुंबई
**गजानन कीर्तिकर (शिवसेना)५,५२,८११**
संजय निरुपम (काँग्रेस).......... ३,००,९८०
सुरेश शेट्टी (वंचित आघाडी)........ २२,९६६

### ईशान्य मुंबई
**मनोज कोटक (भाजप)...५,१३,५७९**
संजय दिना पाटील (काँग्रेस) .... २,८७,५५५
निहारिका खोंडालय (वंचित आघाडी)६८,०८९

### उत्तर मध्य मुंबई
**पूनम महाजन (भाजप) ...४,८२,८८०**
प्रिया दत्त (काँग्रेस)............... ३,५४,९८९
अब्दूर रेहमान (वंचित आघाडी).... ३३,३२२

### दक्षिण मध्य मुंबई
**राहुल शेवाळे (शिवसेना)..४,२३,७४३**
एकनाथ गायकवाड (काँग्रेस)..... २,७२,३९३
संजय भोसले (वंचित आघाडी) .... ६३,२५६

### दक्षिण मुंबई
**अरविंद सावंत (शिवसेना) ४,२०,५३०**
मिलिंद देवरा (काँग्रेस)........... ३,२१,३६२
अनिल कुमार (वंचित आघाडी) .... ३०,२१३

### रायगड
**सुनील तटकरे (राष्ट्रवादी).४,८६,९६८**
अनंत गिते (शिवसेना)........... ४,५५,५३०
सुमन कोळी (वंचित आघाडी)...... २३,०४१

### मावळ
**श्रीरंग बारणे (शिवसेना)...७,१८,९५०**
पार्थ पवार (राष्ट्रवादी)............ ५,०३,३७५
राजाराम पाटील (वंचित आघाडी) . ७५,७१३

### पुणे
**गिरीश बापट (भाजप) ....५,३४,७९८**
मोहन जोशी (काँग्रेस)............ २,५५,८४८
अनिल जाधव (वंचित आघाडी).... ५६,६९४

### बारामती
**सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी)....६,८३,७०५**
कांचन कुल (भाजप) ............ ५,२८,७११
नवनाथ पडळकर (वंचित आघाडी) ४३,०००

### शिरूर
**डॉ. अमोल कोल्हे (राष्ट्रवादी)६,३४,५५४**
शिवाजीराव आढळराव (शिवसेना) ५,७६,००२
राहुल ओव्हाळ (वंचित आघाडी)..... ३८,०७०

### नगर
**सुजय विखे पाटील (भाजप)५,७३,६०७**
संग्राम जगताप (राष्ट्रवादी)........ ३,४४,८२७
सुधाकर आव्हाड (वंचित आघाडी) २४,९०९

### शिर्डी
**सदाशिव लोखंडे (शिवसेना) ४,८६,८२०**
भाऊसाहेब कांबळे (काँग्रेस) ..... ३,६६,६२५
संजय सुखधन (वंचित आघाडी)... ६३,२८७

### बीड
**प्रीतम मुंडे (भाजप)........ ६,७८,१७५**
बजरंग सोनवणे (राष्ट्रवादी काँग्रेस)५,९०,८०७
प्रा. विष्णू जाधव (वंचित आघाडी) ९२,१३९

### उस्मानाबाद
**ओमराजे निंबाळकर(शिवसेना) ५,९६,६४०**
राणा पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस).. ४,६९,०७४
अर्जुन सलगर (वंचित आघाडी).... ९८,१०८

### लातूर
**सुधाकर शृंगारे (भाजप) .. ६,४३,१९१**
मच्छिंद्र कामत (काँग्रेस).......... ३,५७,८४९
राम गारकर (वंचित आघाडी).... १,९०,१७८

### सोलापूर
**जयसिद्धेश्वर स्वामी (भाजप)५,२४,९८५**
सुशीलकुमार शिंदे (काँग्रेस) ...... ३,६६,३७७
ॲड. प्रकाश आंबेडकर (वंचित आघाडी)१,७०,००७

### माढा
**रणजितसिंह नाईक निंबाळकर (भाजप) ...............................५,८३,१९१**
संजयमामा शिंदे (राष्ट्रवादी) ...... ४,९८,४४१
ॲड. विजय मोरे (वंचित आघाडी). ५१,३४९

### सांगली
**संजय पाटील (भाजप)....४,९७,५७३**
विशाल पाटील (काँग्रेस).......... ३,३८,११६
गोपीचंद पडळकर (वंचित आघाडी)२,९३,०९३

### सातारा
**उदयनराजे भोसले (राष्ट्रवादी)५,७१,७७०**
नरेंद्र पाटील (शिवसेना).......... ४,४६,६९२
आनंद थोरवडे (बहुजन समाज पक्ष). ६,७८९

### रत्नागिरी - सिंधुदुर्ग
**विनायक राऊत (शिवसेना) ४,५४,९२७**
नीलेश राणे (स्वाभिमान)........ २,७८,११३
नवीनचंद्र बांदिवडेकर (काँग्रेस) ..... ६२,७१७

### कोल्हापूर
**संजय मंडलिक (शिवसेना)७,८६,०३९**
धनंजय महाडिक (राष्ट्रवादी काँग्रेस)४,४४,१८१
माळी (वंचित आघाडी)............... ६०,०८१

### हातकणंगले
**धैर्यशील माने (शिवसेना) ४,८६,०३९**
राजू शेट्टी (स्वाभिमानी संघटना)..४,३६,०५७
सय्यद अस्लम (वंचित आघाडी)..१,१६,४५०

**सर्वाधिक २५ खासदार मराठा समाजाचे :** महाराष्ट्रातील ४८ पैकी २५ खासदार मराठा समाजाचे आहेत. त्या खालोखाल अनुसूचित जातीचे ६ आणि अनुसूचित जमातीचे ४ खासदार आहेत. कुणबी आणि ब्राह्मण प्रत्येकी ३ तर २ हिंदी भाषिक खासदार आहेत. मुस्लिम, तेली, माळी, गवळी, शेट्टी प्रत्येकी १ असे खासदारांचे जातनिहाय प्रमाण आहे.

# नवीन केंद्रीय मंत्रीमंडळ

## कॅबिनेट मंत्री

**नरेंद्र मोदी–** पंतप्रधान

**नितीन गडकरी –** रस्ते आणि वाहतूक

**अमित शहा –** गृह

**पीयूष गोयल –** रेल्वे

**राजनाथ सिंह –** संरक्षण

**एस. जयशंकर –** परराष्ट्र मंत्री

**अरविंद सावंत –** अवजड उद्योग

**थावरचंद सिंग गेहलोत –** सामाजिक न्याय

**प्रकाश जावडेकर –** माहिती आणि प्रसारण, पर्यावरण

**स्मृती इराणी –** महिला आणि बालकल्याण

**डॉ. हर्षवर्धन –** आरोग्य

**निर्मला सीतारामन –** अर्थ

**सदानंद गौडा –** रसायन आणि खते

**नरेंद्रसिंग तोमर –** कृषी आणि ग्रामविकास

**रमेश पोखरियाल निशंक –** मनुष्यबळ विकास

**अर्जुन मुंडा –** आदिवासी विकास

**धर्मेंद्र प्रधान –** पेट्रोलियम

**मुख्तार अब्बास नकवी –** अल्पसंख्याक कल्याण

**फग्गनसिंह कुलस्ते –** राज्यमंत्री

**महेंद्रनाथ पांडेय –** कौशल्य विकास

**गजेंद्र सिंग शेखावत –** जलसंपदा

**हरसिमरत कौर बादल –** अन्नप्रक्रिया उद्योग

**रविशंकर प्रसाद –** कायदे आणि माहिती तंत्रज्ञान

**गिरीराज सिंह –** पशुकल्याण

**रामविलास पासवान –** ग्राहक संरक्षण आणि अन्न वितरण

## स्वतंत्र प्रभार राज्यमंत्री

**राव इंद्रजीत सिंह –** सांख्यिकी राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार)

**संतोष गंगवार –** कामगार राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार)

**श्रीपाद नाईक –** आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार)

**जितेंद्र सिंह –** ईशान्य भारत विकास राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार)

**प्रल्हाद पटेल –** सांस्कृतिक राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार)

**अर्जुनराम मेघवाल –** संसदीय कामकाज राज्यमंत्री

**जनरल व्ही. के. सिंह –** वाहतूक राज्यमंत्री

**कृष्णपाल गुर्जर –** सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री

**रावसाहेब दानवे –** सार्वजनिक वितरण राज्यमंत्री

**आर. के .सिंह –** ऊर्जा राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार)

**मनसुख मांडविया –** नौकानयन राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार)

**जी.कृष्णा रेड्डी –** गृह राज्यमंत्री

**पुरुषोत्तम रुपाला –** कृषी राज्यमंत्री

**किरण रिजीजू –** युवक आणि क्रीडा कल्याण राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार)

**हरदीप सिंग पुरी –** गृहनिर्माण आणि नगरविकास राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार)

## राज्यमंत्री

**बाबुल सुप्रियो –** पर्यावरण राज्यमंत्री

**संजीव बालियान –** प्राणी आणि पशुकल्याण राज्यमंत्री

**संजय धोत्रे –** मनुष्यबळ विकास राज्यमंत्री

**अनुराग ठाकूर –** अर्थ राज्यमंत्री

**सुरेश अंगडी –** रेल्वे राज्यमंत्री

**रत्तनलाल कटारिया –** जलसंपदा राज्यमंत्री

**व्ही. मुरलीधरन –** परराष्ट्र राज्यमंत्री

**रेणुका सिंग सरुता –** आदिवासी राज्यमंत्री

**सोम प्रकाश –** वाणिज्य आणि व्यापार राज्यमंत्री

**रामेश्वर तेली –** अन्नप्रक्रिया राज्यमंत्री

**कैलाश चौधरी –** कृषी राज्यमंत्री

**देबोश्री चौधरी –** महिला आणि बालकल्याण राज्यमंत्री

**नित्यानंद राय –** गृह राज्यमंत्री

**रामदास आठवले –** सामाजिक न्याय राज्यमंत्री

**साध्वी निरंजन ज्योती –** ग्रामविकास राज्यमंत्री

**प्रल्हाद जोशी –** संसदीय कामकाज राज्यमंत्री

**प्रताप सारंगी –** सुक्ष आणि लघु उद्योग राज्यमंत्री


**अश्विनीकुमार चौबे –** आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्री

# भारताचे आतापर्यंतचे पंतप्रधान

देशाने २०१९ पर्यंत २० पंतप्रधान पाहिले. त्यापैकी सर्वाधिक १० काँग्रेसचे होते. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसची जवळपास ५४ वर्षे केंद्रात सत्ता होती. १९७७ पासून देशात काँग्रेसेत्तर सरकारे यायला लागली. मात्र अशी बहुतांश सरकारे अल्पकाळ ठरली. २४ मार्च १९७७ रोजी सत्तेत आलेले मोरारजी देसाई यांचे पहिले काँग्रेसेत्तर सरकार आणि विश्वनाथ प्रतापसिंग सरकार पक्षांतर्गत कलहामुळे कोसळले. तर चौधरी चरणसिंग, चंद्रशेखर, देवेगौडा यांची सरकारे काँग्रेसने पाठिंबा काढल्याने पडली.



**पं.जवाहरलाल नेहरू** (काँग्रेस) (१५ ऑगस्ट १९४७ ते १९५२. पहिली निवडणूक १९५२ ला झाली.) १९५२ ते १९५७, १९५७ ते १९६४.



**गुलझारीलाल नंदा** (हंगामी) (काँग्रेस) २७ मे १९६४ ते ९ जून १९६४ (नेहरू यांच्या निधनानंतर)



**लाल बहादूर शास्त्री** (काँग्रेस) ९ जून १९६४ ते ११ जानेवारी १९६६

**गुलझारीलाल नंदा** (हंगामी) (काँग्रेस) ११ जानेवारी १९६६ ते २४ जानेवारी १९६६ (शास्त्री यांच्या निधनानंतर)



**इंदिरा गांधी** (काँग्रेस) १९६६ ते १९७१, १९७१ ते १९७७ (आणीबाणीच्या काळात लोकसभेची मुदत एका वर्षाने वाढवण्यात आल्याने १९७६ साली अपेक्षित निवडणूक झाली नाही)



**मोरारजी देसाई** (जनता पार्टी) २४ मार्च १९७७ ते २८ जुलै १९७९ (पक्षांतर्गत कलहामुळे सरकार कोसळले)



**चौधरी चरणसिंग** (जनता पार्टी-सेक्युलर) २८ जुलै १९७९ ते १४ जानेवारी १९८० (काँग्रेसने पाठिंबा काढून घेतल्याने सरकार कोसळले)


**इंदिरा गांधी** (काँग्रेस) १९८० ते १९८४ (पंतप्रधानपदी असताना ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी हत्या झाली.)



**राजीव गांधी** (काँग्रेस) ३१ ऑक्टोबर १९८४ (इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर) १९८४ ते १९८९ (निवडणुकांनंतर -४०४ जागा)



**विश्वनाथ प्रताप सिंग** (जनता दल) २ डिसेंबर १९८९ ते १० नोव्हेंबर १९९० (पक्षांतर्गत कलहामुळे सरकार कोसळले)



**चंद्रशेखर** (समाजवादी जनता पार्टी) १० नोव्हेंबर १९९० ते ६ मार्च १९९१ (काँग्रेसने पाठिंबा काढून घेतल्याने सरकार कोसळले)



**पी.व्ही.नरसिंह राव** (काँग्रेस) २१ जून १९९१ ते १६ मे १९९६



**अटलबिहारी वाजपेयी** (भाजपप्रणित आघाडी) १९९६ (बहुमत नसल्याने १३ दिवसांत सरकार कोसळले)



**एच.डी.देवेगौडा** (जनता दल धर्मनिरपेक्ष) १ जून १९९६ ते २१ एप्रिल १९९७ (काँग्रेसने पाठिंबा काढून घेतला)



**इंदरकुमार गुजराल** (जनता दल) २१ एप्रिल १९९७ ते १९ मार्च १९९८

**अटलबिहारी वाजपेयी** (भाजपप्रणित आघाडी) १९९८ ते १९९९ (बहुमताअभावी सरकार १३ महिन्यांत कोसळले व पुन्हा निवडणुका झाल्या)

**अटलबिहारी वाजपेयी** (भाजपप्रणित आघाडी) १९९९ ते २००४



**डॉ.मनमोहन सिंग** (काँग्रेसप्रणित आघाडी) २००४ ते २००९, २००९ ते २०१४



**नरेंद्र मोदी** (भाजपप्रणित आघाडी) २०१४ ते २०१९


# नेमाडेंच्या ‘देशीवादा’त स्त्रियांच्या स्वतंत्र अस्तित्वाला स्थानच नाही

**भाग दुसरा**



नागनाथ कोत्तापल्ले

*१९७४ च्या दरम्यान स्त्रीवादी चळवळीचा प्रारंभ झाला. स्त्रीला केंद्रस्थानी ठेऊन जगाचा अन्वयार्थ लावला पाहिजे असा या चळवळीचा आग्रह होता. भालचंद्र नेमाडे तर आपल्या ‘हिंदू’ मध्ये स्त्रीवादी कार्यकर्तीचे विडंबनात्मक चित्र रंगवतात. त्यांच्या ‘देशीवादा’ मध्ये स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्त्वाला स्थानच नाही.*




पाकिस्तानची निर्मिती झाल्यानंतरही भारतात काही मुस्लिम राहिले. तेथे एक धर्मनिरपेक्ष राजवट सुरू झाली. लोकशाही शासनतंत्र सुरू झाले. हजारो वर्षांच्या जाती प्रथेला आव्हान मिळाले. शेकडो वर्षांची सरंजामी परंपरा लयाला गेली. एक नवा देश उभा राहू लागला. अनेक क्षेत्रात या देशाने काही नवे करण्याचा मनसुबा जाहीर केला. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या द्रष्ट्या पंतप्रधानांनी अनेक नव्या संस्था उभ्या केल्या. नवी धोरणे आखली; परंतु भालचंद्र नेमाडे यांच्यासारख्यांना मात्र या स्वातंत्र्यानंतरच्या भारताचे काही मोल आहे, असे वाटत नाही. पुढे एका भाषणात ते म्हणतात, ‘‘हिंदुस्थानसारख्या देशाला स्वराज्य मिळाल्यावर किरकोळ भौतिक फायदे सोडल्यास ह्या समाजाचा नैतिक व सौंदर्यशील गूणांचा विकास झाला नाही. याउलट आपल्या विचारवंतांना अवशेषरूपात राहिलेली पारंपारिक मूल्य आणि देशी जीवनपद्धती टिकवून कशी ठेवावी, याची काळजी लागलेली दिसते.’’ (सोळा भाषणे, पृ.५४)


अशी कोणती श्रेष्ठ पारंपारिक मूल्ये आहेत, की जी अवशेषरूपात उरलेली? तर जाती प्रथा, याशिवाय त्यांच्याकडे दुसरे कुठले उत्तर असणार?

तर भारताचा इतिहास समजून घेताना भारत इतकी वर्षे गुलाम का राहिला, असा प्रश्न उपस्थित होतोच आणि त्याचे कारण येथील जातीप्रथा आहे. पिढ्यान्‌पिढ्या माणसे जातीच्या अमानुष पिंजऱ्यात अडकून पडल्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाला संधी तर मिळालीच नाही, पण त्यांची संपूर्ण सर्जनशीलताही हरवून गेली. कुठली प्रयोगशीलताही राहिली नाही. परंपरांच्या दबावामुळे ती नष्ट होऊन गेली. शेकडो पिढ्यांचे नुकसान झाले आणि हे सगळे जाती प्रथेमुळे आणि रूढी परंपरांमुळे झाले आणि भालचंद्र नेमाडे जातीचा बडिवार सांगत आहेत. त्यांच्या अड्ड्यावरील लोक सोडले तर कोणालाही हे मान्य होणार नाही.

इंग्रजांनी येथे राज्य केले. त्यांनी शोषणही केले. हे मान्य करूनही येथे त्यांच्यामुळे प्रबोधनाची चळवळ आकाराला आली. त्यांच्यामुळे भारताचा जगाशी संपर्क आला. त्यांच्यामुळे शिक्षणापासून न्यायदानापर्यंत असंख्य नव्या आणि सामान्य माणसांच्या मुक्तीच्या गोष्टी आल्या. मुख्य म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय अशा श्रेष्ठतर मानवी मूल्यांची आराधना भारतातील शोषित माणूस करू लागला. ही एक प्रकारे शांतपणे आकाराला येणारी क्रांतीच होती. या क्रांतीनेच शेवटी इंग्रजांना घालवले पाहिजे याचे भानही भारतीयांना आले. हे इंग्रजांचे भारतीय समाजाला मिळालेले मोठे योगदान होते आणि आहे, हे स्वच्छ मनाने कबुल केले पाहिजे. ऊठसूठ इंग्रजांना नावे ठेऊन काही साध्य होणार नाही.

दुसरी गोष्ट अशी की, काहीही केले तरी इतिहास कधी बदलता येत नाही. त्याचे बरेवाईट परिणाम काय झाले, ते मात्र शोधता येते. इंग्रजी राजवटीचे काय काय परिणाम आपल्यावर झाले, त्यांची नोंद वर केली आहे. आणखी एका बाबीची नोंद केली पाहिजे. ती अशी की, अव्वल इंग्रजी काळातच शोषितांना भानं आलं

आणि शोषितांचे लढे सुरू झाले. राजा राममोहन रॉय आणि महात्मा जोतिबा फुले हे या क्रांतीचे अग्रदूत होते. त्यांच्यामुळे स्त्रियांच्या प्रतिष्ठेसंबंधी जसे आम्हाला भान आले, त्याप्रमाणेच जातिविषयीही आम्हाला भान आले. पुढे रा. शाहू महाराजांनी तर म्हटले होते की, या देशातील जाती जसजशा संपतील तसतशी या देशाची प्रगती होईल. नेमके याच मुद्द्याला भालचंद्र नेमाडे यांचा विरोध आहे. जाती टिकल्या पाहिजेत, टिकवल्या पाहिजेत आणि तुम्ही कितीही प्रयत्न केला तरी त्या नष्ट होणारच नाहीत, अशी भविष्यवाणी त्यांनी केली आहे. काळाच्या ओघात आचके देणारी ही व्यवस्था भालचंद्र नेमाडे यांना एवढी प्रिय का, हा खरा प्रश्न आहे. गौतम बुद्धापासून डॉ. आंबेडकरांपर्यंत सगळ्याच समाजहितैषी लोकांना जातिव्यवस्था त्याज्य वाटली. भारतभरातील संतांच्या साहित्यात जातिव्यवस्थेमुळे कशी घुसमट होते, ते व्यक्त झाले आहे. तरीही भालचंद्र नेमाडे जातिव्यवस्था टिकली पाहिजे असे का म्हणताहेत? याची कारणे त्यांच्या सामंती मानसिकतेत आहेत. इंग्रजांच्या आणि भांडवलशाहीच्या आगमनामुळे भारतातील सामंती व्यवस्थेला घरघर लागली हे ऐतिहासिक सत्य आहे. त्यामुळे त्यांच्या आणि जे जे भारतातील जातिव्यवस्थेमुळे अत्यंत सुखी होते, त्यांचा इंग्रजांवरती सर्वाधिक राग असणार, हे उघड आहे. भालचंद्र नेमाडे यांच्या देशीवादाची संपूर्ण मांडणीच मुळी इंग्रजांच्या संदर्भामुळे आकाराला आलेली आहे. त्यांच्या देशीवादाच्या निबंधाच्या प्रारंभीच त्यांनी दोन गोष्टी नोंदविल्या आहेत. एक म्हणजे भारतातील लेखकांमध्ये/लोकांमध्ये निर्माण झालेले आंतरराष्ट्रीय भानं आणि दुसरे म्हणजे त्याला कारण तत्कालीन पंडित जवाहरलाल नेहरू हे आहेत, असेही त्यांनी नोंदवले आहे.




पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर हिंदुत्ववाद्यांचा फार राग आहे. अगदी मागच्या वर्षी एका हिंदुत्ववादी नेत्याने केरळमध्ये भाषण करताना असे उद्गार काढले होते की, महात्मा गांधी यांच्याऐवजी पंडित जवाहरलाल नेहरू यांचा खून व्हावयास हवा होता. ही गोष्ट यासाठी नोंदविली की, पंडित जवाहरलाल नेहरू हे हिंदुत्ववाद्यांच्या प्रतिगाम्यांच्या दृष्टीने शत्रुच आहेत. त्याचे कारणही उघड आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यामुळेच या देशात धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व रुजले. तेव्हा त्यांच्यावर असल्या मंडळींचा राग असणारच! त्यांनी देशाला आधुनिक करण्याचा ध्यास घेतला, त्यामुळे तर हा राग वाढतच गेला.

मुख्य मुद्दा काय आहे की, देशीवादाच्या मांडणीला इंग्रजांचा आणि पंडित नेहरूंची संदेश आहे. भालचंद्र नेमाडे लेखाच्या प्रारंभीच म्हणतात –

“कोणत्याही साहित्यातून देशी जाणिवा स्वाभाविकतःच व्यक्त व्हाव्या अशी अपेक्षा असते. तथापि, युरोपी हिकमती लोकांच्या दीर्घकालीन दास्यत्वामुळे विसाव्या शतकाच्या मध्यावर जगातल्या विविध प्रदेशांमधील वसाहतींमध्ये एक खास आंतरराष्ट्रीयता निर्माण झाली. स्वातंत्र्योत्तर एकोणिसशे पन्नास आणि साठच्या दशकांमधले कित्येक मराठी विद्वान आणि साहित्यिक अशा आंतरराष्ट्रीयत्वानं बेभान होऊन भरकटत गेलेले दिसतात. या वृत्तीच्या लोकांना अनुरूप अशी राजकीय सामाजिक परिस्थितीसुद्धा या काळातल्या नेहरू युगाच्या भोंगळ आंतरराष्ट्रीयत्वामुळे मिळत गेली. पिण्याचे पाणी मिळाले नाही तरी चालेल, पण रंगीत टीव्हीवर जगातल्या गमती दिसल्या पाहिजेत, ... वगैरे गोष्टी ज्या काळात प्रतिष्ठित ठरल्या, त्या काळात बिचाऱ्या संकुचित देशीपणाचे भान राखणे म्हणजे पुनरुज्जीवनवादी किंवा राष्ट्रवादी ठरणे ओघानेच आले...” (टीकास्वयंवर, पृ. ७८)

वडाची साल पिंपळाला लावायची आणि आपणच टाळ्या वाजवायच्या असे प्रकार भालचंद्र नेमाडे नेहमीच करतात. आता या एका परिच्छेदात त्यांनी किती घोटाळे केले आहेत पाहा. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या काळात पाण्याचा काही प्रश्न नव्हता आणि रंगीत काय साधा काळापांढरा टीव्हीही नव्हता. पुढे त्यांनी आशियायी क्रीडा स्पर्धांचा उल्लेख केला आहे. ती घटनाही फार फार पुढची. म्हणजे इंदिरा गांधी यांच्या काळातील १९८०-८५ मध्ये घडलेल्या घटना २५ वर्षे मागे नेऊन ते पंडित जवाहरलाल नेहरू यांना का चिकटवीत आहेत? तर नेहरू भोंगळ आहेत हे सिद्ध करण्यासाठी! अशा पद्धतीने तर काहीही सिद्ध करता येते. 'इतिहासातील तथ्यांची उलटापालट करणे बरे नाही, नेमाडे', असे आता त्यांना सांगायचे का? सांगून काही उपयोग होणार आहे का? कावीळ झालेल्या माणसाला सगळे जग पिवळे दिसते, तसे काही झाले आहे का? या परिच्छेदाच्या प्रारंभीच आंतरराष्ट्रीयत्वाने बेभान झालेले कित्येक विद्वान आणि साहित्यिक भरकटत गेले असे ते म्हणतात. कित्येकपैकी एखादे तरी नाव नको का सांगायला? याच परिच्छेदात पुनरुज्जीवनवादी व राष्ट्रवादी एकच असल्याचा त्यांचा समजही व्यक्त झाला आहे. तो त्यांनी तपासून घ्यावा असे वाटते. येथेच आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे की, कुठलाही समाज, संस्कृती आणि साहित्याची दुसऱ्या एखाद्या समाजाच्या संस्कृतीच्या आणि साहित्याच्या संपर्कात येत नाही, तोपर्यंत त्या समाजामध्ये चलनवलन निर्माण होत नाही. जगाच्या इतिहासात असेच होत गेले. माणूस स्वतः सुधारून घेण्याचा प्रयत्न करतो. आपली संस्कृती समृद्ध करण्याचा प्रयत्न करतो.

त्यासाठी त्याला जे जे चांगले आहे, ते ते स्वीकारावे लागले. त्यासाठी संस्कृती, संपर्क महत्त्वाचा असतो. त्यामुळेच आधुनिकीकरणाच्या उदयाबरोबर पाश्चात्य जगात निर्माण झालेल्या वाङ्मय प्रकाराचा आपण स्वीकार केला. भालचंद्र नेमाडे ज्या कादंबरी या वाङ्मय प्रकारात लिहितात (आणि त्याचा अभिमानही बाळगतात,) तो वाङ्मय प्रकार काही भारतीय नाही, युरोपातील हिकमती लोकांकडून तर तो आलेला आहे. आता या मुद्यावर भालचंद्र नेमाड्यांना वडाची साल पिंपळाला लावायची आणि त्यांच्या भक्तांनी टाळ्या वाजवायची मोठीच संधी आहे म्हणा!

या सर्व विवेचनाचा निष्कर्ष असा की, देशीवादाच्या उभारणीसाठी इंग्रजांचा संदर्भ अतिशय महत्त्वाचा ठरला. त्यासाठी पंडित नेहरूंसारख्या 'भोंगळ' पंतप्रधानाचा हातभारच लागला. खरे म्हणजे पंडित नेहरूंचे भालचंद्र नेमाडे यांनी आभार मानले पाहिजेत, कारण त्यांच्यामुळेच तर त्यांना देशीवाद सोडून टाळ्या मिळवता आल्या!

भूमी, प्रदेश, जात, हिंदू, हिंदुस्थान ही पंचसूची म्हणजे देशीवाद होय. आता या संकल्पना त्यांच्या देशीवादात आणि एकूणच समीक्षासदृढ लेखनात कुठून आल्या हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यासाठी भालचंद्र नेमाडे ज्या काळात लिहित होते, त्याच्या आगेमागे नेमक्या कोणत्या सामाजिक चळवळी चालू होत्या याचा विचार करावा लागेल. कारण त्या त्या काळात ज्या सामाजिक चळवळी होत असतात, त्यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम साहित्य आणि इतर कलाक्षेत्रांवरही होत असतात. उदाहरणार्थ, वारकरी संप्रदायाची भक्ती चळवळ सुरू झाली आणि त्याचा परिणाम तत्कालीन संत कवींवर झाला. असे होतच असते. लेखक अशा चळवळींपासून सर्वथा अलिप्त राहू शकत नाही. तसेच ज्या वाङ्मयीन चळवळी आकाराला येत असतात, त्याचेही समकालीन साहित्यविश्वावर बरे-वाईट परिणाम होत असतात. या दृष्टीने या कालखंडात ज्या सामाजिक आणि वाङ्मयीन चळवळी सुरू होत्या, त्यांचा अगदीच धावता आढावा घेणे आवश्यक वाटते.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यांचा उद्घोष करणारी युवकांची एक संघटना म्हणजे राष्ट्रसेवा दल. या संघटनेने समाजामध्ये अनेक वर्षे एक नवचेतना आणलेली होती; परंतु तिचे कार्य काहीसे मंदावले तेव्हा युवक क्रांती दल ही संघटना जोमदारपणे पुढे आली. गांधीवादावर पूर्ण निष्ठा ठेऊन स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा संघर्षशील आग्रह या संघटनेने धरलेला होता. १९७० नंतर तिने महाराष्ट्रातील तरूणांचे विश्व भारावून टाकलेले होते. १९७० नंतरच दलित पँथरच्या चळवळीचा उदय झाला आणि महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय जीवनात तिने मोठ्याच जाणिवा निर्माण केल्या. तीव्र संघर्ष आणि वंचितांना न्याय ही त्यांची भूमिका होती. साधारणतः १९८० च्या दरम्यान शेतकऱ्यांच्या शोषणाविरूद्ध प्राणपणाने लढा देणारी शेतकरी चळवळ उभी राहिली. या चळवळीने भारतभर आपला प्रभाव निर्माण केला. शेतकऱ्यांसंबंधीचे काही कळीचे प्रश्न तिने ऐरणीवर आणले. यातला मुख्य प्रश्न शेतीमालाच्या भावाचा होता. म्हणजे शेतकऱ्यांच्या शोषणाचा होता. सर्वंकष शोषणाच्या विरोधात लढा देणारे डावे पक्ष तर होतेच.




या साऱ्या चळवळी पाहिल्या की, त्या एकूण शोषणाविरूद्ध आवाज उठवित होत्या हे लक्षात येईल, तसेच शोषण करणाऱ्या जात, धर्म यांसारख्या घटकांविरूद्ध लढा पुकारून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यांचा आग्रह धरीत होत्या. समाजातील उपेक्षित, वंचित घटक या चळवळींमध्ये सक्रिय होते.

१९७० ते ८५ हा काळच अनेकविध सामाजिक, राजकीय चळवळीचा होता. याच काळात अनेक वाङ्मयीन चळवळीही आकाराल्या आलेल्या दिसतात. यात प्रथमतः निर्देश करावा लागतो, तो दलित साहित्याच्या चळवळींचा. स्वातंत्र्यानंतर किंवा स्वातंत्र्याच्या आसपास जन्मलेली पिढी शिक्षित होऊन भोवती स्वातंत्र्य, समता, बंधुता कोठे आहे याचा शोध घेत होती. त्यांना सामाजिक न्यायाची आस लागलेली होती. त्यातून त्यांच्या लक्षात आले की, सरंजामी परंपरा अजून पुरेशा संपलेल्या नाहीत. जाती प्रथेने तर त्यांना गुलाम करून शोषण केलेले होते. या परिस्थितीतून सुटण्यासाठीचा पहिला उद्रेक झाला तो दलित साहित्याच्या चळवळीतून. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या चळवळीचे प्रेरणास्थान होते. सुर्वे, बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ यांनी कार्ल मार्क्सलाही आपल्याबरोबर घेतले होते. या चळवळीने पहिला एल्गार पुकारला तो जाती प्रथेविरूद्ध. सरंजामी मनोवृत्तीला हे मान्य होणे शक्यच नव्हते. असो.

दलित साहित्याच्या पाठोपाठ ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली. या चळवळीतील काही लोकांनी आपल्या प्रेरणास्थानी महात्मा फुले-डॉ. आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांना मानलेले होते. भूमीमध्ये राबणाऱ्या शेतकऱ्यांचे चहू अंगांनी असे शोषण होते त्याचा निर्देश करणे हा या चळवळीचा मुख्ख उद्देश होता. या चळवळीचे थोडेबहुत परिणाम ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या लेखकांवर झाले. भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' पासून सर्व कादंबऱ्यांमध्ये ग्रामीण जीवन येते; परंतु ग्रामीण शोषणाचा संदर्भ त्यांच्या साहित्यात कुठेच येत नाही. उलट ते

ग्रामजीवनाचे गौरवीकरण करतात. एका मुलाखतीत ते म्हणतात - ''आपल्याकडे एक गाव म्हणजे एक युनिट असायचं किंवा एकूण सर्व कल्चर एकत्र नांदायचे.'' (परिवर्तनाचा वाटसरू, दि. अः १९९३, पृ. १९)

सगळं गाव एकत्र नांदायचं हे गौरवीकरणच होय. १९७४ च्या दरम्यान स्त्रीवादी चळवळीचा प्रारंभ झाला. स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून जगाचा अन्वयार्थ लावला पाहिजे असा या चळवळीचा आग्रह होता. भालचंद्र नेमाडे तर आपल्या 'हिंदू' मध्ये स्त्रीवादी कार्यकर्तीचे विडंबनात्मक चित्र रंगवतात. त्यांच्या 'देशीवादा' मध्ये स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्त्वाला स्थानच नाही. म्हणूनच ते त्याला 'रिकामटवळ्या' असे म्हणतात. ''स्त्रीवादी समीक्षा मराठीत आलेली आहे. त्यांच्यात कुणी कष्ट करणारी स्त्रीवादी समीक्षिका नाही. या रिकामटेकड्या बायका आहेत. जसे पुरूषांत रिकामटेकडे असतात, तशा बायकातही काही रिकामटेकड्या असतात.'' (निवडक मुलाखती, पृ-७९)

याच काळात आदिवासी लेखकांनीही चळवळीची भाषा सुरू केलेली दिसते. या सर्वच वाङ्मयीन आणि सामाजिक चळवळीपासून भालचंद्र नेमाडे फटकून आहेत, एवढेच नाही तर या चळवळीच्या विरोधी भूमिका घेत आहेत. दलित साहित्य जातींमुळे शोषणं होते असे म्हणते ना? मग मी जाती किती महत्त्वाच्या आहेत तेच सांगतो, असा त्यांचा व्यवहार दिसतो. भूमीवर कष्ट ओतूनसुद्धा शोषणच होते असे तुम्ही म्हणता ना - मग मी भूमी किती महत्त्वाची आहे हे सांगतो, असा त्यांचा खाक्या. स्त्रीवाद तर रिकामटवळ्यांचा उद्योग! अर्थात, काहीही मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य भालचंद्र नेमाडे यांना आहेच, पण प्रश्न निर्माण होतो तो असा की, भालचंद्र नेमाडे हे असे का करत आहेत? ते नेमके कोणाचे प्रतिनिधित्व करीत आहेत? त्यांच्या प्रेरणा तरी काय आहेत? जात कवटाळण्याची वृत्ती, भूमीला सांस्कृतिक अर्थ देणे, हिंदू आणि हिंदुस्थान या गोष्टी त्यांच्या देशीवादात कुठून आल्या? या साऱ्याच प्रश्नांची उत्तरे क्रमाने शोधत जावे लागेल; परंतु त्या आधी 'देशीवादाला' जी आंतरराष्ट्रीयत्वाची संदर्भचौकट त्यांनी दिली आहे, तिचा उगम कुठे आहे, याचाही शोध घ्यावा लागेल. हा उगम शोधला म्हणजे भालचंद्र नेमाडे यांच्या संपूर्ण विवेचनामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या संकल्पनांची चर्चाच नाही तर साधा नामोल्लेखसुद्धा का होत नाही, याचे गूढ उलगडेल. हा शोध घेण्यासाठी आपणास सरळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे जावे लागते. प्रारंभी संघशाखांवर काय चालते, हे बाहेर कोणाला कळण्याचे काही कारण नव्हते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ साली झाली. डॉ. केशव हेडगेवार हे तिचे प्रमुख होते; परंतु पुढे त्यांच्या निधनानंतर द्वितीय सरसंघचालक म्हणून मा.स. गोळवलकर श्रीगुरूजी कार्य करू लागले. त्यांनी संघाची भूमिका स्पष्ट करणारे काही लेखन केले आहे. वेळोवेळी मुलाखती दिल्या आहेत. त्यामध्ये १९६६ साली इंग्रजीत प्रकाशित झालेला 'बंच ऑफ थॉट्स' हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. या पुस्तकाचा मराठी अनुवाद 'विचारधन' या नावाने १९७१ मध्ये प्रसिद्ध झाला. याशिवाय त्यांच्या वाङ्मयाचे काही खंड प्रकाशित झालेले आहेत. 'वुई स्पॉटलाइट्स' हीही त्यांची पुस्तकं आहेत. पण 'विचारधन' हे पुस्तक अधिक महत्त्वाचे आहे असे वाटते. या दोन्ही पुस्तकांच्या (मराठी-इंग्रजी) काही आवृत्त्या बाजारात आलेल्या आहेत. या पुस्तकामधून रा.स्व. संघाची भूमिका आणि विचारधारा सर्व जनतेसमोर आली. अर्थात, या विचारधारेचा प्रतिवाद करणारे लेखन मराठीत तसे फारसे झाले नाही. याला अपवाद फक्त प्रा. रावसाहेब कसबे यांचे 'झोत' हे पुस्तक होय. हे पुस्तक जनता राजवटीच्या काळात म्हणजे १९७८ मध्ये प्रकाशित झाले. त्यानंतर जनता राजवट कोसळली. त्यामुळे या दोन विचारधारांची चर्चा होण्याची एक संधी मराठी माणसांना आणि भारतीयांना मिळाली होती; परंतु जशी चर्चा व्हायला हवी होती, तशी चर्चा मात्र होऊ शकली नाही. हा मुद्दा थोडा बाजूला ठेवला तरी भालचंद्र नेमाडे जेव्हा त्यांचा 'देशीवाद' मांडत होते, त्यापूर्वी 'बंच ऑफ थॉट्स' प्रकाशित होऊन २८ वर्षे उलटून गेलेली आहेत. काय योगायोग पहा, इंग्रजीत विरोध करताना भालचंद्र नेमाडे यांनीही आपला देशीवादावरील निबंध पहिल्यांदा इंग्रजीमध्ये (१९८४) लिहिला आणि त्यानंतर त्याचा, त्यांनी स्वतःच केलेला अनुवाद मराठीमध्ये १९८८ मध्ये प्रकाशित केला. ●●●

*श्रीगुरूजी मा.स. गोळवलकर यांचा प्रभाव : तेव्हा भालचंद्र नेमाडे यांच्या देशीवादाची आणि त्यांच्या इतर समीक्षासदृश्य लेखनाची चर्चा करण्यासाठी 'विचारधन' या पुस्तकाकडे अपरिहार्यपणे वळावे लागते. भालचंद्र नेमाडे यांच्या भूमिका आणि 'विचारधन' मधील भूमिका यांच्यामध्ये विलक्षण साम्य आहे. किंबहुना 'विचारधन'चा अमीट असा प्रभाव भालचंद्र नेमाडे यांच्यावर आहे, असे लक्षात येते. हा प्रभाव कसा आहे हे समजून घेण्यासाठी देशीवादाची पंचसूत्री आणि 'विचारधन' मधील साम्य पहावे लागेल; परंतु देशीवादाची संदर्भचौकट ही आंतरराष्ट्रीय वाद आहे, याचा निर्देश या पूर्वीच केला आहे. अर्थात, आंतरराष्ट्रीय वाद समजून घेताना आपसूकच ब्रिटिशांचे राजकारण, त्यांची शिक्षणव्यवस्था, राष्ट्रीयत्व इत्यादी बाबींची चर्चा होणे स्वाभाविक आहे. विशेष म्हणजे, गोळवलकर गुरूजी यांनी ज्याप्रमाणे आंतरराष्ट्रीयत्वाची चर्चा केली, त्याचप्रमाणे भालचंद्र नेमाडे यांनीही केली आहे. इंग्रजी राजवट, इंग्रजांची शिक्षणपद्धती इत्यादी बाबींची चर्चाही त्यांनी केली आहे. त्यामुळे प्रथमतः या दोघांच्याही आंतरराष्ट्रीयत्वाच्या भूमिकांमधील साम्य पाहू या किंवा भालचंद्र नेमाडे यांच्या देशीयतेसंबंधीची चर्चा येथूनच करू. पुढे क्रमाने आधुनिकता धर्मनिरपेक्षाता, भूमी, जाती इत्यादी बाबींची मीमांसा करता येईल.*

# न्यायव्यवस्थेतील सजग प्रहरी : न्या. भूषण गवई

**व्यक्तिविशेष**

प्रकाश खंडेलोटे

**तब्बल नऊ वर्षांनी न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या रूपाने अनुसूचित जाती प्रवर्गातील न्यायाधीशाची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती झाली आहे. २०१६ मध्ये युग चांडक खटल्यात दुहेरी मृत्यूदंडाची शिक्षा सुनावण्यासह अनेक महत्वाचे निर्णय न्यायमूर्ती गवई यांनी दिले आहेत. त्यांनी दिलेल्या आदेशामुळेच उपराजधानी नागपुरातील दोन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचा कायापालट झाला असून शहराच्या विकासाला गती मिळालेली आहे. मुंबई उच्च न्यायालय त्याचबरोबर औरंगाबाद आणि नागपूर खंडपीठात त्यांनी निरपेक्ष न्यायदानाचे काम केले आहे. न्यायमूर्ती के.जी.बालकृष्णन यांच्यानंतर अनुसूचित जातीमधून सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशपदी नियुक्ती झाल्यामुळे न्यायमूर्ती भूषण गवई यांचा केवळ विदर्भालाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रालाच अभिमान आहे.**



विदर्भपुत्र, मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायमूर्ती भूषण गवई यांची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी नियुक्ती झाली असून त्यांनी अलीकडेच पदभार स्वीकारला आहे. न्यायमूर्ती गवई यांच्या नियुक्तीमुळे विदर्भाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

गवई यांच्यासह हिमाचल प्रदेशचे मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत, झारखंडचे मुख्य न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस आणि गुवाहाटी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती ए.एस. बोपण्णा यांचाही सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती झालेल्यांमध्ये समावेश आहे. नागपुरातील हायकोर्ट बार असोसिएशनमधून सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी जाणारे न्या. गवई हे दुसरे न्यायाधीश आहेत. त्यांच्या अगोदर १२ एप्रिल २०१३ रोजी न्या. शरद बोबडे यांची यापदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे, न्या. गवई हे जवळपास एका दशकानंतर अनुसूचित जातीमधून सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्त होणारे पहिलेच न्यायाधीश आहेत. अनुसूचित जाती प्रवर्गातून न्यायाधीश के. जी. बालकृष्णन् हे १४ जानेवारी २००७ ते ११ मे २०१० दरम्यान या पदावर होते. त्यानंतर ९ वर्षे या प्रवर्गातून एकाही न्यायाधीशाची नियुक्ती झालेली नव्हती. ज्येष्ठ रिपब्लिकन नेते, बिहार आणि केरळचे माजी राज्यपाल कालकथित रा.सु. गवई यांचे न्यायमूर्ती भूषण गवई हे ज्येष्ठ पुत्र आणि रिपाइंच्या गवई गटाचे नेते राजेंद्र गवई यांचे धाकटे बंधू.२४ नोव्हेंबर १९६० रोजी अमरावती येथे त्यांचा जन्म झाला. त्यांची जडणघडण मात्र नागपूर शहरात झाली. मुंबई येथील एका महाविद्यालयातून वकिलीची सनद प्राप्त केल्यानंतर त्यांनी माजी महाधिवक्ता, माजी न्यायमूर्ती बॅरिस्टर राजा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वकीलीला सुरुवात केली. १९८७ ते ९० अशी तीन वर्षे मुंबईत वकिली केल्यानंतर त्यांनी नागपूर खंडपीठात वकिली सुरू केली. भारतीय राज्यघटना, प्रशासकीय कायदे आदी विषयांमधील तज्ज्ञ म्हणून त्यांची ख्याती आहे. वकिली करताना त्यांनी नागपूर महानगरपालिका, अमरावती महानगरपालिका आणि अमरावती

# न्या. गवई यांनी दिलेले काही महत्त्वपूर्ण निकाल



१. युग चांडक खटल्यात २०१६ मध्ये आरोपींना दुहेरी मृत्यूदंडाची शिक्षा.
२. इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएसच्या जागा कायम ठेवण्याचा आदेश देतानाच पायाभूत सुविधा मजबूत करण्याचेही निर्देश.
३. सार्वजनिक जागा आणि रस्त्यांवरील बेकायदा धार्मिकस्थळे हटविण्याचे निर्देश देऊन वाद सोडवला.
४. सिंचन घोटाळ्यात मोखाबर्डीच्या कंत्राटदारास ३२ कोटी रुपये न देण्याचे सरकारला आदेश.
५. न्यायालयाच्या बेअदबीप्रकरणी कारवाई करण्याचा इशारा देऊन नागपूर शहरात नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी उभारण्यात महत्त्वपूर्ण भूमिका.
६. महाराष्ट्रभरातील सर्व स्कूल बसेसच्या फिटनेसची तपासणी करण्याचे प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यास आदेश.
७. मुंबईतील फेरीवाल्यांना शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परिघात विक्री करण्यास प्रतिबंध.
८. मुंबईत दहिहंडीची उंची वाढवण्यास आणि या कार्यक्रमात बालगोविंदांना सहभागी होण्यास प्रतिबंध.

---

विद्यापीठाच्या वकील मंडळावर उत्तम पद्धतीने काम केले. त्याचबरोबर सिकॉम, डीसीव्हीएल अशा विविध स्वायत्त संस्थांसाठीही त्यांनी वकिली केली. ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ असे एक वर्ष मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील आणि ॲडिशनल पब्लिक प्रॉसेक्युटर म्हणून त्यांनी काम केले. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचे फलित म्हणून ऑगस्ट १९९३ मध्ये नागपूर खंडपीठात सरकारी वकील म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. या पदावर १० वर्षे काम केल्यानंतर १४ नोव्हेंबर २००३ रोजी त्यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायमूर्तीपदी नियुक्ती झाली. या पदावर असताना त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर निर्णय दिले. नागपूर खंडपीठाचे न्यायाधीश असताना त्यांनी शहराच्या विकासासाठी अनेक धाडसी निर्णय दिले. उपराजधानीतील 'मेयो' आणि 'मेडिकल' या दोन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत रुग्णांना अतिविशेष उपचार मिळत नव्हते. याबाबतच्या याचिकेच्या सुनावणीत तसे उपचार उपलब्ध करून देण्याचे आदेश देऊन न्यायमूर्ती भूषण गवई यांनी या दोन वैद्यकीय महाविद्यालयांचा जणू कायापालटच केला. 'मेडिकल' मध्ये १५० कोटी रुपयांची पंतप्रधान आरोग्य योजना कार्यान्वित करण्याचा आदेश देण्यापासून 'मेयो'तील एमबीबीएस आणि एमडीच्या जागांवरची टांगती तलवार दूर करण्याबाबतचे आदेशही त्यांनी दिले. त्याचबरोबर अन्य एका प्रकरणात त्यांनी दिलेल्या आदेशामुळेच राज्यभरातील वैद्यकीय महाविद्यालयांमधील न्यायवैद्यकशास्त्र विभागाशी संबंधित शवविच्छेदन विभागाचे आधुनिकीकरण करण्यासाठी सरकारने ६० कोटी रुपये मंजूर केले. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांनी दिलेल्या निवाड्यामुळे चंद्रपूर आणि गोंदिया येथील वैद्यकीय महाविद्यालये सुरू होऊ शकली. शेगावचा विकासही त्यांच्याच आदेशामुळे झाला. उपराजधानीतील उच्च न्यायालयाच्या विस्तारित इमारतीचा आणि जिल्हा न्यायालयातील नवीन इमारतीचा मार्ग त्यांच्या आदेशामुळे मोकळा झाला. नागपुरातील नॅशलन लॉ विद्यापीठाचे सत्रही न्या. गवई यांच्याच आदेशामुळे सुरू झाले. सार्वजनिक बांधकाम विभागातील ११९ कोटी रुपयांचा घोटाळा आणि सिंचन घोटाळ्यांसारखी महत्त्वपूर्ण प्रकरणे न्या. गवई यांनी हाताळली होती. जनहिताचे आदेश देणारे न्यायमूर्ती म्हणून त्यांची ख्याती आहे.

लोकशाहीचा एक खांब असलेल्या न्यायव्यवस्थेवर आजही जनतेचा प्रचंड विश्वास आहे. या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी न्यायव्यवस्थेतील एक सजग प्रहरी म्हणून न्या. गवई कार्यरत आहेत. समाजातील प्रत्येक घटकाला आपल्याकडून न्याय दिला जावा, यासाठी त्यांचा सातत्याने प्रयत्न असतो. वंचितांना न्याय मिळवून देण्याचे काम त्यांनी वकील आणि पुढे न्यायाधीश म्हणून केले आहे. न्यायव्यवस्थेवरील लोकांचा विश्वास अधिक बळकट करण्यासाठी न्या. गवई यांची भूमिका महत्त्वाची राहिलेली आहे. अनेक प्रकरणांमध्ये त्यांनी दिलेल्या निवाड्यात त्यांचे कर्तृत्व झळकताना दिसते. आपल्या कर्तृत्वामुळे वयाच्या ५८ व्या वर्षी त्यांनी सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश पदापर्यंत मजल मारली आहे. सेवाज्येष्ठतेनुसार ते १४ मे २०२५ रोजी सरन्यायाधीशपदी येण्याची शक्यता आहे. वकिली ते सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश पदापर्यंतचा त्यांचा प्रवास त्यांच्यातल्या असीम कर्तबगारीची साक्ष देणारा आहे. त्यांच्या हातून यापुढेही निरपेक्ष न्यायदान व्हावे आणि उपेक्षित घटकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास आणखी दृढ व्हावा, ही अपेक्षा. ●●●

**ग्रंथ परिचय**

# मोदी सरकारच्या धडाकेबाज वचनांचे अवास्तव




मिलिंद कसबे

**'लाव रे तो व्हिडिओ'** या राज ठाकरे यांच्या लोकप्रिय वाक्याने लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात मोदी सरकारला ज्या पद्धतीने अस्वस्थ केले ती अस्वस्थता अलीकडे आलेल्या काही पुस्तकांनीही केली आहे. 'गुजरात फाईल्स', 'आय ॲम अ ट्रोल', 'द फ्री व्हॉइस', 'हिंदुत्वमुक्त भारत', 'आरेसेस' ही त्यापैकी काही महत्त्वाची पुस्तके आहेत. या पुस्तकांच्या मालिकेत 'वादा-फरामोशी' या नव्या पुस्तकाची भर पडली आहे.

संजॉय बासू, नीरज कुमार आणि शशि शेखर या राष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या धाडसी पत्रकार-कार्यकर्त्यांचे मोदी सरकारने दिलेल्या वचनांचा पर्दाफाश करणारे हे हिंदी पुस्तक २०१९ मध्ये प्रकाशित झाले आणि त्यानंतर लगेच सनय प्रकाशनाने या पुस्तकाचा मराठी अनुवाद मार्च २०१९ मध्ये प्रकाशित केला. हिंदी साहित्याचे अभ्यासक डॉ. दत्तात्रय मोहिते यांनी या पुस्तकाचा मराठी अनुवाद केला असून हे पुस्तक मराठी वाचकांना मोदी सरकारच्या अनेक कटू निर्णयाची वस्तुस्थिती लक्षात आणून देणारे आहे. संजॉय बासू आणि त्यांच्या लढाऊ सहकाऱ्यांनी माहिती अधिकारातून मिळविलेली ही माहिती मोदी सरकारला नक्कीच अडचणीत आणणारी आहे.

या पुस्तकाचे एकूण सहा विभाग असून पहिल्या विभागात 'स्वच्छ गंगा अभियान' आणि 'गोरक्षा' यासाठी मोदी सरकारने आणलेल्या योजना आणि त्या योजनांचे फलित मांडले आहे. हजारो कोटी रुपये खर्च करूनही मोदी सरकार गंगा स्वच्छ करू शकले नाही. यातले अनेक आर्थिक बारकावे मांडत हे पुस्तक मोदींनी सुरू केलेल्या अनेक फसव्या योजनांची चिरफाड




करते. मोदी सरकारचे महिला धोरण किती मतलबी आहे हे लेखकांनी या पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणात पुराव्यांसह मांडले आहे. तिसरे प्रकरण आदिवासी-वंचितांसाठी सरकार कसे निष्क्रीय आहे, याचे असंख्य पुरावे देते. दळणवळणात सरकारचे फसवे डाव, आरोग्य, बेकारी यांसारख्या मूलभूत क्षेत्रातही सरकारने पुनर्गठीत केलेल्या योजना कशा फसल्या आहेत, याची माहिती या पुस्तकाच्या पुढच्या प्रकरणात मांडली आहे.

गेल्या पाच वर्षांत मोदी सरकारने भारतीय जनतेसमोर केलेले वायदे आणि त्या वायद्यांशी केलेली प्रतारणा याचा लेखाजोखा मांडताना संजॉय बासू आणि त्यांच्या सहकारी लेखक मित्रांनी या पुस्तकातून माहिती अधिकारातून मिळवलेला आर्थिक ताळेबंद जनतेसमोर खुला केला आहे.

**राम तेरी गंगा ...**

'राममंदिर' आणि 'नमामि गंगे' हे भाजप सरकारचे आवडते उपक्रम आहेत. हे दोन्ही उपक्रम भाजपला मते मिळवून देणारे आहेत म्हणून त्यांची भावनिक आणि धार्मिक किनार ; ना भाजप सोडत, ना मोदींना सोडवत आहे. खरे तर भाजप सरकारचे सारे अस्तित्वच या संघघोषित मुद्यांमध्येच आहे. 'स्वच्छ गंगा राष्ट्रीय अभियान' (NMCG) या मान्यताप्राप्त संस्थेमार्फत २०११ साली 'गंगेला स्वच्छ' करण्याची मोहीम सुरू झाली; परंतु २०१६ साली ही योजना बंद करून भाजप सरकारने खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदींच्याच अध्यक्षतेखाली 'राष्ट्रीय गंगा परिषद' स्थापन केली. विशेष म्हणजे, या परिषदेची अद्याप एकही बैठक झाली नसल्याची धक्कादायक माहितीही या पुस्तकात दिली आहे. २०१४ साली सुरू झालेला 'नमामि गंगे' हा केंद्र सरकारचा दिशादर्शक कार्यक्रम आहे. याचे अंदाजपत्रक सुमारे २० हजार कोटी रुपयांचे आहे. गंगेच्या सफाईसाठी २०११ साली जागतिक बँकेकडून ४६०० कोटी रुपयांचा निधी मिळाला होता. याशिवाय जपान इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह संस्थेने बनारस येथील जल शुद्धीकरणासाठी ४९६ कोटी रुपये दिले होते. या पैशांतून गंगा घाट, सांडपाणी शुद्धीकरण, वनीकरण, नदी स्वच्छता, कचरा विल्हेवाट, जैव जनजागृती अशी कामे गेल्या पाच वर्षांत अभिप्रेत होती. या कामांशिवाय भाजप सरकारने गंगा स्वच्छतेसाठी घोषित केलेल्या ११३ रिअल टाईम बायो मॉनिटरिंग स्टेशनचे काय झाले? याविषयी १२ ऑक्टोबर २०१८ ला माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविलेल्या माहितीमध्ये सरकारकडून मिळालेले उत्तर धक्कादायक आहे. ते उत्तर असे आहे, 'At present there are no real time bio-monitoring stations installed on river ganga' (हिंदी आवृत्ती. पृ-१९). याशिवाय गंगेच्या

स्वच्छतेत मोदी सरकारला जी कॉर्पोरेटर्सची साथ मिळायला हवी होती तीही मिळाली नाही, असेही माहिती अधिकारातून उघड झाले आहे. याउलट, या पुस्तकात नोंदविलेली धक्कादायक बाब म्हणजे ''२०१४ (मोदीजी के सत्ता मे आने से ठीक २ महिने) मे नेशनल मिशन फॉर क्लीन गंगा के खाते मे जितना भी अनुदान और विदेशी लोन के तौर पर रुपये जमा थे, उस पर ७ करोड ६४ लाख रुपये ब्याज सरकारको मिला. अब सिधे आते है मार्च २०१७ मे. मार्च २०१७ मे इस खाते मे आई ब्याज की रकम ७ करोड से बढकर १०७ करोड रुपये हो गई. यानि, ३ साल मे मोदी सरकारने अकेले नॅशनल मिशन फॉर गंगा के खाते से १०० करोड रुपये ब्याज कमा लिया''. (हिंदी आवृत्ती. पृ-२०). गंगा अभियानाचा गंगेला फायदा होण्याऐवजी त्यातील जाहिरातींचा मोदींनाच फायदा झाला. २०१८ पर्यंत या योजनेअंतर्गत २२६ प्रकल्प मंजूर झाले. त्यातले केवळ २७ प्रकल्प पूर्ण झाले, अशीही माहिती या पुस्तकात नोंदवली आहे. (मराठी आवृत्ती. पृ-२८). जी अवस्था गंगेची तीच अवस्था गाईची भाजप सरकारने केलेली दिसते. भारतीय गाईला श्रद्धेच्या उंच डोंगरावर नेऊन तिच्या नावाचे राजकारण करण्यात मोदी सरकारने यश मिळावले खरे. पण तथाकथित गोरक्षकांनी जी दहशत पसरवली त्याचे काय? पाच वर्षांत ८३५ कोटी रुपये खर्च करणाऱ्या या योजनेची माहिती मागविली असता केवळ ४ गोकुळग्राम उभे राहिले (मराठी आवृत्ती. पृ-३१) यापेक्षा दुसरे दुर्दैव कोणते?

**गुंडाराज...**

मोदी सरकार सत्तेवर आल्यावर त्यांनी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ', 'महिला शक्ती केंद्र', 'पंतप्रधान मातृवंदना योजना', 'स्किल इंडिया' च्या नावाखाली मोठमोठ्या जाहिराती करून महिलांच्या सक्षमीकरणासाठी घोषणा केल्या; परंतु या योजनांचे माहिती अधिकारातून मिळालेले सत्य मात्र वेगळेच आहे. मोदींची या योजनांमधील 'वादा फरामोशी' नोंदवताना या पुस्तकात म्हटले आहे की, ''भाजप सरकार सत्तेवर येण्याअगोदर सबला आणि किशोरी योजना चालू होत्या. पण मोदी सरकारने १ एप्रिल २०१८ ला किशोरी शक्ती योजना बंद केली. १७ नोव्हेंबर २०१७ पासून या योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची वयोमर्यादा १८ वरून कमी करून १४ वर्षे केली. मोदी सरकारने राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ६१०.६२ कोटी रुपयांचे वाटप केले होते; परंतु राज्यांनी ११० टक्के रुपये म्हणजे ६६४.२४ कोटी रुपये खर्च केले होते. पण हळूहळू या शीर्षकावर मिळणाऱ्या अनुदानाचे प्रमाण प्रत्येक वर्षी कमी होत गेले. २०१७-१८ मध्ये एकूण अनुदान ४४६ कोटींवर गेले. यातून फक्त २३.५४ कोटी रुपये तरूण मुलींच्या कौशल्य विकासावर खर्च केले गेले...'' (मराठी आवृत्ती. पृ-५८). आज महिलांच्या सक्षमीकरणासाठी मोठ्या गाजावाजा करून सुरू झालेल्या या योजनांची वस्तुस्थिती मांडताना लेखकांनी काढलेला निष्कर्ष जनतेचे डोळे उघडणारा आहे. त्यांच्या मते, ''२०१३-१४ मध्ये लाभार्थ्यांची संख्या ३५.०७ लाख होती; (तेव्हा काँग्रेसचे सरकार होते) परंतु मोदी सरकार सत्तेवर आले तेव्हा ही संख्या ६ टक्क्यांनी घसरून ६.२८ लाखांपर्यंत घटली. ज्या योजनेच्या जाहिरातींवर प्रचंड पैसा खर्च केला. हेच का ते 'स्किल इंडिया'?'' (मराठी आवृत्ती, पृ-५८). सेंटर विक्टिम कंपंसेशन फंड (उतउऋ), इमरजेंसी रिस्पॉंस मॅनेजमेंट सिस्टम (खएठचड), वन स्टॉप सेंटर महिलांवरील सायबर गुन्हेगारी यांसारख्या योजनांची या पुस्तकात मांडलेली वस्तुस्थिती अशी सांगता येईल -

१) 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या योजनेअंतर्गत ERSS साठी २०१६-१७ मध्ये ३२१.६९ कोटी एकूण रकमेपोटी २७३.३६ कोटी रुपये मंजूर केले. त्यातले २१७ कोटी रुपये विविध राज्यांना वाटले गेले आणि २०१७-१८ मध्ये ५५.३९ कोटी रुपयेही वाटले गेले; परंतु जानेवारी २०१९ पर्यंत २ राज्यांनीच सिंगल इमरजेंसी नंबर ११२ ची सुरूवात केली. भाजपशासित गुजरात, झारखंड व इतर राज्यांनी तर ही सेवा अद्याप सुरूही केली नाही.

२) महिला व मुलांच्या विरूद्ध होणारी सायबर गुन्हेगारी थांबविण्यासाठी २०१७-१८ मध्ये गृहमंत्रालयासाठी ९४.५ कोटी रुपये मंजूर केले गेले. त्यातले ६ कोटी पोलिस प्रशिक्षणासाठी वजा करून उरलेले ८७.१२ कोटी रुपये राज्यांत सायबर फॉरेंसिक लॅब स्थापन करण्यासाठी व ती चालविण्यासाठी राज्यांना दिले; परंतु आतापर्यंत एकही लॅब उभी राहू शकली नाही.

३) २०१७ मध्ये मोदी सरकारने महिला सशक्तीकरणासाठी 'महिला शक्ती केंद्र' ही नवीन योजना आणली. देशात ६४० जिल्ह्यांमध्ये गाव, जिल्हा, राज्य अशी साखळी करून ही योजना आखली. यात २०१७-१८ मध्ये देशांत विविध राज्यांना ६१.४० कोटी व २०१८-१९ मध्ये ५२.६७ कोटी रुपये दिले; परंतु माहिती अधिकारातून असे लक्षात आले की, अद्याप कोणत्याही राज्यांत एकही जिल्हास्तरीय महिला केंद्र कार्यान्वित झाले नाही. (मराठी आवृत्ती. पृ-४४).

४) पंतप्रधान मातृ वंदना योजनेची मात्र 'चार आण्यांची कोंबडी आणि बारा आण्याचा मसाला' अशी गत झाली आहे. या योजनेत ३० नोव्हेंबर २०१८ पर्यंत सरकारने १८,८२,७०८ लाभार्थ्यांसाठी १,६५५.८३ कोटी रुपये दिले; परंतु मजेशीर गोष्ट अशी की, या मदतनिधीच्या वाटपासाठी सरकारने ६,९६६ कोटी प्रशासनिक प्रक्रियेसाठी खर्च केले. याचा सरळ सरळ अर्थ असा आहे की, या योजनेतील लाभार्थ्याला जर शंभर रुपये दिले असतील तर सरकारने या रकमेपेक्षा चार पट जास्त रक्कम प्रशासकीय प्रक्रिया करण्यासाठी खर्ची घातली. ●●●

**वादा-फरामोशी (हिंदी) संजॉय बासू, निजर कुमार, शशि शेखर 'यश' प्रकाशन, नवी दिल्ली. (२०१९) पृष्ठे - १५९; किंमत : २५०**

**वचन विस्मृती (मराठी अनुवाद) अनुवाद - प्रा. डॉ. दत्तात्रय मोहिते सनय प्रकाशन, नारायणगाव (२०१९) पृष्ठे - १६०; किंमत : २५०**

आजकालचे प्रश्न

पंक्चरवाला

# सरकारी विठ्ठल विरुद्ध खासगी विठ्ठल



अखेर पंढरपुरात आज किंवा उद्या जे घडणार होतं ते घडलंच. थोडं लवकर घडलं एवढाच काय तो फरक. विठ्ठलाचं मूळ माहेर, मूळ स्रोत असलेल्या पंढरपुरात त्याचं आणखी एक मंदिर उभं राहिलं. युगानुयुगे बडव्यांच्या तावडीत सापडलेला विठ्ठल त्याच्या भक्तांनी दीर्घ लढा करून सर्वोच्च न्यायालयाच्या मदतीनं हिसकावून घेतला. बडवे बाहेर आणि भक्त आत गेले. बडव्यांची जागा सरकारी नोकरांनी घेतली. अर्थात, सरकार म्हणजे लोकांचे प्रतिनिधीच असतं. कित्येक वर्षांनंतर विठ्ठल लोकांच्या सात-बारावर आला. बडव्यांच्या कायद्यातून तो सुटला. लोकआंदोलनं झाली. वादविवाद झडले. देवाचा इतिहास शोधला गेला. विशेष म्हणजे, देवावर हक्क कोणाचा? ज्यांच्या भक्तीतून तो टिकून राहतो त्यांचा की जो भक्ती घडवून आणतो, दलालासारखा भक्त आणि देवांमध्ये राहतो त्यांचा? या प्रश्नाचं उत्तर मिळालं आणि गरीब, भोळाभाबडा भक्त देवाचा मालककर्ता झाला. बडवे मंदिरातून बाहेर पडले. युगानुयुगाची मालकी गमावलेले बडवे स्वस्थ बसले असतील असं समजायचं काही कारण नव्हतं आणि घडलंही तसंच. त्यांनी पंढरपुरात विठ्ठल नंबर दोन स्थापन केला. देव स्थापन कसा करायचा, त्याच्यात पंचप्राण कसा भरायचा याची विद्या त्यांच्याकडे होतीच. त्यांनी पंढरपुरात ती पूर्वीच वापरली होती. साने गुरुजींनी पंढरपुरात मंदिर सत्याग्रह करून जेव्हा महार-मांगांना विठोबाचे दर्शन घडवलं तेव्हा काही मंडळींनी विठ्ठल भ्रष्ट होऊ नये म्हणून त्याच्यातला पंचप्राण काढून घेतला. जलाने म्हणजे पवित्र पाण्यानं भरलेल्या एका बाटलीत ठेवला. ती बाटली धारूरकर शास्त्री यांच्या घरात होती असं म्हणतात. पंढरपूरला वारीत जाऊन आलेले लोक, अभ्यासक आणि खुद्दही देवाचे मालक म्हणजे पुरोहितही असं काय काय तरी बोलत असल्याचं पंक्चरवाल्याच्या कानावर येत होतं. तो कधी गेला नाही पंढरपूरला. आपल्या घरातच आपण पंढरपूर करू, बडव्यांनी पकडून ठेवलेल्या पंढरपुरात नको जायला असं पंक्चरवाल्यानं ठरवलं. तो तसा वागतोयही. पंक्चर शोधताना सोल्यूशन लावून त्याच्यावर पॅच चिकटवताना, हवा लेवल करताना पंक्चरवाला म्हणत असतो विठ्ठला! विठ्ठला!! श्वास मोकळा होतो आणि शिणवटा कमी होतो. विठ्ठल म्हणताना तर पंढरपुरातील मूळ विठ्ठलाची मूर्ती पंचप्राणाशिवाय आणि पंचप्राण धारूरकर शास्त्रींच्या घरी. मरेपर्यंत त्यांनी हे प्राण जपलं असं म्हणतात. माणूस किती महान आहे नाही! तो देवाचे प्राण जपतो. देव जन्माला घालतो. नाहीतर कवी बाबूराव बागुलांनी म्हणूनच ठेवलंय की वेदाआधी आणि वेदाच्या परमेश्वराआधी तू (माणूस) होतास. पंढरपुरातल्या काही मंडळींनी जणू काही विठ्ठल नंबर दोन जन्माला घालून हे सिद्धच केलं की, माणूस मोठा हुशार असतो. तो स्वतःच्या कॅलेंडरनुसार देवांची वर्गवारी लावतो. म्हणजे जुना देव, नवा देव वगैरे वगैरे. आजोबा रामाच्या नावानं चिवड्याचं दुकान काढतो तर नातू नाव बदलून तो 'न्यू रामा' असं करतो. कृष्ण-न्यू कृष्ण, शिवाजी-न्यू शिवाजी, बुद्ध-न्यू बुद्ध, लक्ष्मी-न्यू लक्ष्मी, म्हसोबा-न्यू म्हसोबा अशा कितीतरी पाट्या सांगता येतील. देवापुरतंच हे राहत नाही तर इंडिया- न्यू इंडिया, महाराष्ट्र-न्यू महाराष्ट्र असंही चालतं. माणूस सतत नाविण्याला सामोरा जात असतो. या प्रवासात तो आपलं सगळं जग आणि त्यातील देवही नवं करत असतो. जसं की एकाच पंढरपुरात आता मूळ विठ्ठल म्हणजे इंग्रजीत बोलायचं तर 'ओल्ड विरुद्ध मॉडर्न' असा प्रवास घडवत आता पोस्ट मॉडर्नायजेशनपर्यंत विठ्ठलाला पोहोचवलंय. बरं संगणकाच्या पोटातून बाहेर पडणारं माणसाचं कॅलेंडर त्याला समजत नाही आणि सेन्सरवर चालवला जाणारा कारभार त्याला कळत नाही किंवा तो मतदार आणि पुढाऱ्यांच्या नादालाही लागत नाही.

सगळ्या देवांचं एक माहेर म्हणजे मूळ ठाणे जसं असतं तसे भक्तांनी स्थापन केलेली उप, उप आणि अति उप ठाणीही असतात. ही ठाणी कुणालाही मोजता येऊ

नयेत एवढी असतात. त्यामागं भक्तीशास्त्र जसं असतं तसं एक अर्थशास्त्रही असतंच असतं. पृथ्वी पैशाभोवती फिरते किंवा फिरवली जातेय असं कुणीतर उगीचंच म्हटलेलं नाही. पंक्चरवाल्याचं तसं नाही. त्याचं जग टायरच्या आत ट्यूबच्या छिद्राभोवती फिरतं.

पंढरपुरातल्या विठ्ठलाचं सरकारीकरण झाल्यानंतर आणखी एका मंदिराचा जन्म पंढरपुरात होणार याची पाल चुकचुकतच होती. गम्मत म्हणजे सरकारच्या साऱ्या गोष्टींचं खासगीकरण चालू असताना विठ्ठलाचं मात्र सरकारीकरण झालं. सरकारी उपक्रमावर लोकांचा कमी विश्वास असतो हे ठाऊक असूनही काही काही ठिकाणी सरकारीकरण चालू आहे. खासगीवाले सरकारी उपक्रमावरील विश्वास उडून जावा अशी नीती आखतात. मग ते शिक्षण, दवाखाना, रस्ता किंवा विठ्ठल काहीही असो. खासगीच्या जमान्यात सरकारी उपक्रमांना टिकून राहणं किंवा पायरोव करणं तसं कठीण. मुळात सरकारही त्याच वृत्तीचं झालंय. राफेलसाठी त्याला एचएएल चालत नाही तर अंबानी चालतो. रस्त्यासाठी सरकारी यंत्रणा चालत नाही तर लोकांचे पाकीट मारून धनदांडगे होणारे खासगी कंत्राटदार चालतात. खासगीकरणात सरकार आणि त्याचे उपक्रम छोटे व अविश्वासार्ह बनवणारी यंत्रणा उभी आहे. ती दृश्य आणि अदृश्य आहे. तिनं आपला प्रभाव इतका वाढवलाय की, खासगी हॉस्पिटलमध्ये मरण आलं तरच स्वर्गात जागा मिळते आणि 'एक के उपर एक फ्री' याप्रमाणे मोक्षही मिळतो असं साऱ्यांच्या मनावर बिंबवण्यात आलंय. अशा परिस्थितीत पंढरपुरामध्ये नव्या विठ्ठलाचं नवं मंदिर कुणीतरी आपल्या नातेवाइकांच्या नावानं उभं केलंय. म्हणजे हा खासगी विठ्ठल आणि मूळ मंदिरातला सरकारी विठ्ठल. खासगी आणि सरकारी यांच्यात कोण सरस ठरणार हेही येणारा काळच ठरवणार आहे. भक्तांची भक्ती कोणत्या बाजूला अधिक कलणार यावरूनही ठरणार आहे. पंढरपुरात आणखी काही विठ्ठलाची मंदिरं आहेत; पण मूळ मंदिराच्या तुलनेनं ती खुजीच ठरली आहेत.

आपली धर्मस्थळं एकाच वेळी श्रद्धास्थळं आणि अर्थ स्थळेही असतात. देवांमध्येही जास्त पैसा जमा करून देणारा, कमी पैसा जमा करून देणारा असे भेद भक्तांनीच केले आहेत. बालाजीची श्रीमंती अंबानीच्या जवळपास जाणारी तर विठ्ठलाची श्रीमंती कष्टकऱ्यांच्या घामापर्यंत पोहोचणारी आणि तेथेच थांबणारी आहे. विठ्ठलाच्या मंदिरावर पंढरपुरातल्या शेकडो कुटुंबांचं अर्थकारण अवलंबून होतं. त्यातही बडव्यांचं मोठ्या प्रमाणात. दर्शन, आशीर्वाद या साऱ्यातून शहराची एक समांतर अर्थव्यवस्था तयार झाली होती. सरकारीकरणामुळे ती एका रात्रीत संपुष्टात आली. बडवे जसे गरीब झाले (म्हणजे इतक्यात होणार नाहीत, कारण त्यांचा बॅलन्स खूप आहे.) तसं त्यांच्या भोवती असणारा वर्गही गरीब झाला. विठ्ठलाची सेवा हा व्यवसाय संपुष्टात आला. दुसरा व्यवसाय करता येत नाही. मल्टिनॅशनलच्या जमान्यात तो टिकणार नाही म्हणून आपल्याकडे जे सेवाकौशल्य आहे, भक्तीचा अर्थ लावण्याचं कौशल्य आहे ते वापरून आता विठ्ठल नंबर दोनची सगळी योजना केली जाईल. तिथंही सरकारी पूजा होईल. मंत्री गेला की सरकारी पूजा होते. जेथे मतदार असतात तेथे मंत्री जातोच. आमची काही जुन्या विठ्ठल मंदिराशी स्पर्धा नाही असं नवे मालक कितीही सांगत असले तरी स्पर्धा होणारच यात शंका नाही. नंबर मिळवून ते टिकवायचे असतील तर स्पर्धा करावीच लागते. ती मुद्दामहून स्वीकारावी लागते किंवा ती लादली तरी जाते.

बालाजीची अनेक मंदिरे जगभर असली तरी मूळ ठाण्यात बालाजी नंबर दोन नाही तसेच महालक्ष्मी, अंबाबाई, भवानी, राम, कृष्ण आदी देवदेवतांचं आहे. पण पंढरपुरात उलटं घडतंय. विठ्ठलाच्या मूळ ठाण्यातच दुसरा विठ्ठल स्थापन केला गेलाय. तो खासगीत असल्यानं त्याला सरकारी नियम लागू असणार नाहीत. मूळ विठ्ठलाच्या नावानं रेशनकार्ड आहे. नव्या विठ्ठलाकडे कदाचित एटीएम कार्ड, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड जाण्याची शक्यता आहे. घडेलही तसंच. आता शेवटचा प्रश्न की असं का घडतंय? त्याचं एकमेव कारण म्हणजे व्यवसाय आणि खासगीच्या जगात भक्तीचाही व्यवसाय होतो. भक्त तो करत नाहीत तर भक्ताला देवापर्यंत पोहोचवू याची गॅरंटी, वॉरंटी देणारे तो करतात. त्यांचा एक वर्ग असतो आणि उंची वाढली नाही तर फी परत याप्रमाणे ही गॅरंटीची दुकानं चालतात. गॅरंटी एक भ्रम असतो हे ना भक्तांना कळतं ना उंची वाढवण्यास निघालेल्या ग्राहकांना कळतं. खासगी क्षेत्राला सरकारचे नियम लागू नसतात. सिनेमॅक्समध्ये लाह्यांची किंमत तीनशे रुपये का, असं सरकार आणि ग्राहकही विचारू शकत नाही. बाहेर वीस रुपयांना मिळणारी पाण्याची बाटली पंचतारांकित हॉटेलमध्ये पाचशे रुपयांना का, असंही कोणी विचारू शकत नाही. उद्या खासगीवाल्यांनी नव्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी एन्ट्री फी, पूजा फी आकारायला सुरुवात केली आणि सरकारी रेटला ओव्हरटेक केलं की कुणी प्रश्न विचारेल? मुळीच नाही; कारण हे सगळं शोषण्यासाठी ग्राहकांची म्हणजे भक्तांची मानसिकता तयार केली जाते. एकदा का गणपती दूध पितो अशी आवई कोणी खासगीवाल्यांनी उठवली की बाप रे बाप सगळ्या डेअऱ्यांचं दूध तिकडंच जाणार यात शंका नाही. त्याचं कारण विवेकवादी भक्त कोणी तयार करत नाही. कोणी म्हणजे खासगीवाले. त्याचं कारण विवेकवादी भक्त किंवा ग्राहक त्यांना परवडत नाही. गॅरंटी, वॉरंटी, कॅशबॅक, चमत्कार यांसारख्या क्लृप्त्या वापरून ग्राहकाला अगोदर मतिमंद बनवलं जातं. मग त्याच्याच मनावर बिंबवलं जातं की दाग अच्छे लगते है। डाग वाढल्याशिवाय, ते अधिक गडद झाल्याशिवाय साबणाची कारखानदारी चालू शकत नाही. स्वच्छ भारत अभियान तेव्हाच चालू होतं जेव्हा भारत कोणी तरी अस्वच्छ करतं.

आता चंद्रभागेच्या काठी विठ्ठल उभा आहे. तो एकटाच नाही तर चोख्यापासून, नामदेवापर्यंत, जनाबाईपर्यंत,

तुकोबारायापर्यंत एक मोठं गणगोत घेऊन किंवा अधूनमधून त्यांना बोलवत विठुराया उभा आहे. चंद्रभागेला देवी मानून तिच्याच काठावरून विठ्ठल मंदिराच्या कळसाला नमस्कार करत दर्शन घडलं गड्या विठुराया असं म्हणणारे लाखो आहेत. विठ्ठल कुठंही सुंदर रूप घेऊन उगवतो अगदी कळसातूनसुद्धा असा अनेक भक्तांचा विश्वास आहे. हजारो वर्षे त्यांनी तो जपून ठेवलाय. या विश्वासाची एक परंपरा, एक भक्ती, संस्कृती झालीय. ती नव्या मंदिराकडे नेण्यासाठी कोणते डावपेच आखले जातील हेही नजीकच्या काळात लक्षात येणार आहे. जेव्हा तुकोबारायाचा अभंग पुन्हा बंड करेल आणि जेव्हा कर्ममेळा मंदिराच्या दारात राहून सवाल-जबाब करेल तेव्हाच भक्तीचा अर्थ कळणार आहे. विठ्ठल माझीच शेती करायला येतो असं जेव्हा सावता माळी सांगेल तेव्हाच अशा गोष्टींना आळा बसेल. अन्यथा बिर्ला मंदिरात जाऊन विठ्ठलाचं दर्शन घेतलं असा दावा करणारेही अधूनमधून उगवतच राहतील. तोपर्यंत पंढरपुरातील मूळ विठ्ठलाचाच जयजयकार करावा. 'मेड इन बडवे कम्युनिटी ॲण्ड सोल्ड इन बडवे कम्युनिटी' यापासून थोडं दूर रहायला हवं.

## राखीव जागा आणि गुणवत्ता

राखीव जागांमुळे गुणवत्ता नाहीशी होते आणि एकूण समाजच मागास ठरतो, गुणवत्ताहीन ठरतो असा युक्तिवाद करत राखीव जागांना विरोध करणारे आजही काही कमी नाहीत. राखीव जागा जेव्हा सुरू झाल्या तेव्हापासून हे विरोधक गुणवत्तेचा बागुलबुवा करत आणि त्याला राष्ट्र-समाज वगैरे जोडत विरोध करतच आहेत. अनेकदा म्हणजे प्रत्येक वेळी ते न्यायालयात हरले तरी ते लढायचे थांबलेले नाहीत आणि थांबण्याची शक्यताही नाही. समाजातील एका मोठ्या उपेक्षित वर्गाचा विकास त्यांना नको आहे. सदाशिव पेठ, रेशीमबाग, सिलिकॉन व्हॅली ते लाल किल्ला येथे त्यांना स्वतःचीच सत्ता हवी. राखीव जागांमुळे आपल्या एकाधिकारशाहीला,



ज्ञानक्षेत्रातील मक्तेदारीला आणि विकासाच्या साम्राज्याला खीळ बसते आहे किंवा बसली आहे असे त्यांना वाटत आलं आहे. आपला सनातनी विचार बदलायला ते तयार नाहीत आणि समग्र समाजाचा विकास झाला तरच राष्ट्राचाही समग्र विकास होतो हे वैश्विक सूत्रही ते मान्य करायला तयार नाहीत. काही तरी फट शोधायची आणि राखीव जागेविरोधात गरळ ओकत न्यायालयात धाव घ्यायची हा त्यांचा परिपाठ सुरूच आहे.

कर्नाटक सरकारनं २००६ मध्ये बढतीतही आरक्षण लागू केलं होतं. या विरोधात काही जण सर्वोच्च न्यायालयात गेले आणि बारा वर्षे न्यायालयीन लढाई लढत सर्वांचं लक्ष आपल्याकडे वेधून घेतलं. राखीव जागा मुळातच समतेबाबत अन्यायकारक, त्यातही बढतीतील राखीव जागा म्हणजे आणखी अन्यायकारक अशी खोट्या अन्यायाची गाथा गात हा विषय सातत्यानं कळीचा बनवण्यात, तो जिवंत ठेवण्यात या विरोधकांना यश आलं आहे. अतार्किक, अवैज्ञानिक आणि अनैतिक असलेला म्हणजे गुणवत्तेशी आरक्षण जोडण्याचा मुद्दा ते मांडत आहेत. पण आठ दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयानं एकूणच आरक्षणविरोधकांचे कान ओढले आहेत.

राखीव जागांमुळे गुणवत्तेचा ऱ्हास होतो किंवा गुणवानांवर आरक्षणामुळे अन्याय होतो. ९५ टक्केवाल्यांना प्रवेश मिळत नाही; पण ८५ टक्केवाल्यांना तो मिळतो यांसह सर्व पारंपरिक युक्तिवाद न्यायालयानं खोडून काढले आहेत. न्यायालयानं आरक्षण कायम ठेवण्याचा क्रांतिकारक निर्णय तरी घेतलाच; शिवाय चांगले गुण मिळवल्याने गुणवत्ता प्राप्त होते म्हणजेच चांगले मार्क मिळवणारा गुणवान आणि कमी मार्क मिळवणारा गुणवत्ताहीन हेही न्यायालयानं अमान्य केलं. गुणवत्तेच्या समर्थकांनी परीक्षेतील मार्कांला गुणवत्ता समजून ठेवलं आहे. एखाद्या परीक्षेच्या निकालानंतर मार्कलिस्ट काढली जात नाही, तर मेरिट लिस्ट काढली जाते. म्हणजेच जास्त मार्क मिळणारे गुणवान आणि तळाशी जाणारे कमगुणवान असं सांगितलं जातं. ते चुकीचं तर आहेच; शिवाय अवैज्ञानिक आहे. गुणवत्ता पास-नापासांच्या मध्ये असत नाही. उत्तीर्ण झाल्याच्या प्रमाणपत्रावर असत नाही तर ती एक प्रक्रिया असते. माणूस सरपटतो, रांगतो, मग चालतो आणि धावतोही. पाळण्यात मुलाच्या पायाची उंची किती आहे यावरून तो किती धावणार हे सांगायचं नसतं. गुणवत्तेचंही तसंच असतं. विद्यापीठात पहिल्या येणाऱ्या डॉक्टरांच्या रुग्णालयातही रुग्ण मरण पावतात. अभियंत्यानं बांधलेलं पूल कोसळतात आणि कोणतीही डिग्री नसलेल्यानं बांधलेले पूल टिकून राहतात हेही आपण पाहत असतो. सर्वोच्च न्यायालयानं गुणवत्तेची व्याख्या अधिक विस्तारत ती सामाजिक न्याय आणि समतेपर्यंत पोहोचवली आहे. विषमतेवर उभा राहणारा समाज, विषमता घेऊन चालणारा समाज नेहमीच सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेचा मारेकरी असतो. विषमतेचं हत्यार आपोआपच त्याच्या हातात आलेलं असतं. सातत्यानं तो ते वेगवेगळ्या नमुन्यात चालवत असतो. हत्यार चालवल्यामुळे होणाऱ्या जखमा कधी दृश्य, कधी अदृश्य, कधी तात्कालिक तर कधी वर्षानुवर्षे भळभळत असतात. त्यातून समाज आणि त्याचा माणूस दुभंगतो. एक जखमी माणूस तर दुसरा जखमा करणारा माणूस तयार होतो. बंधुता लोप पावते. छळणारा आणि छळला जाणारा माणूस समता तयार करू शकत नाहीत. सामाजिक न्यायापर्यंत पोहोचू शकत नाहीत. खरं तर विषमता घेऊन चालणाऱ्या समाजाला सामाजिक न्याय, समता, बंधुता इत्यादी मूल्यांचा अडथळाच होत असतो. म्हणून तो या मूल्यांना बाजूला ठेवण्याचा, त्यांना दाबण्याचा प्रयत्न असतो. सातत्यानं

आरक्षणाला विरोध करणाऱ्या वृत्तींना हेच साध्य करायचं असतं. गुणवत्तेची आणि खोट्या अन्यायाची ढाल पुढं करत ते कधी न्यायालयात, कधी न्यायालयाबाहेर, कधी दंगलीत तर कधी कायद्याचा, कधी कायद्यातील फटींचा कीस पाडत हा विरोध चालूच असतो. आरक्षणाचं राजकारण होतं, कधी लाभार्थ्यांची पिळवणूक होते, कधी जातीधर्माशी तर कधी द्वेषाशी आरक्षण जोडलं जातं. गुणवत्तेबाबत सर्वोच्च न्यायालयाचं विश्लेषणही सगळा समाज लक्षात घेईल अशी अपेक्षा आहे. शोषित घटकांसह सर्वांना समान प्रतिनिधित्व मिळणं, सर्जनशीलतेला न्याय मिळणं हीच खरी गुणवत्तेची व्याख्या. सामाजिक न्याय आणि समतेवर आधारित समाज उभा करायचा असेल तर आरक्षण आवश्यक आहे हेही न्यायालयानं स्पष्टपणे नोंदवलं आहे. याचा अर्थ केवळ शाळाप्रवेश, केवळ नोकऱ्या, केवळ बढतीमधील आरक्षण एवढ्यापुरतंच राखीव धोरण मर्यादित नाही तर त्याचा अंतिम उद्देश सामाजिक न्यायावरचा समाज उभा करणं आहे. आपल्या राज्यघटनेनं तेच ध्येय राष्ट्रासमोर ठेवलं आहे. म्हणूनच आपण कल्याणकारी राष्ट्राची संकल्पना स्वीकारली आहे. तिच्यापर्यंत पोहोचण्यासाठी जी अनेक साधनं वापरायची आहेत त्यात एक आरक्षण आहे. विशेष म्हणजे, ज्यांना धर्माधिष्ठित, वर्णाधिष्ठित राष्ट्र उभं करायचं त्यांना प्रारंभापासूनच राखीव जागा एक अडथळा ठरत आला आहे. मतबँका पळवण्यासाठी आणि राज्यघटनेला चकवा देण्यासाठी ते आरक्षणाचे समर्थन करत असले तरी त्यांची ती हंगामी भूमिका आहे. कारण ते समतेच्या बाजूचे नसून, समरसतेच्या बाजूचे आहेत. स्वतः अलिप्त राहून कुणाच्या तरी माध्यमातून ते प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष झुंजी लावत असतात. त्यांना धर्मावरचे राष्ट्र पाहिजे आहे आणि हा धर्म समतेच्या बाजूने कधीच नसतो. तो एकलव्याचा अंगठा कापतो आणि शंबुकाचं मुंडकं उडवतो. सबब न्यायालयाच्या निवाड्याकडे केवळ कायद्याच्या दृष्टिकोनातून नव्हे तर एका व्यापक पटावरून पाहावं लागेल. शाहू महाराज काय, महात्मा फुले काय आणि डॉ. बाबासाहेब काय हे सर्वांत अधिक सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते होते. त्यातूनच आरक्षणाचा जन्म झाला आहे.


जर आरक्षण रद्द केलं तर समाजातील काही विशिष्ट घटकांनाच नोकऱ्या आणि बढत्यांमध्ये प्रतिनिधित्व मिळेल. आणि असं सातत्यानं घडत राहिलं तर आपण विषमता कधीच संपवू शकणार नाही. परिणाम राज्यघटनेनं आपल्या समाजात पेरलेल्या सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेच्या स्वप्नाकडं, त्याच्या पूर्तीकडे कधीच पोहोचू शकणार नाही. गुणवत्तेचे गोडवे गाणाऱ्यांनी आणि गुणवत्तेचे मक्तेदार आपणच आहोत असं समजणाऱ्यांनी हे ध्यानात ठेवलं पाहिजे. आरक्षणाचा लाभ घेणाऱ्यांनीही हे समजून घेतलं पाहिजे. केवळ भौतिक विकासासाठी राखीव जागा नाहीत तर मूल्यात्मक विकासासाठीही त्या आहेत. जातिअंतासाठी त्या आहेत. विकासाला शील बहाल करण्यासाठी त्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा असाही अर्थ घेता येतो. फक्त त्यासाठी चष्मे बदलण्याची गरज आहे.

*बुडतां हे जन न देखवें डोळा*
*उपकारासाठी बोलों हे उपाय।*
*येणेविण काय आम्हा चाड।।१।।*
*बुडतां हे जन न देखवें डोळा।*
*येतो कळवळा म्हणवुनि ।।२।।*
*तुका म्हणे माझे देखतिल डोळे।*
*भोग देते वेळे येईल न कळों।।३।।*

संत तुकोबारायांचा हा अभंग १९९० पासून वारंवार आठवायला लागतो. पंक्चरवाल्यानं कुठल्या तरी कीर्तनात एका बुवाच्या तोंडून तो ऐकला होता. तुकोबारायांनी ज्या परिस्थितीत हा अभंग लिहिला ती परिस्थिती वेगळीही असू शकते; पण आजच्या परिस्थितीतही हा अभंग तंतोतंत लागू पडतो. त्यातही प्रारंभी महाराष्ट्रात आणि आता देशभर होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर तर तो आठवतोच. शेतकरी म्हणजे एक मोठं कष्टाचं जगच आहे आणि या जगाला आत्महत्यांमुळे घरघर लागली आहे. पूर्वी आत्महत्या मोजायला हातावरची पाच बोटं उपयोगी पडायची किंवा पुरेशी व्हायची. आता तसं घडत नाही. बोटे अपुरं पडतात. छोटा पडदा अपुरा पडतो. वर्तमानपत्रांच्या पानांतही आत्महत्या मावेनाशा झाल्या म्हणून की काय आता वर्तमानपत्रांतही या संक्षिप्त येतात. दहा-दहा आत्महत्यांची बातमी दहा ओळीत बसवण्याचं कौशल्य वर्तमानपत्रांनी आत्मसात केलंय. सरकार वर्तमानपत्रांपेक्षाही चतुर. एक आत्महत्या एक लाख रुपयांत बसवण्याची सिद्धी त्याला प्राप्त झालीय. आत्महत्येची बातमी आली की वर्ग एकचा अधिकारी पाठव आणि दे एक लाख रुपये. आता या आत्महत्या केलेल्यांना कोणी श्रद्धांजली वाहत नाही, गाव बंद ठेवत नाही. विधानसभेत क्वचितच आवाज उठतो. समोर आणि बाजूला कॅमेरे असल्यानं तो जास्तच उठतो. अंबानीच्या मुलीच्या लग्नाची दुसरी ब्रेकिंग न्यूज आली की हा आवाजही बंद होतो. कोण कुठं मेलं, कसं मेलं कळत नाहीय. पिकावर फवारणी करावयाच्या औषधाचा रेट असा अचानक कसा वाढतो हेही कळत नाहीय. ज्यांना विष विकत घ्यायलाही पैसे नसतात ते धोतराचा, पटक्याचा फास करतात. फाटकं धोतर फासात टिकाव धरणारं नसंल तर मग विहिरीत उडी मारतात. ज्यांच्याकडे गळून पडलेल्या झाडांचा लाकूडफाटा असतो ते स्वतःच स्वतःची चिता रचतात. कोण मंत्रालयात सहाव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या करतात. सहावा मजला आत्महत्यांसाठी कुख्यात होऊ लागला. तिथंच मुख्यमंत्र्यांचं दालन. साऱ्या गोष्टी प्रतिष्ठा कमी करणाऱ्या होऊ लागल्या. मग या मजल्याची डागडुजी करून खाली भव्य जाळी लावण्यात आली. कोणी उडी मारली की तो आणि त्याचा प्राण जाळीत अडकेल. शेतकरी जगवल्याचं पुण्य सरकारला मिळंल. जीव संपवण्याचे नाना मार्ग तयार झाले. त्यातही जीव स्वस्तच झाले. पाण्यापेक्षा, दारूपेक्षा, धान्यापेक्षा, औषधापेक्षा जीव स्वस्त आणि बाकी सगळ्या गोष्टी महाग. सोन्याचा धूर सोडणाऱ्या देशात गॅसचा धूर

महाग आणि श्वास आत–बाहेर सोडणारा जीव इतका स्वस्त होईल याचा अंदाजही कोणी बांधला नसंल. साऱ्या कल्पकता निवडणुकीत कुणाला किती जागा मिळतील यात गुंग झाल्या. कोणता शेतकरी कुठं आत्महत्या करणार हे कोणाच्या कल्पनेत बसतच नव्हतं. तर हा आत्महत्यांचा असा नागवा ऋतू आला आणि बळीराजाच्या देशात हातपाय पसरून स्थिरस्थावर झाला. 'बुडतां हे जन न देखवे डोळा' असं निदान पंक्चरवाल्याला तरी वाटतंय बाकी सारे लोकसभेच्या पाच–सहाशे जागांचा हिशेब लावण्यात दंग. काही जण शेतकऱ्यांवर भाषणे करत निवडणुका जिंकण्यात दंग. खरं तर हेही पाहताना मनात कालवाकालव होतेय. म्हणजे तुकोबारायांच्या शब्दात 'न देखवे डोळा' असं काही तरी होतंयच.

काही शहाण्या माणसांनी आपली कल्पकता पणाला लावून आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या मोजली. अर्थातच ती भारतापुरती आहे. भारताबाहेर आत्महत्या होत नाहीत. एका वर्षाला एक लाख चाळीस हजार शेतकरी आत्महत्या करत असल्याचं चित्र स्पष्ट झालं. आता ३६५ दिवसाला १ लाख ४० हजार म्हणजे रोज ३८४–म्हणजे एका तासाला पंधरा. आईशपथ हा आकडा ऐकला की, बीपी आणि शुगर किंवा दोन्हीही हमखास वाढण्याची गॅरंटीच गॅरंटी... कोणी तरी दिल्ली–मुंबईतून पाठवलेल्या मलमपट्ट्या व अन्य प्रयत्न म्हणून की काय आत्महत्यांचा आकडा कमी होऊन ८४ हजारांवर आलाय. अर्थात तो वार्षिक आहे. याचा अर्थ महिन्याला सात हजार शेतकरी आत्महत्या करतातच. १९९५ नंतर सुमारे तीन लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत आणि त्यात महाराष्ट्रातील आहेत ८५ हजार. पंजाब पुढं येईपर्यंत महाराष्ट्राचा नंबर अगदीच वर होता. २०१८ पर्यंत रोज दहा शेतकरी आत्महत्या करत होते. विविध कारणांनी देशात ज्या आत्महत्या होतात त्यातही शेतकऱ्यांच्या आत्महत्या टॉपलाच म्हणजे साडेअकरा टक्के.



आता हा आकड्यांचा खेळ अन्य प्रदेशात नेला तर तिथंही आत्महत्या हातपाय पसरताना दिसतील. २०१५ मध्ये तेलंगणात १३५८, कर्नाटकात ११९७, मध्य प्रदेशात ५८१, आंध्रात ५१६ तर छत्तीसगडमध्ये ८५४ आत्महत्या झाल्या. गुजरात–३८७, केरळ–९०५, पंजाब–७५, तमिळनाडू–३६, छत्तीसगड–१८० असा आत्महत्यांचा वेग राहिला. अर्थात, महाराष्ट्र त्यात पहिल्या नंबरवर. पंजाब हा देशातला सर्वांत समृद्ध पट्टा. तेथेही आत्महत्या आणि स्वतःला महान राष्ट्र म्हणवून घेणाऱ्या महाराष्ट्रातही. खरं तर महाराष्ट्र आत्महत्यांची गंगोत्रीच ठरला.

शेतकरी आत्महत्या का करतात आणि पूर्वी का करत नव्हते, अन्य गरीब देशातील शेतकरी आत्महत्या करत नाहीत मग भारतातच हा रोग का आला, असा प्रश्न कायमच पडतो; पण त्याची उत्तरं शोधायला कुणाला वेळ नाही. शेतकरी संघटनांत त्यांच्या राजकारणामुळे तुकडे पडत आहेत आणि संघटना उसाच्या दरात व सहकारी कारखान्यात अडकल्या आहेत. खासगीत जाऊन आंदोलन करण्याची हिम्मत त्यांच्यात अजून कुठली आलीय! ज्यांच्या विरुद्ध आंदोलन करायचं त्यांच्याच पक्षात जाऊन यांनी घरट्यासाठी जागा, फुकट गॅस आणि फुकट शौचालय मिळवलंय. ते बाहेर कसं पडतील?

नापिकी, वित्तीय संस्थांकडून म्हणजे चिट फंडासारख्या संस्थांकडून फसवणूक, मुलींची लग्न, व्यसनं, राजकारण, कर्ज, उत्पादन खर्च न निघणं, बिगरशेती गोष्टींवर खर्च, पाऊस, विहिरीला पाणी न लागणं वगैरे गोष्टीच स्वंथ करण्यासाठी वापरल्या जातात. पण तरीही उत्तरं काही सापडत नाहीत. मग महिन्याला चारशे रुपये पेन्शन दे, कर्ज माफ कर वगैरे चिकटपट्ट्या वापरण्याचे प्रयोग सुरू होतात. राजकारणात आत्महत्या नाचवल्या जातात आणि तोपर्यंत आत्महत्यांचे नवे आकडे जन्माला येऊ लागतात. मग पुन्हा बुडतां हे जन.... या तुकोबारायांच्या ओळी आठवायला लागतात.


जागतिकीकरण आणि खासगीकरण यामुळे कृषी क्षेत्रातही एक विषम स्पर्धा सुरू आहे. कंपनी फार्मिंग विरुद्ध लंगोटवाला शेतकरी, सेझ विरुद्ध लंगोटवाला शेतकरी, बागायतीतील दांडगे विरुद्ध लंगोटवाले शेतकरी, गावाच्या गावातील शेती विकत घेऊन सरकारी योजनांनी ती करणारे पुढारी, व्यापारी, व्यावसायिक विरुद्ध लंगोटवाले शेतकरी अशी ती स्पर्धा आहे. महाबलवान विरुद्ध दुर्बल अशी ती स्पर्धा आहे. मॉल विरुद्ध रस्त्यावर बसून भाजी विकणारा अशी ती स्पर्धा आहे. बळी तो कान पिळी किंवा जो सशक्त तोच जगणार या सिद्धांतावर ती उभी आहे. जोपर्यंत हा सिद्धांत हटत नाही तोपर्यंत 'मरणमं शरणमं गच्छामी' हे थांबणार नाही. हा सिद्धांत उलटा करेल, नष्ट करेल असा कोणी आहे का माय का लाल? ●●●

# ग्रेट थॉट्स



त्रासिक विचारांपासून,
चिडलेल्या विचारांपासून
मुक्ती म्हणजे शांती होय

**– गौतम बुद्ध**




संगीताशिवाय जीवन ही
एक चूक असू शकते

**– फ्रेडरिक नित्सके**



सवयीच्या प्रभावासारखा
दुसरा प्रभाव नाही

**– गिलबर्ट पारकर**



भित्र्या माणसांत प्रेम
व्यक्त करण्याची क्षमता
नसते. तो धाडसाचा
विशेषाधिकार असतो

**– महात्मा गांधी**



आपण काय आहोत, हे
आपल्याला माहीत असतं;
परंतु काय असलो असतो,
हे मात्र माहीत नसतं

**– विल्यम शेक्सपिअर**



तुमची सकारात्मक कृती
सकारात्मक विचारांशी
जुळली की यश मिळते

**– शिव खेरा**



मी दररोज खूश असतो.
कारण जीवन हे प्रचंड
सकारात्मक मार्गाने पुढे
जात असतं **– लिल याचि**

अंधार अंधाराला पळवू शकत नाही.
केवळ उजेडच ते काम करू शकतो.
तिरस्कार फक्त प्रेमाने दूर करता येऊ
शकतो, तिरस्काराने नव्हे

**– मार्टिन ल्यूथर किंग**



# कोण काय बोलतं...



**प्रणव मुखर्जी** (माजी राष्ट्रपती)

मतदारांचा कौल सार्वभौम असून त्याविषयी शंका घ्यायला कोणतीही जागा असता कामा नये.



**विराट कोहली** (भारतीय क्रिकेटचा कर्णधार)

इंग्लंडमधील आव्हानात्मक वातावरणापेक्षा विश्वचषक स्पर्धेतील दबावाचा सामना करणे सर्वात महत्त्वाचे.



**नितीश कुमार** (बिहारचे मुख्यमंत्री)

नथुराम गोडसेला देशभक्त म्हणणाऱ्या साध्वी प्रज्ञा सिंहला भाजपातून हाकला.



**राज ठाकरे**

पत्रकार परिषद घेऊन एकाही प्रश्नाला उत्तर न देणं ही मोदींची मानसिक हार.



**अरविंद केजरीवाल** (दिल्लीचे मुख्यमंत्री)

भाजपवाले माझ्या जीवावर उठलेत. ते माझी हत्या घडवून आणतील.



**कैलाश सत्यार्थी** (नोबेल पुरस्कारप्राप्त बाल हक्क कार्यकर्ते)

गांधीजींचे स्थान हे कोणतीही सत्ता आणि राजकारण यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे.



**लुओ झाओहुई** (चीनचे राजदूत)

भारत-चीनमधील सांस्कृतिक संबंध दृढ झाल्यास त्याचा जगभरातील मानवजातीला फायदा.



**रणबीर सिंह** (उत्तर क्षेत्राचे कमांडर लेफ्टनंट जनरल)

पाकिस्तानचा सामना करण्यासाठी कारवाई सुरू असून आम्ही त्यांचे मनसुबे उधळून लावू.



**कमला हॅरिस** (अमेरिकेतील राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवार आणि विद्यमान सिनेटर)

महिलांविषयी भेदभाव करणाऱ्या कंपन्यांना दंड लावला पाहिजे.



**सुरेश द्वादशीवार** (ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक)

गांधी म्हणजे असा एक माणूस आहे, ज्याच्याकडे जग आश्चर्य, कौतुक आणि आदराने पाहते.



**टीम कुक** (ॲपलचे सीईओ)

आवडीच्या क्षेत्रात करिअर केल्यास जास्त ताकद लावून काम कराल.



**अशोक चव्हाण** (काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष)

दुष्काळग्रस्तांना ४,३०० कोटी रुपयांची मदत दिल्याचा राज्य सरकारचा दावा साफ चुकीचा.

■ POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
■ RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

